
12



# सहकारी लोकराज्य

ध. रा. गाडगीळ

गोखले
अर्थशास्त्र संस्था
पुणे ४.

सहकारी लोकराज्य

सुवर्ण महोत्सव
१९३०-१९८०

सप्रेम भेट

वि. म. दांडेकर
संचालक

गोखले अर्थशास्त्र संस्था
१ जानेवारी १९८१

# सहकारी लोकराज्य

ध. रा. गाडगीळ

गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे ४

गोखले अर्थशास्त्र संस्था मराठी प्रकाशन १२ वे

© गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे ४

१९६७

किंमत रु. ३·००

प्रकाशक : वि. म. दांडेकर, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे ४

मुद्रक : मा. ह. पटवर्धन, संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण, पुणे २

# प्रस्तावना

प्रस्तुत प्रकाशनातील व्याख्याने डिसेंबर १९५९ मध्ये चंदीगडला पंजाब विद्यापीठातर्फे मी इंग्रजीतून दिली. पंजाब विद्यापीठाने ती १९६१ साली प्रकाशित केली. त्यांचे मराठी भाषांतर करावयाचे ३-४ वर्षांपूर्वीच ठरले व हे भाषांतर करण्यास श्री. य. कृ. सोहनी व श्री. प्रकाश गोळे यांस मी विनंती केली होती. दोघांनीही भाषांतर पुरे करून आपापला मसुदा मजकडे दिला. त्यासही १।।-२ वर्षे झाली; मला भाषांतराकडे लक्ष देण्यास वेळ झाला नाही, म्हणून विलंब लागला. आता दोन्ही मसुद्यांच्या आधारे मी स्वतः भाषांतराचा अंतिम आराखडा सिद्ध केला, तो प्रकाशित होत आहे. भाषांतरात काही उणीवा, भाषा-दोष वगैरे जे राहिले असतील त्यांची जबाबदारी सर्वस्वी मजवर आहे. भाषांतराचे काम सुकर केले याबद्दल श्री. सोहनी व श्री. गोळे यांचा मी अत्यंत आभारी आहे.

या संग्रहात तीन व्याख्याने आहेत. पहिल्या व्याख्यानात सहकाराचा उगम व पूर्वेतिहास आणि विशेषतः पाश्चात्य देशांतील सहकाराचा विस्तार यांविषयी विवेचन आहे. शेवटच्या व्याख्यानात सहकारी लोकराज्याची लक्षणे आणि सहकारामुळे होणारे आर्थिक व्यवस्थेचे संभाव्य परिवर्तन यांविषयी मुख्यतः तात्त्विक चर्चा आहे. व्याख्याने देऊन बरीच वर्षे झाली असली तरी या दोन व्याख्यानांतील मांडणी व विवेचन यांत फरक करण्याची जरूरी भासत नाही. दुसऱ्या व्याख्यानाचा विषय अविकसित देशांतील सरकार-पुरस्कृत सहकाराची लक्षणे व व्याप्ती हा आहे. यातील पूर्वार्ध इतर अविकसित देशांत काय घडामोडी झाल्या त्याच्या सोदाहरण विवेचनाचा आहे. तेथील एकंदर परिस्थितीची आणि ऐतिहासिक वाटचालीची कल्पना येण्यापुरतेच हे विवेचन केले आहे. तेव्हा यातही आणखी पूरक मजकूर घालावा किंवा बदल करावा असे वाटत नाही. या दुसऱ्या व्याख्यानाचा

उत्तरार्ध भारतातील ऐतिहासिक घडामोडी व सद्यःस्थिती यांविषयीचा आहे. सद्यःस्थितिवर्णनात्मक जो भाग आहे त्यात गेल्या ७-८ वर्षांत पुष्कळच फरक झाला आहे. यामुळे या प्रस्तावनेच्या निमित्ताने काही पूरक मजकूर येथे समाविष्ट करण्यात येत आहे.

गेल्या ८ वर्षांत भारतीय परिस्थितीत झालेला मुख्य फरक म्हणजे सहकारी संस्यांची संख्या व कार्य यांत झालेली वाढ व सहकारी व्यवस्थेचा विविधांगी विस्तार हा होय. सहकारी पतपेढ्या व बँका हा भारतीय सहकारातील सगळ्यात विकसित भाग प्रथमपासून होता. यात गेल्या ८ वर्षांत फार मोठी वाढ झाली आहे. रिझर्व्ह बँकेच्या ग्राम-पतपाहणी समितीने सुचविलेला कार्यक्रम अनेक राज्यांत बहुतांशी पूर्णपणे अंमलात येऊन समितीने सुचविल्याप्रमाणे पतपेढ्या व बँका यांची पुनर्व्यवस्था झाली आहे. तसेच पीक-कर्ज योजनेस तत्त्वतः सर्वत्र मान्यता मिळून प्रत्यक्षात ती अंमलात आणण्याचे प्रयत्न केले जात आहेत. परिणामी, ग्रामीण भागातील सहकारी पत-व्यवस्थेमार्फत पुरविण्यात आलेल्या कर्जांचे प्रमाण अनेक पटींनी वाढले आहे. काही राज्यांतील काही जिल्ह्यांत आता सहकारी पत-व्यवस्था ही ग्रामीण भागातील विविध पत-संस्था व यंत्रणा यांत प्रमुख ठरली आहे. म्हणजे काही प्रदेशांत तरी रिझर्व्ह बँक समितीचा कार्यक्रम पूर्णपणे यशस्वी ठरला आहे. याच बरोबर शेती मालावरील प्रक्रिया आणि ग्रामीण भागातील खरेदी-विक्री सहकारी संस्था यांचीही सर्वांगीण प्रगती झाली आहे. प्रक्रिया-संस्थांत सहकारी साखर कारखान्यांची कामगिरी विशेष उठावाने दिसून येते; परंतु दुग्ध-व्यवसाय, भात-गिरण्या, कापसावरील प्रक्रिया-संस्था आणि सूत-गिरण्या इत्यादींबाबतही पुष्कळच प्रगती झालेली आहे व होत आहे. खरेदी-विक्री संस्थांचा व्यवहार मोठ्या प्रमाणात वाढला असून त्यांच्या व्यवहाराचा संबंध पत-व्यवहाराशी जोडण्याचे प्रयत्न काही अंशी यशस्वी झाले आहेत. या प्रमाणे १९५९–६० सालच्या सुमारास ज्या कार्यक्रमाच्या यशस्वितेबद्दल खात्री देता येत नव्हती तो बऱ्याच प्रमाणात प्रत्यक्ष यशस्वी झाला असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही.

तसेच व्याख्याने दिली त्यावेळेस जे काही प्रश्न विशेष विवाद्य वाटत होते ते आज सुटल्यासारखे आहेत. सरकारी भागीदारीचा सर्वत्र स्वीकार झाला असून योग्य पथ्य पाळल्यास नवीन उपक्रमांची त्वरेने वाढ होण्यास सरकारी भागीदारीचा उपयोग होतो, ती अनिष्ट ठरत नाही, हे आता सर्वमान्य झाले आहे. सहकारी प्रक्रिया-संस्थांत जी मोठ्या प्रमाणात वाढ होऊ शकली त्याचे एक कारण म्हणजे सरकारने तत्प्रीत्यर्थ केलेला भाग-भांडवलाचा पुरवठा हेच होय. तसेच प्राथमिक ग्रामसंस्थेच्या व्याप्तीबाबतचा वादही आता सुटल्यासारखा आहे. त्या छोट्या असाव्या की मोठ्या असाव्या, त्यांनी एका खेड्यापुरतेच एका क्षेत्रा-पुरते काम करावे की विविधांगी मोठे क्षेत्र व्यापावे या वादांचा निकाल होऊन

सर्वसामान्यपणे सर्वत्र मध्यम तडजोडीची भूमिका मान्य झाली आहे.

दुसऱ्याही काही बाबतींत परिस्थितीत बरीच सुधारणा झाली आहे. उदाहरणार्थ, सरकारी धोरण हे अनिश्चित व बिन-सरकारी मताची आणि कार्यकर्त्यांची उपेक्षा करणारे असे जे त्या वेळेस वाटत होते ते बहुतांशी बदललेले आहे. अजून अंमल-बजावणीत जरी निश्चितता आणि सुसूत्रता सारखी दिसली नाही तरी घोषित धोरण बहुतांशी स्थिर आहे. तसेच बिनसरकारी पुढाऱ्यांच्या मतास व कार्यास सरकार, रिझर्व्ह बँक वगैरेंकडून अधिक मान्यता मिळत आहे. हे परिवर्तन होण्याचे एक कारण म्हणजे ठिकठिकाणी स्थानिक नेतृत्व जास्त प्रभावी होऊन नवीन संस्था काढणे व चालविणे याची जबाबदारी ते मोठ्या प्रमाणात पत्करीत आहे हे होय. आता नवीन उपक्रमांचा उगम बहुतांशी वरून व्हावा आणि बरेचसे संचालकत्व बाहेरचे असावे ही परिस्थिती पुढारलेल्या व विकसित राज्यांत बहुतांशी बदलली आहे. या परिवर्तनाचे दृश्य फळ म्हणून सहकारी सांघिक संघटनाही अनेक व समर्थ झाल्या आहेत. निरनिराळ्या सहकारी क्षेत्रांत ७-८ अखिल भारतीय संघटना स्थापन झाल्या असून त्या एकमेकींशी सहकार्य करून एक संयुक्त फळी निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. या सर्व घडामोडींचा सरकारी कारभार व धोरण यांवर निश्चित परिणाम झाला आहे.

एवंच, दुसऱ्या व्याख्यानात वर्णिलेली परिस्थिती अनेक प्रकारे पुष्कळच बदलली आहे. अर्थात काही जुन्या समस्या शिल्लक आहेत, तसेच नवीन निर्माण झाल्या आहेत. सहकारी प्रवृत्तीची कक्षा व कार्यक्षमता यांत राज्याराज्यांत व विभागा-विभागांत फार मोठा फरक अजून टिकून राहिला आहे. विकासाच्या क्रियेत जे इतरत्र आढळते ते येथेही घडत आहे. विशिष्ट दिशेने कोठे एकदा प्रगती झाली म्हणजे तेथेच तिचा वेग वाढतो आणि मागासलेले मागासलेलेच राहून दोहोंतील तफावत जास्त उत्कटपणे दिसून येते. हे सहकारातही आज घडत आहे. सहकारी पत-व्यवस्थेत हा फरक फारच मोठा दिसून येतो. जो कार्यक्रम काही राज्यांत जवळजवळ पूर्ण यशस्वी झाला, त्यापासून इतरांस काहीच फलनिष्पत्ती झाली नाही की काय असे भासण्यासारखी परिस्थिती आहे. सहकारी पतव्यवस्था ही सहकारी ग्रामीण व्यवस्थेची रचना व प्रगती यांच्या केंद्रस्थानी आहे. म्हणून जेथे प्राथमिक पतपेढ्यांची संख्या व कार्यक्षमता यांची वाढ खुंटल्या-सारखी दिसते तेथे सरकारी कृषि-पत मंडळ स्थापून त्याच्याद्वारा कर्जवाटप करावे व सहकारी व्यवस्थेच्या पुनर्मांडणीचा दरम्यान प्रयत्न करावा या जुन्या कल्पनेने अलीकडे पुन्हा उचल घेतली आहे. खरेदी-विक्री संस्था अगर प्रक्रिया-संस्था यांबाबतही अशीच तफावत दिसून येते. तेव्हा काही राज्यातील आणि काही विभागांतील सहकारी व्यवस्थेची निष्क्रियता अगर मंदगती यांवर उपाय-योजना शोधणे ही आज मोठी निकडीची गरज होऊन बसली आहे.

सहकारी व्यवस्थेच्या वाढीस सरकारी पूरक धोरण योग्य नाही, हीही अडचण अनेक ठिकाणी कायम आहे. त्याचबरोबर पूरक धोरण योग्य असल्यास अल्पकाळात फार मोठ्या प्रमाणात प्रगती होऊन शकते, हे गेल्या तीन वर्षांत एकाधिकार धान्य-खरेदीच्या साहाय्याने महाराष्ट्रातील सहकारी खरेदी-विक्री संघटनेने जी मोठी शाश्वत फलदायी कामगिरी बजावली त्यावरून सिद्ध होते.

प्रगतीबरोबर अनेक नवीन समस्याही उत्पन्न झाल्या आहेत. प्रगत राज्यांत मोठ्या सहकारी संस्था या सामाजिक व आर्थिक सत्तांची केंद्रस्थाने बनल्यासारख्या झाल्या आहेत. त्यामुळे सत्तेचे केंद्रस्थान काबीज करणे किंवा ताब्यात ठेवणे याकरिता होणाऱ्या उलाढाली आणि त्यांतून निर्माण होणारे अनिष्ट प्रघात यांचा उपसर्गही सहकारी संस्थांस पोहोचू लागला आहे. सहकारी लोकराज्य निर्मितीकरिता संघा-संघांत आणि स्तरा-स्तरांत पूर्ण सहकार्य हवे ही गोष्ट अजून नवीन संस्था-चालक व संघ-चालक यांस पटली आहे असे दिसत नाही. शिवाय आर्थिकदृष्ट्या लौकर यशस्वी झाल्यामुळे तत्त्वाचा विसर पडावा असे अनेक ठिकाणी होताना दिसते. यश सुलभतेने मिळाल्यामुळे कार्यक्षमतेवरील कटाक्षही ढळलेला दिसतो. या सर्व समस्यांवर एकच उपाय म्हणजे शिक्षण व चिंतन यावर भर देणे. सहकारी तत्त्वे, त्यांचे व्यावहारिक स्वरूप, सहकारी लोकराज्य निर्मितीकरिता सर्वत्र आवश्यक वृत्ती व पथ्ये यांविषयी सतत विचार व चर्चा होणे व त्यांचे शिक्षण मिळणे हे अत्यावश्यक आहे. संचालक व सभासद, सेवक व तंत्रज्ञ, सर्वांसच तात्त्विक, तांत्रिक व व्यावहारिक शिक्षण योग्य प्रमाणात सतत मिळत राहण्याची दक्षता घेतली पाहिजे.

एका दृष्टीने नवीन समस्या ही प्रगतीचीच लक्षणे आहेत असे मानण्यास हरकत नाही. झपाट्याने जी वाढ झाली त्यातूनच त्या निर्माण झाल्या. पण या बरोबरच हेही लक्षात ठेवले पाहिजे की यावर उपाययोजना वेळीच झाली नाही तर सहकाराची प्रगती खुंटेल अगर त्यातून काही विकृती निर्माण होईल. हा धोका टाळण्याकरिता सतत झटणे हे आपणा सर्वांचे आद्य कर्तव्य आहे.

पुणे विद्यापीठ
दि. १८-२-६७

ध. रा. गाडगीळ

व्याख्यान पहिले

# सहकार–कार्याचा उगम व विस्तार

प्रो. ब्रिजनारायण स्मारक व्याख्याने देण्यासाठी पंजाब विद्यापीठाच्या अधिकारी मंडळींनी मला आमंत्रण दिले, याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. प्रो. ब्रिजनारायण यांच्याशी परिचय होण्याचे सद्भाग्य मला लाभले होते. ते एक तीव्र बुद्धीचे विचारवंत, साक्षेपी विश्लेषक व प्रभावी शिक्षक होते. तसेच ते तळमळीचे कार्यकर्ते होते आणि उदारचरित असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. अशा एका मोठ्या व्यक्तीच्या स्मृतीला या व्याख्यानांच्या रूपाने अभिवादन करण्याची सुसंधी लाभली, याबद्दल मला अतिशय आनंद होत आहे.

या व्याख्यानासाठी मी जो विषय निवडला आहे त्याचा, आपल्या देशात आर्थिक विकास घडवून आणण्याचे जे प्रयत्न चालले आहेत, त्यांची उद्दिष्टे व त्यांत साधावयाची मूल्ये, यांच्याशी निकट संबंध आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर 'सहकारी लोकराज्य' (को-ऑपरेटिव्ह कॉमनवेल्थ) या शब्दप्रयोगाचा आपण वारंवार वापर करीत आलो आहोत; आणि देशातील विविध राजकीय पक्षांच्या व त्यांच्या पुढाऱ्यांच्या म्हणजेच पर्यायाने देशातील बऱ्याच मोठ्या जनसमूहाच्या आकांक्षा त्याने अभिव्यक्त होतात अशी आपली धारणा आहे. परंतु भारतीय गणराज्याच्या घटनेतील शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये सहकारी लोकराज्य या संज्ञेचा उल्लेख आढळून येत नाही. आपल्या देशातील सत्ताधारी राजकीय पक्षानेही आपल्या आर्थिक धोरणाचे उद्दिष्ट समाजवाद किंवा समाजवादी समाजरचना अशाच शब्दांत ठरविलेले आहे. या समाजवादी समाजाची प्रत्यक्ष रचना कशी असावी किंवा त्याची सर्वसाधारण लक्षणे कोणती, याची अजून सुस्पष्ट व्याख्या झालेली नाही. अनेक वेळा सहकारी लोकराज्य व समाजवादी समाज हे शब्दप्रयोग समानार्थक म्हणून वापरले जातात. परंतु 'सहकारी लोकराज्य'

या संज्ञेपेक्षा 'समाजवादी समाज' या शब्दसमुच्चयामुळे पुष्कळच अधिक तीव्र अनुकूल वा प्रतिकूल भावनात्मक प्रतिक्रिया प्रतीत होतात. 'समाजवाद' या शब्दाशी काही खास वाद व कल्पना निगडित आहेत. 'सहकार' याचे तसे विशेष नाही; आणि सहकारी लोकराज्यात काय अभिप्रेत आहे, याचे तपशीलवार विवेचनही कोठे फारसे आढळत नाही.

समाजवादाने प्रामुख्याने उत्पादनसाधनांची मालकी व उत्पन्नाची वाटणी या प्रश्नांवर लक्ष केंद्रित केले आहे. आपला विकास नियोजनपूर्वक साधू पाहणाऱ्या गरीब व अविकसित देशांतील परिस्थितीत हे दोन्ही प्रश्न सोडविणे विशेष अवघड आहे. आधुनिक औद्योगिक अर्थव्यवस्थेमधील आर्थिक सत्तेच्या केंद्रीकरणाची स्वाभाविक प्रवृत्ती कशी टाळावयाची हा मूलत: कठीण प्रश्न नव्याने औद्योगिक प्रगती साधू पाहणाऱ्या अविकसित देशांत विशेषच कठीण होऊन बसतो. त्यातल्या त्यात जेथे राज्यसत्तेमार्फत विकासाचे कार्य आरंभिले व उत्तेजिले जाते तेथे या प्रश्नाची सोडवणूक करणे दुरापास्त होते. भांडवलशाही अर्थरचनेत आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण, निदान औद्योगिक विकासाच्या सुरुवातीच्या काळात तरी, वाढत जाणे अपरिहार्य असते. अविकसित देशांत, तेथील दारिद्र्याचे प्रमाण व व्याप्ती लक्षात घेता, विकासाच्या सुरुवातीच्या काळात लोककल्याणाच्या किंवा समाज-सुरक्षेच्या योजना हाती घेणे व्यवहार्य नसते. पण अशा योजनांच्या द्वारेच मुख्यत: विकसित समाजांमध्ये उत्पन्नाची फेरवाटणी घडवून आणता येते. भारता-सारख्या देशांमध्ये निदान नजीकच्या काळात तरी, या विशिष्ट विषमताविरोधी समाजवादी उपायांचा आपणांस अवलंब करता येणार नाही. शिवाय सामाजिक विषमता ही आपल्याकडे विशेषेकरून शेतकरी समाज व औद्योगिक समाज किंवा ग्रामीण समाज व नागर समाज यांच्या दरम्यान आढळून येते. आपल्या देशात छोटे शेतकरी व भूमिहीन शेतमजूर किंवा त्याहूनही स्थायी शेतकरी वर्गांत न मिसळलेल्या मागास जमाती, हेच खरे आज वंचित व दलित आहेत. शहरी कामगार-वर्ग तत्सम नाही. औद्योगिक कामगार-वर्ग स्वत:च्या नवीन पद्धतीच्या संघटना उभारून आपले सामर्थ्य वाढवू शकतो व त्याच्या जोरावर तो राजकीय क्षेत्रातही आपला प्रभाव पाडू शकतो. ग्रामीण भागांतील वंचित व दुबळ्या वर्गांना यातले काहीच करणे शक्य नसते. म्हणून सर्वसामान्य समाजवादी कार्यक्रम आपल्याकडे निदान नजिकच्या भविष्यकाळात तरी फारसे महत्त्व पावणे शक्य नाही. या परिस्थितीत साधारणपणे सर्वमान्य असा जो सहकाराचा दुसरा मार्ग त्याची कास धरून आपणांस काय साधता येईल याचा विचार करणे युक्त ठरते. गेल्या शे-दीडशे वर्षांमध्ये सहकारी चळवळीची झालेली जागतिक प्रगती आणि तिच्याशी संबद्ध असलेले विचार, तत्त्वज्ञान व व्यवहार यांचे आपण काळजीपूर्वक परिशीलन केल्यास त्यातून आपणांस त्वरित हाती घेण्यासारखा सामाजिक व आर्थिक कार्यक्रम

मिळू शकेल असे मला वाटते. आणि हा कार्यक्रम आपणांस केवळ तात्पुरता उपयोगी पडेल असे नव्हे तर भारतामध्ये त्याची उपयुक्तता निरंतर राहील असा माझा विश्वास आहे. या व्याख्यानमालेमध्ये मी सहकारी चळवळीचा विकास कसा होत गेला याचे थोडक्यात समालोचन करून सहकारी समाजाची कोणती महत्तम लक्षणे त्यातून निष्पन्न होतात हे दर्शविणार आहे आणि या समाजनिर्मितीच्या दिशेने प्रगती करावयाचे मार्ग कोणते, याबाबत विवेचन करण्याचे योजिले आहे.

यांतील पहिल्या व्याख्यानात मी सहकारी चळवळीचे त्रोटक ऐतिहासिक समालोचन करून ज्या देशांमध्ये ती प्रथम सुरू झाली व जेथे तिची विशेष भरभराट झाली तेथील तिचा पूर्वेतिहास, तिची संघटना व कार्यपद्धती इत्यादींबाबत विवेचन करण्याचे योजिले आहे. यामुळे सहकाराची प्रमुख लक्षणे, विस्तार व प्रसरणाची दिशा कळून येणे सुलभ होईल. दुसऱ्या व्याख्यानात सहकारी चळवळीची जेथे प्रामुख्याने सरकारी प्रयत्नांच्याद्वारा वाढ करण्यात आली अशा अविकसित देशांतील या चळवळीच्या इतिहासाचे परीक्षण करणार आहे. या दुसऱ्या व्याख्यानात भारतातील चळवळीकडे विशेष लक्ष पुरविले जाईल. तिसऱ्या व्याख्यानात सहकारी चळवळीच्या विस्ताराच्या सर्वसाधारण मर्यादा कोणत्या हे निर्देशण्याचा प्रयत्न केला जाईल; आणि 'सहकारी लोकराज्य' या संज्ञेत योग्य असा कोणता व्यापक अर्थ अभिप्रेत आहे हे पाहून त्यास अनुरूप अशा प्रवृत्ती, संघटना अगर संस्था यांचा विचार केला जाईल.

पहिल्या ऐतिहासिक समालोचनाच्या व्याख्यानात मी काही निवडक देशांचाच विचार करणार आहे; कारण जगातील निरनिराळ्या देशांत सहकारी चळवळीची वाढ कशी होत गेली याचे सविस्तर परिशीलन करण्याएवढी मला सवड नाही; व ते माझ्या आवाक्याबाहेरचे काम आहे. शिवाय या व्याख्यानाच्या दृष्टीनेही त्याची विशेष गरज नाही. सहकाराची प्रमुख लक्षणे कोणती व कोणत्या विशिष्ट क्षेत्रात ही चळवळ विशेष यशस्वी झाली, एवढेच मला प्रामुख्याने दाखवून द्यावयाचे आहे. काही प्रमुख देशांतील महत्त्वाच्या घडामोडींचा संक्षिप्त आढावा घेऊन हे करिता येते.

या समालोचनास सुरुवात इंग्लंडपासून करणे स्वाभाविक आहे. या देशातच सहकारी चळवळीचा प्रथम उगम झाला आणि येथेच तिने आर्थिक व्यवहाराच्या काही क्षेत्रांत प्रथम मूळ धरले. इंग्लंडचे अग्रेसरत्व केवळ सहकारी व्यवहारातच नव्हे तर सहकारवादी विचारांतही दिसून येते. आधुनिक औद्योगिक क्रांतीच्या प्रथमावस्थेत जी परिस्थिती निर्माण झाली त्यातून सहकाराचा उगम झाला असे मानण्यास हरकत नाही. सहकारी चळवळ ही एका अर्थी प्रतिक्रिया होती. नवीन औद्योगिक समाजातील दोषांचे निराकरण करण्याचा सहकाराने प्रयत्न केला, या दृष्टीने सहकाराचे स्वरूप प्रतिक्रियात्मक होते असे म्हणता येते. ज्या देशांत

औद्योगिक क्रांती प्रथम झाली तेथेच औद्योगिक समाजाच्या समस्या प्रथम निदर्शनास आल्या. या चळवळीचे जनक म्हणून सामान्यपणे मानले जाणारे रॉबर्ट ओवेन यांचे जीवन व कार्य पाहता ही गोष्ट स्पष्ट होते. ओवेनच्या किंवा त्यांच्या समकालीन समाजवादी तत्त्वचिंतकांच्या विचारांशी मला येथे फारसे कर्तव्य नाही. पण ओवेनच्या व त्याच्या अनुयायांनी केलेल्या अनेक प्रयोगांतून सहकाराचे जे एक व्यावहारिक व टिकाऊ रूप बाहेर आले त्याचा आपणांस विचार करावयाचा आहे. इंग्लंडमध्ये इ. स. १८४४ मध्ये आधुनिक सहकारास सुरुवात झाली; ती रॉचडेल पायोनियर्स यांनी टोड गल्लीत स्थापन केलेल्या सहकारी ग्राहक भांडाराने केली असे सर्वसाधारणपणे मानले जाते. रॉचडेल पायोनियर्स हे औद्योगिक मजूर वर्गापैकी होते व औद्योगिक क्रांतीने नव्याने निर्माण केलेल्या नागर परिसरात ते राहत होते. तथापि त्यांनी प्रथम ज्या प्रश्नात लक्ष घातले ते, नवीन उद्योगधंद्यांशी संबंधित नव्हते किंवा मालक-मजूर संबंधांबाबतच्या वेगळ्या चळवळीने हाताळलेल्या, नवनिर्मित प्रश्नांविषयींचे नव्हते. तत्कालीन औद्योगिक मजुरांस लहान-मोठे व्यापारी लुबाडीत असत व त्यामुळे त्यांचे नित्याचे जीवन कठीण झाले होते. या समस्येपासून रॉचडेल पायोनियर्सनी सुरुवात केली. आपल्या मिळकतीच्या पैशातून स्वतःच्या कुटुंबाच्या गरजा शक्य तितक्या पूर्णपणे भागविल्या जाव्यात एवढेच त्यांचे मर्यादित उद्दिष्ट होते. समान परिस्थितीतील लोकांनी एकत्र येऊन एकमेकांच्या सहकार्याने व्यापाऱ्यांकडून होणारे शोषण थांबविण्याचे त्यांनी ठरविले. रॉचडेल पायोनियर्स यांनी स्थापन केलेल्या भांडाराच्या आधीही या दिशेने बरेच प्रयत्न करण्यात आले होते, हे सर्वमान्य आहे. रॉचडेल पायोनियर्स यांचे वैशिष्ट्य हे की केवळ एक दुकान काढून व ते किफायतशीरपणे चालवून त्यांनी प्राप्त परिस्थितीवर मात केली; एवढेच नव्हे तर असे करताना सहकाराची मूलतत्त्वे व व्यवहारपद्धती शाश्वत पायावर प्रस्थापिली. ही मूलतत्त्वे पुढे जगात सर्वत्र मान्यता पावली. रॉचडेल पायोनियर्सनी मांडलेल्या व त्यांनी आपल्या नियमांत व आचारात प्रत्यक्ष ग्रथित केलेल्या मूलतत्त्वांचे प्रो. कोल यांनी पुढीलप्रमाणे सारांशाने विवेचन केले आहे:—

"ही तत्त्वे अशी : पहिले म्हणजे लोकशाही नियंत्रण. प्रत्येक सभासदाला एक मत राहील. व्यापारी मंडळ्यांप्रमाणे प्रत्येकास त्याने गुंतविलेल्या भांडवलाच्या प्रमाणात मते राहणार नाहीत. दुसरे, सभासदत्व सर्वांना खुले राहील. यामुळे कोणालाही निदान नियोजित संख्यापूर्ती होईपर्यंत सभासद होता येते व प्रत्येकाचे हक्क व अधिकार पहिल्या सभासदाइतकेच राहतात. तिसरे, सहकारी संस्थेत जे भांडवल गुंतवलेले असेल त्यावर फक्त ठराविक, मर्यादित व्याज द्यावयाचे. चौथे, संस्थेचा एकंदर खर्च व मुद्दलावरील व्याज भागवून जे जादा उत्पन्न राहील त्याची वाटणी सभासदांमध्ये त्यांच्या खरेदीच्या

(संस्थेच्या दुकानातून केलेल्या) प्रमाणात करावयाची. पाचवे, सर्व व्यवहार रोखीने करावयाचा व उधारी बिलकुल द्यावयाची नाही. सहावे, केवळ शुद्ध व बिनभेसळीचा माल विकणे. सातवे, सभासदांना सहकारी तत्त्वांचे शिक्षण देणे आणि तसेच परस्परांशी व्यापार व्यवहार करण्यास शिकविणे. आठवे, राजकीय व धार्मिक प्रश्नांत संपूर्ण अलिप्तता."[१]

यांपैकी काही तत्त्वांविषयी मी येथे थोडक्यात खुलासा करतो. सर्व सभासद, श्रीमंत वा गरीब, भांडवलाचा मर्यादित पुरवठा जवळ जवळ सारख्याच प्रमाणात करीत. व्यक्तिगत सभासदाच्या भाग-भांडवलास एक कमाल मर्यादा घातलेली होती. त्यामुळे कोणाही व्यक्तीचा संस्थेच्या भांडवलात मोठा हिस्सा राहत नसे. तसेच भांडवलावर द्यावयाच्या व्याजाचा दर बुद्धि-पुरस्सर कमी ठेवल्यामुळे ते गुंतविणाऱ्या भागीदाराला विशेष फायदाही काढता येत नसे. तसेच एका सभा-सभासदाला एकच मत, मग त्याचे केवढेही भाग भांडवल असो. या नियमात सहकारी चळवळीचा समतेकडील मूलभूत ओढा दिसून येतो.

नफ्याच्या वाटणीची पद्धती ही भांडवलावर कमी प्रमाणात पण ठराविक व्याज देण्याच्या तत्त्वाशी निगडित होती. तत्कालीन समाजवादी तत्त्वप्रणालीस अनुसरून, उत्पन्न व खर्च यांमधील फरक म्हणजे नफा, असे भांडवलदारी व्यवसायाप्रमाणे न मानता या फरकास विशेषार्थाने वाढावा (सरप्लस) असे म्हणत; आणि वसूल झालेल्या भागभांडवलावरील व्याज व राखीव निधी इत्यादींसाठी विशिष्ट तरतूद करून जी रक्कम उरेल ती सभासदांमध्ये लाभांश (डिव्हिडंड) म्हणून वाटली जात असे. लाभांशाची वाटणी सभासदांनी संस्थेच्या भांडारातून ज्या प्रमाणात खरेदी केली असेल त्या प्रमाणात होत असे. असे केल्याने सहकार्यावर योग्य भर दिला जाई. ज्या अर्थी सहकाराच्या मार्गाने विशिष्ट व्यवहार करण्यासाठी किंवा काही सेवा उपलब्ध करून घेण्यासाठी सहकारी संस्थांत लोक येतात, त्या अर्थी ज्या प्रमाणात या सहकारितेत ते भाग घेतात त्या प्रमाणातच सहकारी व्यवहाराच्या लाभांशाचा त्यास वाटा मिळावा अशी ही स्वाभाविक तरतूद होती.

सुरुवातीच्या काळात महत्त्व पावलेली आणखी एक बाब म्हणजे सर्व व्यवहार रोखीने करावयाची पद्धत. प्रत्यक्ष सहकारी समाजवादाच्या तत्त्वप्रणालीतून ही व्यवहारपद्धती जरी निघाली नसली तरी तिला एका तत्त्वाचे स्थान देण्यात आले होते. तत्कालीन परिस्थितीत आवश्यक व्यवहाराचा प्रमुख दंडक म्हणून तिचे महत्त्व फार होते. उधारीच्या पद्धतीमुळे कारागीर-मजूर वर्गावरील सावकार-व्यापारी वर्गाची पकड दृढ झाली होती. काही दुकानदार तर उधारीच्या अटी फार सैल करून ग्राहकांच्या बेसावध व्यवहारास विशेष उत्तेजन देत. आपली कुवत

---

१. कोल : ए सेंचरी ऑफ को-ऑपरेशन (१९४५) पृ. ६३-६४.

ओळखून जबाबदारीने खरेदी करण्याची सभासदांना सवय लागावी यासाठी ग्राहक सहकारी भांडारांनी सुरुवातीपासून रोखीने व्यवहार करण्याचा नियम अगदी कटाक्षाने पाळला आणि पुढे त्याचे सर्वत्र अनुकरण होत गेले. अपवाद म्हणून अलीकडे रूढ झालेल्या काही पद्धती सोडल्या तर इंग्लंडमधील सहकारी चळवळीत या नियमाचे आजतागायत पालन होत आले आहे. सभासदांना घरपोच होणाऱ्या दूध, पाव इत्यादींसारख्या मालाच्या बाबतीत किंवा काही गृहोपयोगी टिकाऊ साधनांच्या बाबतीत हप्तेबंदीने होणारे खरेदी-व्यवहार एवढेच यास अपवाद म्हणता येतील.

सहकारी ग्रामसमाज, सहकारी कारागिरी, परस्पर साहाय्यक मजूरसंस्था इत्यादी अनेक प्रकारच्या तत्कालीन सहकारी उद्योगांपैकी ग्राहक सहकारी भांडार हा एक प्रकार होता. वर्धिष्णु भांडवलशाहीस आव्हान देऊन अन्य जास्त इष्ट अर्थव्यवस्था प्रस्थापित करणे हे या सर्वांचे उद्दिष्ट होते. रॉचडेल पायोनियर्सचे वैशिष्ट्य हे की, त्यांनी आपल्या कार्याची उभारणी पूर्वीचे अपयश लक्षात घेऊन केली, विद्यमान परिस्थितीत यशस्वी होण्याची जास्तीत जास्त शक्यता असलेले कार्यक्षेत्र निवडले आणि आपले सर्व विचार व तत्त्वे सभासदांनी व भांडारांनी पाळावयाच्या नियमावलीत प्रत्यक्ष उतरविली. यामुळे सहकाराच्या तत्त्वज्ञानास मूर्त स्वरूप मिळून सहकारी चळवळीस यश प्राप्त झाले. १९ व्या शतकाच्या मध्याच्या सुमाराची युरोपातील अशांतता व खळबळ संपल्यानंतर सहकारी ग्राहक भांडार एवढे एकच शाश्वत फळ या सर्व मंथनांतून उरले.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्लंडमध्ये या ग्राहक भांडारांची अगर ग्राहक सहकारी चळवळीची जोराने वाढ झाली. ही वाढ विविध स्वरूपाची होती. किरकोळ विक्री करणाऱ्या सहकारी संस्थांची संख्या वाढली, प्रत्येक सहकारी संस्थेच्या दुकानांची संख्या वाढली आणि या दुकानांत बहुविध प्रकारचा माल दिसू लागला. मात्र संस्थांचे सभासद बव्हंशी कामगार वर्गातील राहिले आणि त्यांचे पुढारीपणही विशेषतः स्थानिक पुढारीपण, त्याच वर्गातील राहिले. सहकारी संस्थांच्या व दुकानांच्या वाढीपेक्षा सहकाराने घाऊक व्यापाराच्या क्षेत्रात जे यानंतर पदार्पण केले ते अधिक महत्त्वाचे ठरले.

किरकोळ विक्री करणाऱ्या सहकारी संस्थांनी एकत्र येऊन व सभासद बनून आपल्या घाऊक सहकारी संस्था स्थापन केल्या व संलग्न किरकोळ भांडारांच्या खात्रीच्या व वाढत्या गिऱ्हाइकीमुळे घाऊक भांडारांचा व्यवहार जलदीने वाढत गेला. जसजसे त्यांचे कार्यक्षेत्र व व्यवहार वाढत गेले तसतसे एकातून दुसरे असे अनेक व्यवहार प्रकार निर्माण होत गेले. हळूहळू या घाऊक संस्था परदेशात खरेदी करून माल कोठारे उभारू लागल्या. आयातीसाठी पुढे त्यांनी स्वतःचे नाविकदलही उभारले आणि सहकारी बँकिंगच्या क्षेत्रात पदार्पण केले. शेवटी

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे प्रत्यक्ष उत्पादन कार्य या संस्थांनी हाती घेतले. किरकोळ विक्री-भांडारांतून ज्या मालास मागणी असे तो माल निर्माण करण्याचे उद्योग त्यांनी साहजिकच हाती घेतले. विशेषत: ज्या मालाची मागणी मोठ्या प्रमाणावर स्थिर व ठराविक नमुन्याची होती अशाच मालाचे उत्पादन त्यांनी हाती घेतले. इंग्लंडमधील या घाऊक संस्थांनी, आपल्या स्थापनेपासूनच्या काही दशकांतच, स्वत:च्या पिठाच्या चक्क्या काढल्या आणि कोको व चॉकलेट, बूट व इतर पादत्राणे, कापड, साबण, फर्निचर इत्यादी मालाच्या निर्मितीचे कारखाने उभारले.

या घाऊक संस्थांची संघटना व कारभार मूळ ही किरकोळ ग्राहक भांडारांच्या तत्त्वावरच आधारलेली होती. घाऊक संस्था ही ग्राहक भांडारांनी बनविलेली व मुख्यत: त्यांच्या मालकीची होती. पण तिच्या सभासदांमध्ये काही शेती सहकारी संस्था व कामगार सहकारी उत्पादन संस्थाही असत. ग्राहक भांडारांचे या घाऊक संस्थांमधील भाग-भांडवल त्यांच्या सभासद-संख्येच्या प्रमाणात राही. मात्र किरकोळ भांडारे घाऊक संस्थेतून ज्या प्रमाणात माल खरेदी करीत त्या प्रमाणात त्यांना घाऊक भांडारात मताधिकार मिळे.

या घाऊक सहकारी संस्थांची वाढ इतर विविधांगी खाजगी व्यापारी संस्थांच्या वाढीच्या धर्तीवरच झाली. आपला व्यवहार वाढावा व सुरक्षित राहावा म्हणून महत्त्वाच्या विक्रीच्या मालाची आयात, उत्पादन वगैरे त्यांनी हाती घेतले. ब्रिटन-मधील मोठे घाऊक व्यापारी या नात्याने परदेशांशी संबंध ठेवणे व मालाची मोठ्या प्रमाणात आयात करणे याकडे त्यांना विशेष लक्ष पुरवावे लागे. परदेशांशी होणारा त्यांचा व्यवहार तेथील सहकारी उत्पादकांशी अगर सहकारी व्यापारी संस्थांशीच पूर्णपणे होत नसला तरी परदेशी सहकारी संस्थांशी त्यांचे अनेकविध संबंध असत. कोणतीही सहकारी संस्था आपले सर्व व्यवहार अन्य सहकारी संस्थेशीच करू शकेल अशी परिस्थिती नेहमी असतेच असे नाही. कारण आपल्या संस्थेतील सभासदांना लागणाऱ्या सर्व मालाचा अगर वस्तूंचा पुरवठा अन्य सहकारी संस्थेकडून होईल असे नसते. शिवाय काही वेळा खाजगी व्यापाऱ्यांनी अगर उत्पादकांनी तयार केलेला विशिष्ट माल किंवा विशिष्ट छापाच्या वस्तू सभासदांना हव्या असतात. म्हणून घाऊक सहकारी संस्थांनी शक्यतोवर अन्य सहकारी संस्थेशीच व्यापार-व्यवहार करण्याचे धोरण ठेवले तरी तो एक अनुल्लंघनीय नियम असे मानून त्याचे पालन नेहमीच त्यांना करता येत नाही. सभासदांची आवड व संस्थेचा आर्थिक फायदा लक्षात घेऊन कमी–अधिक प्रमाणात खाजगी उत्पादक व्यापाऱ्यां-शीही त्यांना व्यवहार करावा लागतो.

अशाच प्रकारे किरकोळ ग्राहक भांडारेही त्यांना लागणाऱ्या सर्व वस्तू घाऊक सहकारी भांडारांतून घेतीलच असे नाही. एकतर या किरकोळ भांडारांना लागणारा सर्वच माल घाऊक सहकारी संस्थेकडे नसतो. तसेच काही वेळा सोईच्या दृष्टीने

किंवा किफायतशीर व्यवहाराच्या दृष्टीनेही किरकोळ भांडारे घाऊक सहकारी भांडारांशी व्यवहार न करता एखाद्या खाजगी उत्पादकाशी अगर व्यापाऱ्याशी व्यवहार करतात असेही घडू शकते. घाऊक सहकारी भांडारांचे समासद झाल्यामुळे किरकोळ भांडारांनी आपणास लागणारा सर्व माल त्यांचेकडूनच घेतला पाहिजे असे त्यांच्यावर बंधन नसते व अशा नियमांची त्यांच्यावर सक्तीही करता येत नाही.

सहकारी घाऊक व्यापारी संस्था जेव्हा उत्पादनाच्या क्षेत्रात शिरल्या तेव्हा ग्राहक सहकारी संस्थांचे उत्पादक संस्थांशी संबंध, तसेच त्यांचे आपल्या कारखान्यातील मजुरांशी संबंध काय असावेत इत्यादी अनेक प्रश्न साहजिक उद्‌भवले. परंतु ग्राहक संस्थांनी मुख्यत: ग्राहकाचेच हित पाहावयाचे हा दृष्टिकोन याच्या आधीच इंग्लंडमध्ये प्रस्थापित झाला होता. मूळ दृष्टिकोन अधिक व्यापक होता. खुद्द रॉचडेल पायोनियर हे ग्राहक संस्था या अनेक सहकारी संस्था-प्रकारांत अग्रेसर, एवढेच मानीत असत, आणि त्यांच्या मूळ नियमावलीत 'स्वावलंबी संयुक्त सहकारी वसाहत स्थापणे' या उद्दिष्टाचा त्यांनी समावेश केला होता. ग्राहक सहकारी संस्था मोठ्या प्रमाणात वाढल्यावर ही दृष्टी बदलली आणि ग्राहकाचे हितच सर्वश्रेष्ठ हे तत्त्व स्वीकारण्यात आले. असे झाल्यामुळे घाऊक व्यापारी सहकारी संस्था उत्पादक बनण्याने उत्पादन-क्षेत्र अगर त्यातील सामाजिक व आर्थिक हितसंबंध यात काही फरक पडला नाही. खाजगी व्यापाऱ्याने शेती व कारखाने यांचा ताबा वा मालकी मिळवावी याहून काही निराळे, सहकारी व्यापारी संस्थांनी आपणांस लागणाऱ्या मालाच्या उत्पादनास सुरुवात केल्यामुळे घडले नाही.

ग्राहक सहकारी संस्थांच्या दुकानांतून त्यांचे समासद असलेल्यांना तसेच नसलेल्यांनाही माल विकत मिळे. तथापि समासद नसलेल्या गिऱ्हाइकांस भांडारात खरेदी करण्यास सुरुवात केल्यावर थोड्याच काळात भाग घेऊन समासद होण्याबाबत सर्वसाधारणपणे विनंती केली जाई. भागही साधारणपणे अल्प किंमतीचा (उदाहरणार्थ एक पौंडाचा) असे.

ब्रिटिश सहकारी ग्राहक संस्थांचे माल-विक्रीच्या किंमतीबाबतचे परंपरागत धोरण चालू बाजारभावाप्रमाणे मालविक्री करणे असेच आहे. चालू बाजारभावाने मालविक्री केल्यानंतर जो नफा राही तो भांडवलावरील ठराविक व्याज व गंगाजळीची रक्कम वजा करून समासदांना लाभांश म्हणून वाटला जाई. चालू बाजारभावाने मालविक्री करण्याचे हे धोरण प्रारंभीच्या काळात उपयुक्त ठरले. कारण त्यामुळे सहकारी भांडारांच्या व्यवहारास एक प्रकारे निश्चित मार्गदर्शन मिळाले. पण पुढील काळामध्येही हे धोरण बदलले नाही. याचे कारण ब्रिटिश सहकारी संस्था कोणत्याही विशिष्ट व्यवहाराच्या क्षेत्रात वस्तूंच्या किंमती ठरविण्याबाबत पुढाकार घेण्याइतक्या प्रभावी झाल्या नाहीत. ज्या अर्थी

सहकारी भांडारे आपणांस लागणारा माल खाजगी उत्पादक अगर व्यापारी यांजकडून, प्रत्यक्षाप्रत्यक्षरीतीने खाजगी दुकानदाराप्रमाणेच मिळवीत, त्या अर्थी या मालाच्या किमतीबाबत स्वतंत्र धोरण आखण्याचे सामर्थ्य त्यांच्यापाशी नव्हते. तसेच ब्रिटनमधील मालाच्या उत्पादनात सहकारी क्षेत्रातील उत्पादन सर्वत्र अल्प होते. यामुळे सर्व सहकारी व्यवहारात बाजारभावास धरून चालण्याखेरीज गत्यंतर नव्हते.[१] हेच इतर व्यवहार व भाव यांविषयी घडले. उदाहरणार्थ, सहकारी उत्पादकांना द्यावयाच्या किमतीबाबत किंवा कामगारांना द्यावयाच्या मजुरीबाबत ग्राहक सहकारी संस्थांनी खाजगी व्यापाऱ्यांपेक्षा कोणतेही वेगळे धोरण स्वीकारण्याचा प्रयत्न केला नाही. एक चांगला मालक याहून अधिक लौकिक या घाऊक सहकारी संस्थांनी मिळवला नाही.

ब्रिटनच्या सहकारी चळवळीतील ग्राहक सहकाराची प्रगती २० व्या शतकाच्या सुरुवातीपूर्वीच विशेष झाली होती. विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या दोन दशकांतही प्रगती मोठ्या प्रमाणात होत राहिली. ग्राहक सहकारी दुकानांच्या एकंदर वार्षिक विक्रीचे आकडे आणि ब्रिटनमध्ये भोग्य वस्तू व सेवाकर्मे यांवर होणाऱ्या एकंदर वार्षिक खर्चातील ग्राहक सहकारी संस्थांचा वाटा या दोन्हीं-वरूनच ही प्रगती अजमावता येते. असा अंदाज करण्यात आला आहे की, इंग्लंड-मध्ये १९०० साली भोग्य वस्तू व सेवाकर्मे यांच्यावर जो एकूण राष्ट्रीय खर्च झाला त्यांपैकी ३ टक्के खर्च ग्राहक सहकारी भांडारांमार्फत होणाऱ्या विक्रीचा होता. १९२० साली हे प्रमाण ५ टक्क्यांच्यावर गेले होते. १९२० नंतर मात्र ही प्रगती मंदावली. १९३८ साली एकूण या प्रकारच्या राष्ट्रीय खर्चामध्ये सहकारी भांडारां-मार्फत होणाऱ्या विक्रीचा भाग सुमारे ६ टक्केपर्यंत राहिला आणि त्यापुढील २० वर्षांत तो ७ टक्क्यांपेक्षा अधिक वर जाऊ शकला नाही. यावरून हे दिसून येते की ग्रेट ब्रिटनमध्ये १९२० नंतर सहकारी ग्राहक संस्था इतर स्पर्धकांच्या मानाने विशेष प्रगती सतत करू शकल्या नाहीत.

राष्ट्रीय किरकोळ विक्रीच्या एकंदर व्यवहारातील प्रमाणाबाबत सहकारी संस्थांनी अलीकडे विशेष वेगाने प्रगती केली नाही. एवढेच नव्हे तर सहकारी विक्री-व्यवहाराची व्याप्तीही मर्यादितच राहिली. दूध, मांस, अंडी, पाव, मिठाई, किराणा, मासळी, फळफळावळ, भाजीपाला इत्यादी दैनंदिन गरजेच्या वस्तूंच्या बाबतच सहकारी विक्रीचा भाग आज सर्वांत मोठा आहे. त्यांच्या खालोखाल कोळशाची बरीचशी विक्री सहकारी कक्षेत आहे. परंतु इतर आवश्यक वस्तू—उदाहरणार्थ कापड, पादत्राणे, औषधे, टिकाऊ गृहोपयोगी वस्तू–यांच्याबाबत सहकारी विक्रीचे प्रमाण कमी होते. आणि अलीकडच्या काळामध्येही त्यात फारशी

---

१. नॉक्स : दि को-ऑपरेटिव्ह मूव्हमेंट अॅण्ड मोनॉपॉली इन ब्रिटन ( १९५७ ).

वाढ झाल्याचे दिसून येत नाही. ग्राहक सहकारी चळवळीला इंग्लंडमध्ये कामगार-वर्गाचा जोराचा पाठिंबा होता आणि त्यांच्याच पाठिंब्यावर ती तेथे प्रबळ होत गेली. कालपरत्वे तिचा जोम कमी झाला आणि सहकारी विक्रीचे क्षेत्र दैनंदिन गरजेच्या काही वस्तूंपुरतेच मर्यादित राहिले ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे.

घाऊक सहकारी संस्थांचीही अलीकडच्या काळात म्हणण्यासारखी वाढ झाल्याचे दिसून येत नाही. किरकोळ विक्रीची ग्राहक भांडारे आपणांस लागणारा बहुतेक माल घाऊक सहकारी संस्थांकडून घेतात. फारच थोडा माल इतर सहकारी संस्थांकडून खरेदी करतात. ग्राहक सहकारी भांडारे आपल्या एकूण खरेदीपैकी अवघी एक टक्का खरेदी उत्पादक सहकारी संस्थांकडून करितात आणि ती सर्व अखाद्य वस्तूंची. ग्राहक सहकारी भांडारे त्यांना लागणाऱ्या एकूण मालापैकी ३० टक्के मालाची खरेदी सहकारी-कक्षेबाहेरून करीत. घाऊक सहकारी संस्था ग्राहक सहकारी भांडारांना करावयाचा मालपुरवठा थोडाफार स्वतःच्या उत्पादनांतून करीत. काही विशिष्ट वस्तूंचेच या घाऊक संस्था उत्पादन करीत. ग्राहक सहकारी भांडारांच्या एकूण विक्रीपैकी सुमारे १६ टक्के विक्री घाऊक सहकारी संस्थांनी उत्पादन केलेल्या मालाची असे. हे उत्पादन प्रामुख्याने खाद्यपदार्थ व तंबाखू, कापड व पादत्राणे, गृहोपयोगी फर्निचर व लोहार-माल यांचे असे. ग्राहक सहकारी भांडारांना लागणाऱ्या खाद्यवस्तूंचा बहुतेक पुरवठा घाऊक सहकारी संस्थांकडून होत राहिला तरी अखाद्य वस्तूंचे पुरवठ्याबाबत ही परिस्थिती अलीकडे बदलल्याचे दिसून येते. विशेषतः गृहोपयोगी सरंजाम व लोखंडी माल, तसेच विजेची उपकरणे, यांचा पुरवठा त्यांचेकडून पूर्वीच्या प्रमाणांत होत नाही. अलीकडे ग्राहक सहकारी भांडारे आपणांस लागणारा असला माल बऱ्याच मोठ्या प्रमाणात सहकारी क्षेत्राबाहेरून आणू लागली आहेत. घाऊक संस्थांच्या तौलनिक अकार्यक्षमतेचे हे लक्षण मानावे लागते. शिवाय सहकारी घाऊक संस्थांचे आजचे उत्पादनसामर्थ्य युद्धकालापूर्वीपेक्षा खूपच वाढले आहे. याचा अर्थ असा की, यशस्वी घाऊक सहकारी संस्थांच्या मालकीचे कित्येक कारखाने आज पूर्ण वेळ चालू शकत नाहीत आणि त्यांच्या उत्पादनक्षमतेचा योग्य प्रमाणात उपयोग होत नाही.

ग्रेट ब्रिटनमधील सहकारी चळवळीचे समीक्षण केले असता प्रामुख्याने पुढील गोष्टी नजरेस येतात:— ही चळवळ बरीच प्रबळ होऊन तिने बरेच मोठे क्षेत्र लवकर व्यापले असले तरी आता तिची विशेष वाढ होत नाही. शिवाय हिचा विकास समावेशक किंवा सर्वांगीण सहकार्याच्या दिशेने झालेला अगर होताना दिसून येत नाही. याविषयी चौकशी करण्यासाठी नेमलेल्या सहकारी स्वतंत्र समितीने (को-ऑपरेटिव्ह इंडिपेंडंट कमिशन) गोळा केलेल्या माहितीच्या आधारेच वरील विवेचन केले आहे. या कमिशनने असे दर्शविले आहे की, ब्रिटनमधील सहकारी उपक्रमामागे सर्वांच्या समान भागीदारीची नवीन उत्पादन-पद्धती

उभारणे असा विचार किंवा प्रेरणा बिलकुल दिसून येत नाही. आणि म्हणून या कमिशनने असा निष्कर्ष काढला की, ब्रिटनमधील घाऊक सहकारी संस्थांच्या भविष्यातील उत्पादन-कार्यक्रमाविषयी निर्णय घेताना आदर्श अर्थव्यवस्थेची निर्मिती अगर एकंदर सहकारी उत्पादनक्षेत्र वाढविण्याची इष्टता असल्या कल्पना जमेस धरता येत नाहीत. परिणामी इंग्लंडमधील सहकारी चळवळीने वेगवेगळ्या प्रकारचे उत्पादन हाती घेऊन आपली उत्पादनकक्षा वाढविण्याऐवजी ती संकुचित करणे आणि उपलब्ध भांडवलाची गुंतवणूक अधिकाधिक प्रमाणावर आपल्या घाऊक विक्री व्यवहारात सुधारणा घडवून आणण्यासाठी किंवा किरकोळ सहकारी भांडारांची कार्यक्षमता वाढविण्यासाठीच करणे श्रेयस्कर होईल, अशी या स्वतंत्र कमिशनने शिफारस केली.

सहकारी चळवळ इंग्लंडमध्येच जन्मास आली म्हणून व तेथेच तिची मूलभूत तत्वप्रणाली अगोदर ठरली गेली म्हणून याबाबत थोडे विस्ताराने विवेचन केले आहे.

सुरुवातीच्या काही दशकांत फ्रान्समधील सहकाराचा वाटा ध्येयवाद व तात्त्विक भूमिका यांत भर घालण्याचे दृष्टीने विशेष उल्लेखनीय होता. फ्रेंच विचारप्रणालीस सेंट सायमनपासून सुरुवात झाली; फोरियरच्या काळात तिची वाढ झाली व तीस अनुसरून सहकारी जीवनाच्या दिशेने बरेच प्रयोग करण्यात आले. यांतील काही प्रयोग नव्या जगात म्हणजे अमेरिकेत ग्रामसमाज स्थापून करण्यात आले. काही खुद्द युरोपमध्ये करण्यात आले. विशिष्ट क्षेत्रातील सहकारी व्यवहाराच्या दिशेने एक महत्त्वाचा प्रयोग या अर्थाने फ्रान्समध्ये स्थापन झालेल्या कामगार सहकारी संस्थांना किंवा सहकारी उद्यमालयांना बरेच महत्त्व आहे. १८४८ च्या क्रांतीच्या काळात या सहकारी उद्यमालयांना अगर कामगार सहकारी संस्थांना एकदम महत्त्व आले. एक निष्ठावंत सहकारवादी व बुशेचा शिष्य लुई ब्लां मंत्री झाला त्यामुळे ही गोष्ट घडून आली. या वेळी सरकारी मदतीने सहकारी उद्यमालयांची प्रस्थापना व परिपोष होऊ लागला. अर्थात् क्रांती संपुष्टात आल्यानंतर लगेच ती सर्व कोलमडली. परंतु त्यांनी दिलेली प्रेरणा व ध्येयवाद ही मात्र टिकून राहिली. गूर्डे या ओवेनसारख्या एका ध्येयवादी व दातृत्वशील उद्योगपतीच्या प्रयत्नांनी फोरियरच्या फॅलॅन्स्टरीच्या धर्तीवर एक औद्योगिक सहभागीदारी प्रस्थापित करण्यात आली व ती आजतागायत चालू राहिलेली आहे. ही अपवादात्मकच राहिली, यावरून कामगारांच्या उत्पादक सहकारी संस्था स्थापन करण्याच्या बाबतीत अडचणी येतात हा सार्वत्रिक नियमच सिद्ध होतो. एखाद्या विशिष्ट कारागिरीच्या अगर उद्योगाच्या मर्यादित क्षेत्रातील गरीब उत्पादकांच्या या संघटना असतात. अपुऱ्या भांडवलाची अडचण त्यांना सतत भासते. आणि त्यांच्या उत्पादक कामगार सभासदांना व्यापार-व्यवहाराचे पुरेसे ज्ञान किंवा कसब अवगत

नसते. त्यामुळे बाहेरून इतरांनी साहाय्य केल्याखेरीज त्यांना टिकाव धरणे कठीण होते. तसेच आधुनिक कारखानदारीत मोठ्या प्रमाणावर श्रमविभाग व प्रक्रियांची विभागणी झाली असल्यामुळे एका विवक्षित कारागिरीतील कसबी कामगार सहसा स्वतःच्या पायावर पूर्णपणे उभे राहू शकत नाहीत. त्यांना बाहेरची मदत अवश्य लागते. ज्या ठिकाणी ते टिकाव धरून यशस्वी झाले आहेत तेथे त्यांना बाहेरून भांडवल-पुरवठ्याच्या मार्गाने आणि त्यांच्या मालाला खात्रीचे गिऱ्हाईक मिळवून देण्याच्या मार्गाने सतत मदत होत आली आहे असे दिसून येते. फ्रान्समध्ये बरीच उद्यमालये यशस्वी झाली, याला कारण तिथल्या सरकारची अशा प्रकारच्या अनेक सहकारी उद्यमालयांना सतत मदत होत राहिली हे होय. उदाहरणार्थ, सूक्ष्म मापनाची शास्त्रीय यंत्रसामग्री बनविणाऱ्या, तसेच शिंप्यांच्या अगर तयार कपड्यांच्या सहकारी कारखान्यांना फ्रेंच सरकार सतत मदत करीत आले आहे. इंग्लंडमध्ये सहकारी उत्पादक उद्योगांना अशाप्रकारची मदत तेथील ग्राहक सहकारी भांडारांकडून मिळालेली आहे. इंग्लंडमध्ये असले उद्योग प्रामुख्याने कापड, बूट-जोडे व छापखाने हे आहेत.

जर्मनीमध्ये या चळवळीची सुरुवात प्रथम ग्रामीण व नागर कर्जपुरवठ्याच्या क्षेत्रात होऊन तेथे तिने चांगले मूळ धरले. ऱ्हाईनलँडमधील एका ग्रामसमूहाचे बर्गोमास्टर (सरपंच) रायफीसेन यांनी शेतकऱ्यांना एकमेकांच्या जामिनकीवर कर्ज मिळवता येते ही गोष्ट पहिल्याने सिद्ध केली. जर्मनीतील शेतकरी वर्ग पैशासाठी सावकार-व्यापारांवर सतत अवलंबून असे. शिवाय कृषि-उत्पादनातील अनेक धोक्यांना व संकटांना शेतकऱ्यांना सतत तोंड द्यावे लागे, त्यामुळे दैन्य व दारिद्र्यातून त्यांचे डोके कधी वर निघू शकले नाही. शेतकऱ्यांचा हा प्रश्न कसा सोडवावयाचा हाच विचार प्रामुख्याने रायफीसेनच्यापुढे होता. त्यांनी ज्या वेळी सहकारी संस्था उभारली त्या वेळी तिचे मूळ संस्थापक-सदस्य अतिशय दरिद्री असल्यामुळे संस्थेला समासदांचे असे काही भांडवल जमविता आले नाही. अनेक रायफीसेन संस्थांचे सुरुवातीचे भांडवल बाहेरून आलेले होते आणि रायफीसेन-सारख्या दातृत्वशील लोकांनी ते पुरविले होते, ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. रायफीसेन धर्तीच्या सहकारी संस्थांच्या विचारप्रणालीत बाहेरच्या ठेवीदारांना जे स्थान होते त्याचा उलगडा या पूर्वेतिहासावरून होतो. रायफीसेन सहकारी संस्थांसाठी जी आदर्श नियमावली तयार करण्यात आली, तीत "या संस्थेचा उद्देश आपल्या समासदांच्या नैतिक व भौतिक परिस्थितीत सुधारणा घडवून आणणे हा आहे," असे नमूद केले आहे. ही सुधारणा घडवून आणण्यासाठी सुचविलेला मुख्य मार्ग म्हणजे "कर्ज-पुरवठा करण्यासाठी लागणारे भांडवल सामुदायिक हमीवर-जामिनकीवर-उभारून त्यातून समासदांना धंद्याच्या वाढीसाठी किंवा घरखर्चासाठी लागणाऱ्या कर्जाचा पुरवठा करणे" हा होता. सामु-

दायिक हमी ही यातील मूलभूत कल्पना असून ती शेजारधर्मावर–शेजाऱ्यांमध्ये असणारा परस्परांबद्दलचा विश्वास व परस्परांची माहिती यांवर –प्रामुख्याने आधारलेली होती. सामुदायिक हमीच्या या कल्पनेतूनच पुढे 'अनियमित जबाबदारीची' (अनलिमिटेड लायाबिलिटी) ची कल्पना उदयास आली. खरे पाहिले तर 'अनियमित जबाबदारी' हा काही त्या काळी नवा शोध नव्हता. रायफीसेनच्या काळात जर्मनीमध्ये व्यापार-उद्योगासाठी उभारण्याच्या भांडवलाबाबत 'अनियमित जबाबदारी'च सर्वत्र रूढ होती. सार्वजनिक भांडवलाच्या व्यापारी संस्थांच्या (मंडळचांच्या) कायद्यात 'नियमित जबाबदारी'च्या कल्पनेचा समावेश होण्यापूर्वी भागीदारीबाबत किंवा भागीदारी मंडळींच्या देण्याघेण्याच्या व्यवहाराबाबत सर्व देशांमध्ये त्या काळी 'अनियमित जबाबदारी' हीच रूढ होती. रायफीसेन संस्थांतून विशिष्ट कामासाठीच कर्जे दिली जात आणि ते काम उत्पादक असावे लागे. ही कर्जे अल्प मुदतीची किंवा मध्यम मुदतीची असत. दीर्घ मुदतीची अगर गहाणावरील कर्जे दिली जात नसत. कोणत्याही प्रकारचे कर्ज असो, त्यासाठी दोन जामीन द्यावे लागत. नफा वाटून न देता तो राखीव निधीमध्ये समाविष्ट करण्यात येत असे. अशा रीतीने जो निधी संचित होई त्यातून पुनः कर्जे देता येत आणि हा संचय वाढण्यामुळे साहजिकच व्याजाचा दरही कमी करता येईल, अशी अपेक्षा असे.

या ग्रामीण सहकारी संस्थांची (पतपेढचांची) संख्या वाढू लागल्यावर त्यांचे एकत्रित संघ बनविण्यात आले. क्रमाने हिशेब ठेवण्याच्या व तपासणी करण्याच्या पद्धती सर्वत्र समानपणे स्वीकारण्यात आल्या आणि संघातील निरनिराळचा पेढयांचे निधीही एकत्र करण्यात आले. यायोगे सधन संस्था व सधन विभाग यांना गरीब संस्था व विभाग यांस मदत करणे सुकर झाले. पुढे संघ-कल्पनेचा विकास होऊन विभागीय व राष्ट्रीय संघ व बँका स्थापण्यात आल्या.

या संस्थांच्या सुरुवातीच्या काळांतील घटनांपैकी आणखी एक महत्त्वाची घटना म्हणजे संस्थेकडून मिळालेल्या कर्जातून सर्वांच्या गरजेच्या वस्तूंची सामुदायिक खरेदी करण्यासाठी सर्व सभासदांनी एकत्र येणे ही होती. यामुळे पैशातील कर्जाचे रूपांतर पुढे मालातील कर्जामध्ये करून घेता येऊ लागले व त्यातूनच पुढे व्यापारी संघटना निर्माण झाल्या. खेडयामधून हा व्यापारी व्यवहार कित्येक वेळा स्थानिक पेढ्या (बँका) करीत असत, वरच्या स्तरावर मात्र त्यासाठी वेगळचा व्यापारी संघटना निर्माण करण्यात आल्या आणि प्रादेशिक व राष्ट्रीय बँका हा व्यवहार हाती घेत नसत.

जर्मनीच्या ग्रामीण भागात याप्रमाणे रायफीसेन धर्तीवरील ग्रामीण पतपेढ्या मूळ धरू लागल्या, त्याच सुमारास जर्मन शहरांमधून शुल्झ-डेलिट्झनी अशाच प्रकारचे कार्य औद्योगिक कामगार व कारागिरांसाठी सुरू केले होते. नागर

परिस्थिती भिन्न असल्यामुळे शुल्झ डेलिट्झनी उभारलेल्या कर्जपुरवठा करणाऱ्या संस्थांमध्ये सभासदांना भाग रूपाने काही किमान भांडवल पुरविण्याची जबाबदारी स्वीकारावी लागे. सुरुवातीस अनियमित जबाबदारीच्या तत्त्वावरच त्यांची स्थापना करण्यात आली असली तरी पुढे मात्र या शहरी पेढ्यांनी नियमित जबाबदारीचे तत्त्व स्वीकारले. जर्मन कायद्यात तत्संबंधी सुधारणा झाल्यामुळे व कायद्याने नियमित जबाबदारीची तरतूद केल्यामुळे त्यांना असे करणे शक्य झाले. तसेच नागर परिस्थिती लक्षात घेऊन या संस्थांचे सभासदत्व ग्रामीण भागातल्याप्रमाणे परस्परांची माहिती असणाऱ्यांपुरतेच मर्यादित ठेवले नव्हते; ते व्यापक ठेवण्याचे धोरण या नागर पेढ्यांनी प्रथमपासून स्वीकारले. तरी शुल्झ डेलिट्झ पेढ्यांमधून वैयक्तिक जामीन घेण्याच्या प्रथेस महत्त्व दिले जाई आणि दिली जाणारी कर्जे बहुतेक लहान रकमांची असत आणि ती उत्पादक व्यवसाया-साठीच दिली जात. जर्मनीतील या नागर पेढ्यांचा विकास होऊन पुढे त्यांनी आपली प्रादेशिक सांघिक सल्लागार मंडळे व हिशेब तपासणी संघ निर्माण केले. तथापि यातून विभागीय व राष्ट्रीय बँकांच्या रूपाने सांघिक बँक-व्यवस्था निर्माण होऊ शकली नाही. तसेच या शुल्झ डेलिट्झ पेढ्या सरकारकडून मदत घेणे पसंत करीत नसत; कारण त्यामुळे सरकारचे आपल्यावर नियंत्रण येईल अशी त्यांना भीती वाटे. रायफीसेन पेढ्यांना हा दृष्टिकोन संमत नव्हता.

सहकारी उद्योगसमूहांनी काही कालानंतर स्वतःच्या घाऊक खरेदी संस्था स्थापन केल्या. या संस्था बँकांहून वेगळ्या होत्या. त्यांच्या मार्फत सभासदांच्या उद्योगधंद्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाची, तसेच किरकोळ व्यापारासाठी लागणाऱ्या मालाची घाऊक खरेदी होऊ लागली. दुसऱ्या जागतिक युद्धाच्या काही काळ आधी जर्मनीतील खाजगी दुकानदारीही याच धर्तीवर चांगली संघटित झाली होती. अनेक दुकाने असणारी भांडारे आणि सहकारी भांडारे यांच्याशी सामना देण्याकरिता व्यक्तिगत व्यापाऱ्यांचे सामर्थ्य वाढवावे हा या उपक्रमाचा स्पष्ट उद्देश होता. काहींना ही सहकाराची विकृत कल्पना किंवा विडंबन वाटेल. परंतु जर्मन दृष्टिकोनातून—विशेषतः नाझी (नॅशनल सोशॅलिस्ट) विचारसरणी-प्रमाणे—लहान दुकानदारांची परिस्थिती लहान शेतकऱ्यांसारखीच असल्यामुळे शेतकऱ्यांप्रमाणेच त्यांना आपल्या सहकारी संस्थेमार्फत कर्ज मिळण्याची किंवा कच्चा माल खरेदी करण्याची तरतूद करणे योग्य ठरते.[१]

फे ने जर्मन परिस्थितीचे सर्वसाधारण समीक्षण करून १९०८ मध्ये खालील प्रमाणे निष्कर्ष काढला:—

" सहकारी पतव्यवस्थेच्या दृष्टीने जर्मनी आदर्शवत् आहे. सहकारी पतपेढी ही

---

१. एम्. डिग्बी : ' दि वर्ल्ड को-ऑपरेटिव्ह मूव्हमेंट ' ( १९४८ ) पृष्ठे ७६-७७

तेथील सहकाराच्या इतर सर्व प्रकारांची जननी आहे. नागर अर्थव्यवस्थेत ही घटना एका अर्थाने अस्वाभाविक वाटते. तेथे त्यास केवळ ऐतिहासिक योगायोग असेच मानावे लागते; आणि अलीकडे औद्योगिक विकासाच्या ओघात घडून येणाऱ्या वाढत्या श्रमविभागामुळे नागर सहकारी पतपेढ्या व इतर सहकारी व्यवहार यांमधील संबंध कमजोर होत आहे व तुटत आहे. ग्रामीण भागांत मात्र हा संबंध स्वाभाविक व शाश्वत आहे. शेतीच्या कर्जपुरवठ्याच्या अध्ययनात एकंदर शेती-व्यवसाय संघटनेच्या अध्यनाचाही अंतर्भाव होतो. तथापि शेतीचा कर्जपुरवठा या शब्दप्रयोगाने दोन वेगळ्या गोष्टींचा बोध होतो. एक, व्यक्तिगत शेतकऱ्यांच्या ग्रामीण पेढीकडून होणारा कर्जपुरवठा व दुसरा म्हणजे शेतकऱ्यांनी शेतमालाची विक्री व पुरवठा करण्यासाठी उभारलेल्या सहकारी संस्थेकडून होणारा कर्जपुरवठा.

शेवटी ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की जरी कर्जपुरवठ्याच्या दृष्टीने सर्वांत गुंतागुंतीचे व्यवहार प्राथमिक पेढ्यांच्या पायांवर उभारलेल्या वरील स्तराच्या बँकांमार्फत होत असले तरी प्राथमिक पेढी हीच या सर्व यंत्रणेतील खरोखर प्रमुख घटक आहे. या प्राथमिक घटकाद्वाराच जनतेच्या बुद्धीस चालना मिळते, तिच्या भावना हेलावतात आणि अजाण दुबळेपणाचे सहानुभूतिजन्य बलात रूपांतर होते. "[1]

मालपुरवठा करणाऱ्या संस्थांपेक्षा माल-विक्री करणाऱ्या संस्थांचा व्यवहार अधिक गुंतागुंतीचा असतो. एकाच प्रकारचा माल मोठ्या प्रमाणात मिळवून शेतकऱ्यांच्या गरजेप्रमाणे त्यांना तो वाटून देणे हे काम तांत्रिकदृष्ट्या तेवढे कठीण नसते. मोठ्या विकसित बाजारपेठा असल्यास ते सोपे होते. याच्याउलट विक्रीच्या व्यवहाराचे स्वरूप मालागणिक निरनिराळे असते. उत्पादित माल ठिकठिकाणांहून जुळवून एकत्र करणे, बाजारपेठांपर्यंत त्याची वहातूक करणे व तेथे तो साठवून सुस्थितीत राखणे इत्यादी हरएक मालाबाबतचे प्रश्न एवंगुणविशिष्ट व गुंतागुंतीचे असतात; म्हणून विक्रीच्या क्षेत्रात सहकारी संस्थांची वाढ सार्वत्रिक झालेली नाही. जेथे विक्री-व्यवहार सहकारी वळणास विशेष अनुरूप किंवा विशेष फायद्याचा होतो तेथेच सहकारी विक्रीचे क्षेत्र विशेषेकरून वाढत गेले. माल-विक्रीच्या एका क्षेत्रात सहकार्याची आवश्यकता व फायदे विशेष उत्कटत्वे भासतात. हे क्षेत्र म्हणजे ज्या शेतमालावर कमी-अधिक प्रमाणात विक्रीपूर्व क्रिया करावी लागते त्यांचे होय. म्हणून औद्योगिक क्षेत्रात शेतमालावर आधारित अशा प्रक्रिया उद्योगांची सर्वांत आधी आणि उल्लेखनीय वाढ झाली. शेती सहकारी उत्पादन म्हणून ज्यास संबोधण्यांत येते ते प्रामुख्याने पशुधनोत्पादनाशी संबंधित अशा क्षेत्रात प्रथमत: सुरू झाले. सहकारी दुग्धोत्पादन, सहकारी लोणी व चीज निर्मिती, सहकारी सुके मांस निर्मिती (बेकन-क्युरिंग) इत्यादी प्रमुख दिशांनी सहकारी शेतमालांशी

---

१. सी. आर्. फे: 'कोऑपरेशन ॲट होम ॲंड ॲब्रॉड', (१९४८), ५ वी आवृत्ती पृ. ६२

संबंधित उद्योगांची वाढ झाली. अशा प्रकारचा सहकाराचा सर्वांत आधी अणि यशस्वी विकास डेन्मार्कमध्ये झाला. डेन्मार्कमध्ये सहकाराची सुरुवात लवकर होणे व त्याचा तेथे जलदीने प्रसार होणे याविषयी विवेचन करताना असे सांगण्यात येते की, त्या देशातील शेतकरी समाजात समानता आढळते. तेथील कामगार-संघटन विकसित व प्रगत आहे आणि एकंदर मध्यमवर्गीय लोकशाही तेथे नांदते. ग्रामीण भागातील समर्थ ग्राहक सहकारी व्यवस्था हे डेन्मार्कमधील सहकारी चळवळीचे एक वैशिष्टच मानले जाते. डेन्मार्कमध्ये विविधांगी स्थानिक सहकारी संस्था स्थापून एकाच्याद्वारे अनेक तऱ्हेचे व्यवसाय चालविण्यापेक्षा प्रत्येक व्यवसायासाठी एक स्वतंत्र संस्था स्थापन करण्याची परंपरा रूढ झाली आहे. डेन्मार्कमधील सहकारी व्यवस्थेचा आणखी एक अतिशय महत्त्वाचा विशेष म्हणजे तेथील सहकारी संस्था फक्त आपल्या समासदांशीच व्यवहार करतात आणि समासदही आपले सर्व व्यवहार संस्थांमार्फत करण्याचे बंधन पाळतात. या तत्त्वाचे पालन हे डेन्मार्कमधील सहकाराच्या यशस्वितेचे एक प्रमुख कारण समजतात. या बंधनास कराराचे स्वरूप देण्यात येते आणि कराराच्या मुदतीत त्याच्या काटेकोर पालनाविषयी काळजी घेतली जाते. सभासदांच्या निष्ठेवर सर्वसाधारणपणे विसंबून न राहता संस्थेमार्फत सर्व व्यवहार करण्याचे तत्त्व व जबाबदारी यांचा सहकारी संस्थांची घटना व कारभारविषयक नियम यांतच, डेन्मार्कमध्ये समावेश करण्यात येतो. डेन्मार्कमध्ये हळूहळू विविध प्रकारच्या स्थानिक संस्था बनत गेल्या आणि एकंदर सहकारी व्यवस्थेची विशेष एकात्म किंवा सुसूत्र रचना करण्यात आली नाही. येथील सहकारी व्यवस्थेची रचना ही मूलत: विकेंद्रित आहे व तिची कोणत्याही मध्यवर्ती योजनेनुसार बांधणी झालेली नाही. येथील व्यवस्थेत जी काही एकसूत्रता आहे ती विशिष्ट मालाविषयी व्यवहार करणाऱ्या अनेक स्तरांवरील संस्थांच्या संघ-संस्था स्थापून व एकाच स्तरावरील विविध संस्थांच्या शाखांच्या दरम्यान परस्पर-व्यवहाराविषयीचे करार करून मुख्यत: साधली आहे. येथील दुसरा विशेष म्हणजे वरच्या स्तरावरील सर्व संस्थांच्या व्यवस्थापकीय मंडळांची अगर समित्यांची निवड, वेगवेगळ्या भागांतील, तसेच वेगवेगळ्या वर्गांतील समासदांचे प्रतिनिधी योग्य प्रमाणांत निवडले जावेत अशा रीतीनेच केली जाते. लहान स्थानिक संस्थांचा तळातील भरभक्कम पाया व व्यवहारांबाबत बंधनात्मक करार यामुळे डेन्मार्कमधील सहकारी चळवळ विशेष सुस्थितीत राहिली असे म्हणतात.[१]

स्कॅन्डिनेव्हियन देशांपैकी डेन्मार्कमध्ये प्रथम सहकारी व्यवस्था मोठ्या प्रमाणात प्रस्थापित झाली. नॉर्वे व स्वीडनमध्ये विसाव्या शतकातच सहकारी

१. इयर बुक ऑफ ॲग्रिकल्चरल को-ऑपरेशन, १९५८. पी. जी. गोर्स्ट : दि स्ट्रक्चर ऑफ ॲग्रिकल्चरल को-ऑपरेशन इन् डेन्मार्क.

व्यवहार विशेष वाढला. तथापि सर्व स्कॅन्डिनेव्हियन देशांत व फिनलंडमध्ये सहकाराची प्रगती आज साधारण अवस्थेत आलेली आहे. या सर्व देशांत आज शेती व्यवसाय प्रामुख्याने सहकारी झालेला आहे. दूध, मांस, अंडी, मासळी इत्यादींची विक्री व त्यांवरील प्रक्रिया यांच्या बाबतींत आज सहकारी संस्था अतिशय महत्त्वाच्या झाल्या असून याबाबतचा बहुतेक व्यवहार त्यांच्या हाती आहे. डेन्मार्कमधील सहकारी चळवळीचा आणखी एक विशेष हा की, तेथील ग्राहक–सहकारी चळवळ ही निश्चितपणे ग्रामसमाजाभिमुख आहे. यामुळे ग्रामीण उत्पादक सहकारी चळवळीशी तिचा घनिष्ठ व मित्रत्वाचा संबंध आहे. इतर देशांतून शेतकरी व ग्राहक या दोन सहकारी व्यवस्थांच्या दरम्यान एवढा निकटचा संबंध दिसून येत नाही व त्यामुळे अडचणी निर्माण होतात.

औद्योगिक उत्पादनाच्या क्षेत्रातील सहकारी व्यवहार कारागिरांचे व्यवसाय अगर लहान प्रमाणावरील उद्योग एवढ्यापुरता प्रामुख्याने मर्यादित होता हे वर दर्शविले आहे. ब्रिटनमधील घाऊक सहकारी संस्थांच्या कार्याच्या विवेचनातही त्यांच्या औद्योगिक उत्पादनाचा उल्लेख आलेला आहे. याचा उद्‌भव घाऊक व्यापाराच्या व्यवहारातून झाला होता. औद्योगिक कामगारांच्या सहकार्याने स्थापन झालेले सहकारी व्यवसाय किंवा ग्राहक सहकारी किंवा शेतकरी सहकारी संस्थांच्या गरजेतून निर्माण होणारे उत्पादक व्यवसाय यांचा विचार येथवर झाला. याखेरीज आपल्या सभासदांच्या आर्थिक व्यवहाराशी संबंध नसलेल्या इतर कोणत्याही औद्योगिक उत्पादनाच्या क्षेत्रात सहकारी संस्थेस, तसे वाटल्यास, प्रवेश करिता येतो. अशा तऱ्हेचे अवांतर उद्योग हाती घेतल्याचे स्वीडनचे प्रमुख उदाहरण म्हणून दाखविता येईल. तेथील सहकारी पुढाऱ्यांनी व्यापक औद्योगिक उत्पादनाच्या क्षेत्रात बुद्धिपुरस्सर पदार्पण केले. मांडवलदारांनी प्रस्थापित केलेली विशिष्ट क्षेत्रातील मक्तेदारी मोडून काढण्याच्या आकांक्षेमुळे ते हे करण्यास उद्युक्त झाले. स्वीडनमधील सहकारी व्यवस्थेला अनेक प्रसंगी खाजगी उत्पादकांनी एकाधिकारितेच्या बळावर ठरविलेल्या चढीच्या किंमतीची झळ लागली होती. ग्राहक सहकारी संस्थांनी स्वतःच्या बेकऱ्या (पाव भट्ट्या) काढल्या. त्याचे एक उद्दिष्ट पावाच्या चढत जाणाऱ्या किंमती रोखून धरणे हे होते. तसेच शेतकऱ्यांना खतासाठी ज्या भरमसाट किंमती द्याव्या लागत त्यास आळा बसविण्याकरिता खतांचे उत्पादन करण्यास त्यांनी सुरुवात केली. या दोन्हीबाबत ग्राहक सहकारी अगर शेतकरी सहकारी संस्थांच्या व्यवहाराशी काही संबंध असणारे असेच उत्पादनक्षेत्र त्यांनी व्यापले. तथापि सभासदांच्या हितसंबंधांशी अगर गरजांशी विशेष संबंध नसणाऱ्या काही उत्पादक-व्यवसायांतही त्यांना प्रवेश करणे आवश्यक वाटले. १९३० नंतर स्कॅन्डिनेव्हियात विजेचे बल्ब तयार करण्यासाठी स्थापन झालेली सुप्रसिद्ध सहकारी संस्था हे असले एक उदाहरण म्हणून निर्देशता येते.

एका स्वीडिश सहकारी संस्थेच्या पुढारीपणाखाली स्थापन झालेल्या आंतरराष्ट्रीय स्कॅन्डिनेव्हियन सहकारी संस्थेने हे कार्य हाती घेतले होते. अशाच प्रकारे सहकारी संस्थांनी रोखीचे व्यवहार नोंदणारी यंत्रे तयार करण्यास सुरुवात केली आणि एक वेळ सहकाराचा प्रवेश मोठ्या प्रमाणावर उत्पादनाच्या सर्व क्षेत्रांत होतो असे वाटू लागले.[१] तथापि पुढे तसे काही फारसे घडून आले नाही. स्वीडनमध्ये सहकारी औद्योगिक उत्पादनाचे क्षेत्र बरेच मोठे झाले यात शंका नाही. सहकारी संस्थांच्या मालकीचे कारखाने ४० हून अधिक उद्योगांत तेथे प्रस्थापित झाले. यांमध्ये खाद्य पदार्थांशिवाय चिनी मातीची भांडी, विजेचे दिवे, रबरी पादत्राणे व इतर रबरी माल, कागद, धुण्याची यंत्रे व खते[२] इत्यादींचे उत्पादन समाविष्ट आहे. एकाधिकारितेशी सामना देण्याचे सहकारी संस्थांचे सामर्थ्य, विशिष्ट मालाच्या उत्पादनाच्या क्षेत्रात सहकारी संस्थांचे उत्पादन जेवढ्या प्रमाणांत वाढले असेल त्यावर अवलंबून राहणार हे उघड आहे. स्वीडनमध्ये ९ वस्तूंच्या बाबतीत एकूण राष्ट्रीय उत्पादनापैकी २५ टक्के उत्पादन सहकारी संस्थांकडून होत असे आणि आणखी ४ वस्तूंच्या बाबत १० ते २५ टक्क्यांपर्यंत सहकारी उत्पादन[३] होत होते. स्वीडनमधील सहकारी चळवळीने बहुशः एकाधिकारिता विरोधी भूमिका घेतली असल्यामुळे आपण उत्पादन केलेल्या वस्तूंच्या किंमती ठरविण्याबाबत सहकारी उत्पादकांस आपले विशिष्ट निराळे धोरण कटाक्षाने ठेवावे लागते. विशेष प्रयत्न होऊनही स्वीडनमधील सहकारी क्षेत्रातील औद्योगिक उत्पादन स्वीडनच्या एकूण राष्ट्रीय औद्योगिक उत्पादनाच्या ५ टक्क्यांपर्यंत पोचू शकले नाही.

सहकारी व्यवहाराच्या वाढीसंबंधाने वर माहितीसाठी जी उदाहरणे दिली ती सर्व औद्योगिक दृष्ट्या प्रगत अशा उत्तर व पश्चिम युरोपातील देशांतीलच आहेत. याचे मुख्य कारण हेच की सहकारी व्यवहाराची जास्तीत जास्त प्रगती याच देशांत झाली आहे. सहकाराबाबत जास्तीत जास्त प्रयोग व संशोधनही या देशांत झाले आणि सहकारी म्हणून मानलेले तत्त्वज्ञान व व्यवहार यांचा उगमही याच देशांतील घडामोडींतून झाला.

साम्यवादी (कम्युनिस्ट) देशांत झालेल्या सहकाराच्या विकासाबाबत विवेचन करण्याचा माझा इरादा नाही. कारण साम्यवादी राष्ट्रांतील सहकारी चळवळ ही प्रामुख्याने आर्थिक क्रांती घडवून आणण्याचे एक साधन म्हणून तेथे वापरण्यात आली. साम्यवादी समाजरचना निर्माण करणे हे या राष्ट्राचे अंतिम ध्येय होते. साम्यवादी समाज निर्माण करण्याच्या मार्गावरील एक मध्यंतरीचा टप्पा एवढेच

१. एम्. डब्ल्यू. चिल्ड्स् : स्वीडन : दि मिडल वे (१९३६), चॅप्टर ३ रा
२. हूक व रिवर्ग : इकॉनॉमिक लाईफ ऑफ स्वीडन (१९५६), पृ. ११०.
३. को-ऑपरेटिव्ह इंडिपेंडंट कमिशन रिपोर्ट, युनायटेड किंगडम (१९५८), पृ. १८७.

त्यांच्या सहकाराचे स्वरूप होते. एक शाश्वत व स्थिर व्यवस्था म्हणून जेथे सहकाराकडे पाहिले जात नाही तेथील अनुभव आपल्या उपयोगी पडणारे नाहीत.

तथापि एका साम्यवादी देशास या बाबतीत अपवादात्मक गणणे जरूर आहे. युगोस्लाव्हिया स्वत:स साम्यवादी म्हणवितो. तथापि तेथे शेती व औद्योगिक क्षेत्रांमध्ये सहकाराची ज्या प्रकारे वाढ होऊ दिली जात आहे, ती पश्चिम युरोपमधील घटनांहून फारशी वेगळी नाही. युगोस्लाव्हियातील सहकारी चळवळीचे अनुभव आपणांस मार्गदर्शक ठरावेत; आणि म्हणून युगोस्लाव्हियातील अलीकडच्या घटनांतील काही वैशिष्टयांकडे लक्ष वेधतो. युगोस्लाव्हियाने सामुदायिक शेतीचे धोरण सोडून दिल्यानंतर शेती-कामगारांच्या सहकारी संस्थांचे तत्पूर्वीचे महत्त्व फार कमी झाले.आता विविधोपयोगी प्रादेशिक सहकारी संस्था हाच तेथील सहकारी संस्थांतील प्रमुख सार्वत्रिक प्रकार आहे. एका स्थानिक विभागात अशी एकच संस्था अनेक तऱ्हेची कार्ये हाती घेते.[1] शेती, कारागिरी, वस्तू-वाटप व व्यापार, निरनिराळी समाजसेवा कार्ये, या सर्वांचा अशा संस्थेच्या कार्यामध्ये अंतर्भाव होतो. शेतीसहकारी संस्था हे आपले मूळ रूप टिकवून त्या जोडीला ही इतर कामे ती करीत असते. शेती सहकारी संस्थेची कामे म्हणजे शेतीसाठी कर्जपुरवठा, शेतकऱ्याला लागणाऱ्या मालाचा पुरवठा, शेतमालाची विक्री व त्यावरील प्रक्रिया. एकाच संस्थेत एवढया विविध तऱ्हेची व व्यापक कार्ये एकत्रित झाल्यामुळे त्या संस्थेच्या कार्यक्षमतेवर प्रतिकूल परिणाम होण्याचा संभवही त्यातून निर्माण झाला, असे म्हणतात. विविध तऱ्हेची कामे एकाच सर्वसाधारण (जनरल) संस्थेने हाती घेण्यात कार्यक्षमतेस ज्याप्रमाणे धोका निर्माण होतो, त्याप्रमाणेच सभासदांच्या निरनिराळ्या वर्गांच्या व श्रेणींच्या परस्परसंबंधांचे प्रश्नही गुंतागुंतीचे होऊन बसतात. युगोस्लाव्हिया हा देश काहीसा अप्रगत आहे. आणि अनेक दिशांनी एकदम प्रगती करण्याची आवश्यकता भासल्यामुळे सहकारी संस्थांबाबत हे विशिष्ट सर्वसंग्राहक संस्था-निर्मितीचे धोरण स्वीकारण्यात आले असावे.

या देशामध्ये शासनयंत्रणेची जशी रचना आहे त्या धर्तीवरच तेथील सहकारी यंत्रणेचीही उभारणी करण्यात आली आहे. म्हणजे विभाग, जिल्हा, राज्य, संघराज्य इत्यादी स्तरांवर सर्वसाधारण राजकीय शासनाची जशी संघटना असते तशीच सहकारी संस्थांचीही बनविण्यात आली आहे. युगोस्लाव्हियातील परिस्थितीचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे तिथल्या जिल्हा व राज्य सहकारी संघांचा व्यापारी व्यवहार फारसा वाढलेला नाही; कारण शेतमालाचा व्यापार पूर्वी सरकारी कक्षेत होता व अजून तो तसाच बराच राहिला आहे. शिवाय लहान-

---

१. अकौंट ऑफ दि ' किर्किंडा ॲग्रिकल्चरल कोऑपरेटिव्ह ' इन कलेक्टिव्ह इकॉनॉमी इन युगोस्लाव्हिया. ॲनल्स ऑफ कलेक्टिव्ह इकॉनॉमी, एप्रिल-सप्टेंबर १९५९.

मोठ्या शहरांतील बाजारपेठांतून शेतकरी स्वतःच आपल्या मालाची विक्री करतात याचाही सहकारी खरेदी-विक्री संघाच्या व्यवहारावर बराच परिणाम होतो. युगोस्लाव्हियातील सहकारी चळवळीचे दुसरेही एक वैशिष्टय आहे. या देशात राष्ट्रीय बँकांच्या व्यवहारास अनन्यसाधारण महत्त्व सर्व क्षेत्रांत, सहकारी क्षेत्रातसुद्धा, आहे. यामुळे युगोस्लाव्हियात सहकारी बँक–व्यवस्थेची पूर्णत्वाने वाढ होऊ शकली नाही आणि तेथील स्थानिक सहकारी संस्थांवर राष्ट्रीय बँकेचे आणि जिल्हा सहकारी संघांचे असे दुहेरी नियंत्रण दिसून येते. आणखी एक वैशिष्टय युगोस्लाव्हियाच्या अर्थरचनेत कामगारांची धंद्याच्या मालकीत व व्यवस्थापनात भागीदारी या तत्त्वाला दिलेल्या खास महत्त्वामधून निर्माण झाले आहे. परिणामी युगोस्लाव्हियात सर्व सहकारी संस्थांत तेथील नोकरवर्गाची बऱ्याच मोठ्या प्रमाणात भागी असते. एखादा विशिष्ट व्यापार-व्यवहार किंवा उत्पादन-कार्य चालविणाऱ्या प्राथमिक सहकारी संस्थेतही, त्यात काम करणाऱ्या कामगारांना सहकारी संस्थेचे समासदत्व मिळते; एवढेच नव्हे तर तिच्या व्यवस्थापनातही अधिकार प्राप्त होतो. अनेक जाणते समीक्षक या घटनेबाबत साशंक दिसतात. त्यांना अशी भीती वाटते की, शेतमालाचा व्यापार किंवा प्रक्रिया करणाऱ्या सहकारी संस्थेला माल पुरविणारे शेतकरी सभासद व ती सहकारी संस्था प्रत्यक्ष चालविणारा तिचा नोकरवर्ग यांच्या हितसंबंधांत वेळीप्रसंगी विरोध दिसून येईल; आणि यामुळे संस्थेत बेबनाव होईल. याचे पर्यवसान पुढे काहीही होवो, आज एक गोष्ट अगदी उघड आहे, की कोणत्याही कार्यात सहभागी होणाऱ्या सर्वांस सभासदत्व देण्याचे सनातन सहकारी तत्त्व, युगोस्लाव्हियातील नवीन समाजरचनेच्या मूलभूत प्रवृत्तीमुळे इतर कोणत्याही देशापेक्षा युगोस्लाव्हियात अधिक पाळले जात आहे.

शेवटी एक विशेष व अगदी आधुनिक अशी घटना या दृष्टीने इस्रायलमधील सहकारी चळवळीचा विचार करू. विशेष अडचणींच्या व संकटांच्या परिस्थितीत इस्रायलमध्येही ही चळवळ सुरू झाली. यामुळे सुरुवातीच्या ज्यू वसाहतवाल्यांनी उच्च ध्येयवाद साहजिकच पुरस्कारला. इस्रायली किबुत्झच्या मूळ रचनेमध्ये आपणांस एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला ध्येयवादी समाजवाद्यांनी केलेल्या सामाजिक प्रयोगांचे प्रतिबिंब एकप्रकारे पाहावयास मिळते. इतर कोणत्याही सहकारी संस्थेहून किबुत्झचे वेगळे असे खास लक्षण म्हणजे खाजगी मालमत्ता–पद्धतीचा त्यांनी केलेला संपूर्ण त्याग हे होय. सर्व जमीन सामुदायिक मालकीची मानली जाते, इतकेच नव्हे तर इतर मालमत्ता, उत्पादन आणि उपभोग्य वस्तूंचा पुरवठा या सर्व गोष्टीही सामूहिक मानल्या जातात. सहकारी उद्योगात काम करणाऱ्या प्रौढ सदस्याला वेतन म्हणून काही मिळत नाही; पण त्याच्या सर्व गरजा भागविल्या जातात. मुलांची जबाबदारी सामुदायिक मानली जाते व त्यांची

देखभाल व संगोपन ही खास निवडलेल्या, बालसंगोपन-शास्त्रातील तज्ज्ञ अशा, समासदांवर सोपविलेली असतात. महिला सदस्यांना गृहकृत्यांतून पूर्णपणे मोकळे केले जाते व शेतीत अगर इतर अनेक तऱ्हेच्या सामुदायिक उद्योगांत त्या काम करितात.

किबुत्झ हे ज्यूंच्या वसाहत-स्थापनेच्या आद्य प्रयत्नातील एक महत्त्वाचे साधन होते आणि स्वतंत्र इस्रायल राज्य स्थापनेपर्यंत पॅलेस्टाईनमध्ये ज्यूंची वसाहत बऱ्याच मोठ्या प्रमाणावर किबुत्झच्या साहाय्याने फैलावली, म्हणून विशिष्ट परिस्थितीतून निर्माण झालेली एक एवंगुणविशिष्ट संस्था या दृष्टीनेच किबुत्झकडे पाहावे लागते. या संस्थेच्या यशापासून भविष्यकालासाठी काही धडे घेता येतील. परंतु या बरोबरच हेही लक्षात ठेवले पाहिजे की ज्या विशिष्ट परिस्थितीमध्ये किबुत्झ स्थापन होऊन वाढीस लागली ती परिस्थिती बदलताच किबुत्झची वाढ बरीचशी मंदावली. इस्रायलचे स्वतंत्र राज्य स्थापन झाल्यानंतर बाहेरून मोठ्या प्रमाणावर येणाऱ्या ज्यू नवागतांना राज्यात जलदीने सामावून घेणे प्राप्त होते. या कार्याकरिता किबुत्झहून निराळ्या प्रकारचे सहकारी शेतीसंघ निर्माण होऊ लागले. हे नव्याने स्थापन झालेले सहकारी शेती संघ व किबुत्झ यांमध्ये मुख्य फरक हा की, या नव्या संघांत सामील होणारे शेतकरी आपले कुटुंबीय जीवन बऱ्याच प्रमाणांत स्वतंत्र राखतात. किबुत्झसारखी एकत्र सामुदायिक जीवनपद्धती त्यांमध्ये नसते. या संघांतील प्रत्येकाचे कुटुंबीय जीवन वेगळे असले तरी सर्वांची उत्पादनसाधने व शेती ही सामुदायिक मालकीची असतात आणि त्यांचा वापर व कसणूक ही सामुदायिकच केली जाते. काही दुसऱ्या प्रकारच्या संघांत नुसते राहणे वेगळे असते, एवढेच नव्हे तर आपल्या वाटणीस येणारी शेती प्रत्येकजण स्वतंत्रपणे कसतो. उत्पादनसाधनांपैकी काही विशिष्ट भाग सामुदायिक मालकीचा असतो. या अर्थानेच या दुसऱ्या प्रकारास सहकारी शेती अगर सहकारी उत्पादन समजावयाचे. या प्रकारांत उत्पादित मालाची विक्री, तसेच सभासदांच्या गरजेच्या मालाची खरेदी, ही एकत्र सहकारी पद्धतीवरच होते. परंतु वैयक्तिक कुटुंबीय जीवनात तसेच वैयक्तिक शेतीच्या बाबतीत प्रत्येक समासद-कुटुंब स्वतंत्र घटक मानले जाते. इस्रायलच्या सहकारी जीवनातील या नव्या घटना अतिशय महत्त्वाच्या आहेत. बाहेरून मोठ्या संख्येने येणाऱ्या नवागतांना जलदीने सामावून घेण्याच्या दृष्टीने त्यांनी महत्त्वाची कामगिरी बजावली आहे, इतकेच नव्हे तर या कार्यासाठी त्यांची निर्मिती आवश्यक होती असे दिसते.

इस्रायलमधील सहकारी चळवळीचे आणखी एक महत्त्वाचे लक्षण म्हणजे औद्योगिक उत्पादनाच्या क्षेत्रात सहकाराचा मोठ्या प्रमाणावर झालेला फैलाव हे होय. तेथील शेती-सहकारी संस्थांनीच काही प्रमाणात औद्योगिक उत्पादनाच्या क्षेत्रात शिरकाव केलेला आहे. संपूर्ण सामुदायिक जीवन असणाऱ्या संस्थांत म्हणजे

किबुत्झमध्ये हे साहजिक घडून आलेले आहे. कारण सभासद असलेल्या कुटुंबांतील सर्वांना काम पुरविण्याची जबाबदारी किबुत्झवर असते. त्यांनी सुरू केलेले हे उद्योग बरेचसे लहान प्रमाणावर व किबुत्झच्या शेतीव्यवसायाशी संबंध असलेले असे प्रथम होते. तथापि औद्योगिकदृष्ट्या महत्त्वाचे व मोठ्या प्रमाणावरचे असेही अनेक उद्योग किबुत्झमध्ये नंतर वाढीस लागले. विटा, प्लायवुड, अस्फाल्ट इत्यादींशी संबंधित उद्योगही तेथे सुरू झाले आणि शेतीशी निगडित असणारे उद्योग, उदाहरणार्थ, फळे व त्यांचे रस हवाबंद करून टिकविणे व मुरंबे तयार करणे वगैरेही वाढीस लागले. याशिवाय, कारागिरांच्या सहकारी उत्पादक संस्थाही इस्रायलमध्ये बऱ्याच आहेत. विशेषतः लहान परिमाणाच्या घटकांच्या उद्योगांमध्ये त्या आढळतात. उदाहरणार्थ, अन्नपदार्थ, पावभट्ट्या (बेकरी), लाकूड व धातुकाम, कापड व पादत्राणे, छपाई, कागद, बांधकामाचे साहित्य इत्यादी. कामगार-कारागिरांच्या सहकारी संस्था या मोठ्या प्रमाणावरील भांडवल लागणाऱ्या धंद्यांस अनुरूप नाहीत हा अनुभव इस्रायलमध्येही आला व कारागिरांच्या सहकारी संस्थांस मंदीची झळ विशेष लागते, हेही दिसून आले.

किबुत्झना, तसेच कारागिरांच्या उत्पादक सहकारी संस्थांना एका समस्येला सतत तोंड द्यावे लागले आहे. बाहेरून मोठ्या प्रमाणावर येत राहिलेल्या ज्यू नवागतांच्या लोंढ्यातील बिनकसबी कामगारांमुळे ही समस्या निर्माण झाली आहे. किबुत्झ आपल्या कामावर बाहेरील मजूर लावीत नाहीत. एक तत्त्व म्हणून हे पथ्य ते पाळतात. पण त्यांच्याजवळ उत्पादक साधनसंपत्ती बरीच असल्यामुळे नवागत कामगारांना सामावून घेण्याबद्दल त्यांच्यावर सतत दडपण येत असते. अशाच प्रकारे कारागिरांच्या उत्पादक सहकारी संस्थांच्याही पुढे नवीन वाढत जाणाऱ्या सभासदास कसे सामावून घ्यावयाचे हा प्रश्न सतत उभा असतो. एकीकडे नवागतांकडून जबर प्रवेश-फी मागता येत नाही; पण त्याचबरोबर जुन्या सभासदांची धंद्यातील पूर्वकमाई नवीन अनेक सभासद झाले तरी सुरक्षित राहील इकडेही त्यांना लक्ष द्यावे लागते. या समस्येवर अजून कोणतीही तोड निघालेली नाही. त्यामुळे पूर्ण सभासद होण्याइतके आर्थिक सामर्थ्य नाही म्हणून केवळ मजुरीवर जे काम करतात अशांची संख्या आज पूर्ण सभासदांच्या बरोबरीने या कारागिरांच्या सहकारी संस्थांत झालेली आहे.

इस्रायलमधील सहकारी क्षेत्रातील विशेष लक्षात येणारी बाब म्हणजे सर्वसाधारण कामगार संघाचे (जनरल फेडरेशन ऑफ लेबर) या क्षेत्रातील प्रभुत्व ही होय. हा सर्वसाधारण कामगार संघ त्या देशातील सर्व कामगार संघटनांचा सर्वोच्च संघ आहे. या कामगार संघाचे सहकारी क्षेत्रातील प्रतिरूप म्हणून इस्रायली ज्यू कामगार सर्वसाधारण सहकारी संघटना (जनरल को-ऑपरेटिव्ह ऑफ ज्यूइश वर्कर्स इन इस्रायल) या नावाने ओळखली जाणारी एक संस्था

नोंदलेली आहे. ती औद्योगिक सहकार क्षेत्रातील सर्व व्यवस्थापनकार्याकडे लक्ष देते. सर्वसाधारण कामगार संघ व सर्वसाधारण कामगार सहकारी संघटना यांचे समासदत्व समव्याप्त आहे. तसेच सर्वसाधारण कामगार सहकारी संस्थेच्या कार्य-कारी समितीच्या कामावर कामगार सर्वसाधारण संघाच्या सर्वसाधारण सभेची (जनरल कौन्सिल) तसेच त्यांच्या कार्यकारी मंडळाची सर्वसामान्य देखरेख असते. कामगारांच्या, उद्योगधंद्याच्या, वाहतुकीच्या व बांधकामाच्या बहुतेक सर्व सहकारी संस्था वरील सर्वसाधारण सहकारी (जनरल को-ऑपरेटिव्ह) संस्थेच्या उपसंस्था अगर संलग्न संस्था असतात. प्राथमिक सहकारी संस्थांना या सर्वसाधारण सहकारी मंडळाकडून मिळणारे मार्गदर्शन प्रामुख्याने हिशेबतपासणी-संघांच्या-द्वारा मिळत असते. प्रत्येक मोठी सहकारी संस्था कोणत्या तरी हिशेबतपासणी-संघाला जोडलेली असते. तसेच सहकारक्षेत्रातील महत्त्वाच्या मोठ्या व सर्व मध्यवर्ती अगर सांघिक संस्थांचे नियंत्रण त्यांच्या व्यवस्थापक मंडळावर सर्वसाधारण सहकारी संस्थेचा प्रत्यक्ष प्रतिनिधी नेमून केले जाते.

सहकारी चळवळीच्या विकासाची काही महत्त्वाची लक्षणे निर्देशून हे समालोचन पुरे करतो. ज्या देशांतील सहकारी चळवळीचे वर समालोचन करण्यात आले आहे त्या सर्व देशांतून सहकाराच्या निरनिराळ्या प्रकारांची समप्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येत नाही. इंग्लंडमध्ये शेतीव्यवसायातील सहकाराला काहीशी उशीरा सुरवात झाली आणि अजूनही तेथे त्याचा प्रसार व व्याप्ती मर्यादितच आहेत. उलट काही देशांतून कृषिक्षेत्र सहकाराने पूर्णपणे व्यापले असले तरी तेथील ग्राहक सहकारी चळवळ अगदी दुबळी आहे. सहकारी संस्थांची रचना व त्यांच्या संघटनेमध्ये व कार्यामध्ये प्रमाणभूत मानली जाणारी तत्त्व-प्रणाली व आचार-व्यवहार यांमध्येही बराच फरक असल्याचे दिसून येते. सह-काराबाबतच्या तात्त्विक सिद्धांतांचे विवेचन पुढे विस्ताराने केले जाईल. पण देशपरत्वे याबाबत फरक आहेत आणि त्यामुळे अनेक देशांत सहकाराच्या तत्त्व-वेत्त्यांत व कार्यकर्त्यांत कटू वादंगे निर्माण झाली, हे येथे नमूद करतो.

शिवाय प्रत्येक देशातून तेथील काही ठराविक वर्गांनी अगर व्यावसायिक गटांनीच सहकाराचा अवलंब केल्याचे दिसून येते. ज्यांनी सहकाराचा अवलंब केला अशा वर्गांतील अगर गटांतील लोकांची सर्वसामान्य लक्षणेही चटकन् डोळ्यांत भरतात. पहिले लक्षण हे की, स्वतंत्र एकाकी व्यक्ती अगर घटक या दृष्टीने हे सर्व काहीसे दुर्बल असतात. आधुनिक अर्थव्यवस्थेत अशा दुर्बल घटकांना सहकाराची अत्यंत जरुरी भासते. जे दुर्बल असतात तेच साधारणपणे आपणहून स्वनियमन करण्यास तयार होतात; आणि पथ्ये व बंधन स्वीकारण्याची तयारी हीच सहकाराच्या यशाची गुरुकिल्ली आहे; पण त्याचबरोबर हेही खरे की जे अतिशय दुर्बल असतात त्यांस सहकारिता सुचणार नाही व तिचा ते चिकाटीने अवलंब करू

शकणार नाहीत. सहकारी संस्थांच्या सभासदांची परिस्थिती एकमेकांशी सहकार करूनही किमान प्रमाणांत स्वोद्धार करून घेता येत नाही, इतकी सामर्थ्यहीन असून चालत नाही. म्हणून अतिशय दरिद्री किंवा असहाय स्थितीत असलेल्या सामाजिक थरांत सहकारी चळवळ आपोआप स्वयंस्फूर्तपणे निर्माण होत नाही आणि झालीच तर तिला बाहेरच्या मदतीची व मार्गदर्शनाची फार गरज भासते. ज्यांची सामाजिक व आर्थिक परिस्थिती किमान पातळीवरची आहे व प्रतिकूल परिस्थितीशी सामना देण्याचे आणि वेळीप्रसंगी अपयशाचा धोकाही पत्करण्याचे ज्यांच्यात सामर्थ्य आहे अशाच लोकांमध्ये ही चळवळ रुजते, पसरते व फोफावते. तरीही सहकार-क्षेत्रातील अगदी सुरुवातीचे व नंतरचेही बरेच विचारक ज्या सामाजिक स्तरांमध्ये सहकारास सुरुवात झाली व जेथे सहकार्य संघटित झाले त्या स्तरांतील नव्हते, अन्य बाहेरच्या स्तरांतून ते निर्माण झाले ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. तसेच अनेकवेळा सहकारी कार्याला सुरुवातीस लागणारी बरीचशी प्रत्यक्ष मदत बाहेरच्या लोकांकडून पुरविली गेली. तथापि बाहेरून आलेल्या या कल्पनांचे व मदतीचे महत्त्व एखादा वणवा पेटविण्यासाठी ठिणगीची जेवढी आवश्यकता असते एवढ्याच स्वरूपाचे होते. या चळवळीची पुढे जी वाढ झाली तीमध्ये मात्र तिचे मार्गदर्शन करण्यात अगर अन्य तऱ्हेची मदत करण्यात बाहेरच्यांनी फारसा भाग घेतला नाही. तसेच वरीलपैकी बहुतेक देशांतून तेथील सरकारांनी या चळवळीचा पुरस्कार केला किंवा तिला मदत केली असे दिसून येत नाही. फक्त फ्रान्समध्ये शेतीचा कर्जपुरवठा करणाऱ्या संघटनांना बरीचशी पैशाची मदत तेथील सरकारकडून मिळालेली होती व तेथील सहकारी उद्यमालयांना सरकारी आश्रय मिळालेला होता.

हे सर्व विवेचन एवढ्यासाठी केले की स्वेच्छेने सुरू होऊन सहकारी चळवळीने चांगले मूळ धरून तिचा प्रसार होण्यासाठी काही किमान सुरक्षिततेची व स्वास्थ्याची अत्यंत गरज असते ही गोष्ट नजरेस यावी. अशी अनुकूल परिस्थिती बऱ्याच अंशाने अगदी अलीकडच्या काळापर्यंत फक्त युरोपातील देशांमध्ये आढळून येत होती. या देशांतही जेथे फारशी अनुकूल परिस्थिती नव्हती तेथे या चळवळीची वाढ खुंटली. उदाहरणार्थ, आयर्लंडमध्ये सहकारी चळवळीचा जो प्रसार झाला तो प्रामुख्याने १९ व्या शतकाच्या अखेरीस नवीन जमीनविषयक कायद्यांमुळे थोडाफार स्वयंपूर्ण असा लहान शेतकरी निर्माण झाल्यानंतरच झाला. तसेच अलीकडील दशकात युरोपमधील शेतकरी व कामगार वर्ग यांच्या आर्थिक स्थितीतील झालेली सुधारणा व सहकारी चळवळीची सतत वाढ यांचाही निकट संबंध आहे असे म्हणता येते. स्कॅन्डिनेव्हियन देशांमध्ये या चळवळीची सर्वांत अधिक प्रगती होऊन बऱ्याच मोठ्या क्षेत्रात तिचा प्रसार झाला हेही या दृष्टीने सूचक आहे. अलीकडच्या काळात या देशांत राष्ट्रीय उत्पन्न वाढले, इतकेच नव्हे तर

या उत्पन्नाची वाटणीही अधिक समान होत गेली आणि सामाजिक सुरक्षेचे सक्रिय धोरणही तेथील सरकारांनी स्वीकारले.

अमेरिका व ऑस्ट्रेलियातील युरोपीयांच्या समृद्ध वसाहतीत या चळवळीची विशेष वाढ झालेली नाही. "या नव्या देशांतील भांडवलशाहीच्या तीव्र चढाओढीचे दुष्परिणाम, तेथील सुबत्ता व अव्याप्त विपुल निसर्गसंपत्ती यांमुळे, बहुसंख्यांकांस भासले नाहीत" अशी या घटनेची कारणमीमांसा करण्यात येते.[1]

निरनिराळ्या सामाजिक व आर्थिक वर्गांचे सहकारात तौलनिक स्थान कसे असते हे १९३० व १९४० च्या दरम्यान इंग्लंडमध्ये ग्राहक सहकारी चळवळीच्या एका पाहणीच्या खालील निष्कर्षावरून कळून येते.

"सहकाराचे आकर्षण आजपर्यंत प्रामुख्याने कामगारवर्गातील वरच्या थरांना झालेले आहे. समाजातील गरीब थरांना अजून त्याचे एवढे आकर्षण नाही. तसेच मध्यमवर्गीय ग्राहकांच्या मोठ्या गटालाही या चळवळीचे फारसे आकर्षण नाही."[2]

जगातील निरनिराळ्या देशांच्या अर्थरचनेत सहकाराला कोणते स्थान आहे याबाबत १९५० मध्ये एक समालोचन प्रसिद्ध झाले, त्यात मूलभूत आर्थिक परिस्थितीतील फरकामुळे सहकारी चळवळीची प्रगती निरनिराळ्या देशातून असमान झाली हे निदर्शनास आणले आहे. या परिस्थितीचे वर्णन पुढीलप्रमाणे केलेले आहे:—

"शेवटी सारांशाने सांगावयाचे म्हणजे आर्थिकदृष्ट्या प्रगत देशांतून ग्राहक सहकारी चळवळीचा प्रभाव फारतर एकचतुर्थांश अगर एकतृतीयांश लोक-संख्येपुरता दिसून येतो. तेथील एकूण राष्ट्रीय किरकोळ व्यापारापैकी फक्त १० ते २० टक्के क्षेत्र तिने व्यापले आहे. गेल्या १० वर्षांमध्य बऱ्याच वेगाने तिची प्रगती झालेली आहे. या देशांत कृषिक्षेत्रात सरासरी दोन-तृतीयांश शेतकरी-लोकसंख्या सहकाराने व्यापली असावी आणि सुमारे ४० ते ९० टक्क्यांपर्यंत विशेष महत्त्वाच्या शेतमालाची उलाढाल सहकारी संस्थांमार्फत होत असावी. ज्या देशांत सहकाराचा विकास पूर्वकाळी झाला होता, त्या देशांतील गेल्या दहा वर्षांतील सहकाराची प्रगती मंद दिसून येते. आर्थिकदृष्ट्या अप्रगत देशांतील सहकारी संस्थांच्या सभासदांचे प्रमाण, तसेच त्यांचा व्यापार ही अजून बरीच

---

१. इयर बुक ऑफ ॲग्रिकल्चरल को-ऑपरेशन, १९५०. 'दि प्लेस ऑफ को-ऑपरेशन इन नॅशनल इकॉनॉमी,' पृ. ४.

२. कार-साउंडर्स, फ्लॉरेन्स ॲण्ड पियर्स: 'कंझ्यूमर्स को ऑपरेशन इन ग्रेट ब्रिटन' (१९३८) पृ. ५२४

कमी असली तरी गेल्या दहा वर्षांमध्ये त्यांची प्रगती फार झपाट्याने झाली पण ही प्रगती सर्वस्वी स्वयंस्फूर्त नसून बरीचशी तेथील सरकारांना मासणाऱ्या नडीमुळे व सरकारी पुढाकाराने झालेली आहे.[1]

---

१. इयरबुक ऑफ ॲग्रिकल्चरल को-ऑपरेशन, १९५०. 'दि प्लेस ऑफ को-ऑपरेशन इन नॅशनल इकॉनॉमी', पृष्ठे ९–१०.

व्याख्यान दुसरे

# शासन – पुरस्कृत सहकार : उद्दिष्टे व लक्षणे

गेल्या व्याख्यानाच्या अखेरीस १९५० साली केलेल्या जागतिक सहकारी चळवळीच्या समीक्षणातील एक उतारा उद्धृत केला होता, त्यावरून हे स्पष्ट दिसते की अल्पविकसित म्हणून ज्यांना सध्या संबोधले जाते त्या देशांमध्ये सहकाराची व्याप्ती अल्प होती आणि या देशांतील सहकारी चळवळीत सरकार पुढाकार घेत असल्यामुळे तिचे स्वरूप प्रगत देशातील सहकारी चळवळीहून भिन्न दिसून येते. सहकारी चळवळीच्या या विभागाचा मी आता विचार करतो. समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या वर्गांना तातडीने मदत पुरवून त्यांची संघटना केल्याखेरीज त्यांची प्रगती होणे शक्य नाही, तसेच ही संघटना सहकारी पद्धतीवर उभारली पाहिजे या गोष्टी अप्रगत देशांच्या सरकारांस उमगल्या आणि म्हणून सरकारी पुढाकाराने सहकारी संस्था स्थापून सहकारास उत्तेजन देण्याचे धोरण त्यांनी स्वीकारले. असे करण्यापूर्वी तात्कालिक संकट-निवारण किंवा आर्थिक पुनरुत्थान यांकरिता प्रत्यक्ष सरकारी मदत वेळोवेळी दिली जात असे. परंतु असली प्रासंगिक मदत किंवा दान यांमुळे गरिबांच्या आर्थिक समस्या सुटणे किंवा त्यांची परिस्थिती कायमची सुधारणे शक्य नाही हे लक्षात आले आणि म्हणूनच सहकाराची कास धरण्यात आली. तथापि पश्चिम युरोपमध्ये सहकाराचे जे स्वरूप, जो प्रत्यक्ष व्यवहार होता त्याहून बऱ्याच वेगळ्या प्रकारच्या सहकाराची स्थापना व विकास या सर्व देशांमध्ये झाला. या अप्रगत देशांमध्ये निदान सुरुवातीच्या काळात तरी सहकाराचे स्वरूप सरकारी धोरण यशस्वी करण्यासाठी उभारलेली एक यंत्रणा किंवा उपयोजिलेला मार्ग असेच होते. सामान्यपणे विशिष्ट सरकारी कार्यक्रमाचा एक भाग म्हणून इतर पूरक कार्यांसहित सहकारी प्रयत्नांस सुरुवात होणे व सहकारी संघटनांची उभारणी होणे, हे घडले. उदाहरणार्थ, १९३० च्या

सुमारास जी जागतिक आर्थिक मंदीची लाट आली तिचा प्रतिकार करण्यासाठी, तसेच युद्धकालामध्ये उपभोग्य वस्तूंचे नियंत्रित वाटप करण्यासाठी सरकार-पुरस्कृत सहकाराला अनेक देशांतून सुरुवात झाली.

शासन-पुरस्कृत सहकाराबाबतच्या जागतिक परिस्थितीचे वर्णन मेक्सिको, दक्षिण इटली, तुर्कस्तान व जपान या देशांतील विशिष्ट घडामोडींच्या अनुरोधाने करण्याचे मी योजिले आहे. मेक्सिकोमध्ये जमीन-धारणाविषयक झालेल्या घडामोडींपासून सुरुवात करतो. चालू शतकाच्या दुसऱ्या दशकात मेक्सिकोमध्ये जी शेतकरी क्रांती झाली तीमध्ये या घडामोडींचा उगम झाला. १९३० ते ४० या दशकात 'एजिडो' या सहकारी शेती-ग्राम-संघटनांचे पुनरुज्जीवन करण्याचे धोरण कायमचे मान्य करण्यात आले; आणि मेक्सिको सरकारने ही सुधारणा शाश्वत व समर्थ ठरावी अशी उपाययोजना करण्यास सुरुवात केली. जमीन-धारणा कायद्याची अंमलबजावणी आणि 'एजिडो'ची निर्मिती व संघटना या कार्यक्रमांशिवाय निरनिराळ्या सरकारी खात्यांमार्फत या सहकारी शेती संघटनांना सर्वप्रकारची मदत पुरविण्याचा उपक्रमही सुरू झाला. शेतकी मंत्रालय व जमीन सुधारणा खाते यांखेरीज एजिडोंना मिळणारे सर्व साहाय्य व मदत प्रामुख्याने "नॅशनल बँक ऑफ एजिडाल क्रेडिट"— (एजिडोंना कर्ज-पुरवठा करणारी राष्ट्रीय बँक) या तत्प्रीत्यर्थ खास स्थापन झालेल्या, संस्थेकडून मिळत असे. या कार्याच्या अलीकडील एका अहवालातील उतारा मी पुढे देत आहे. त्यावरून या सरकार-पुरस्कृत बँकेचे कार्य आणि तिचा ग्रामीण विकासाच्या नवीन प्रयत्नांशी संबंध यांबाबत बरीच उद्बोधक माहिती मिळते.

"देशामध्ये सगळीकडे कोणत्याही कानाकोपऱ्यात असणाऱ्या एजिडोंनाही मदत पुरविण्याचे धोरण ठेवावयाचे की, काही थोड्या लहान गटांवर मदत केंद्रित करून ते यशस्वी करावयाचे याविषयी सुरुवातीच्या काळातच बँकेला निर्णय घ्यावा लागला. फक्त निम्म्या एजिडोंमध्ये सहकारी पतपेढ्या होत्या, आणि त्या सर्वच बँकेकडून कर्ज घेत नसत. सुरुवातीच्या काळात बँकेने दिलेल्या कर्जापैकी $\frac{1}{8}$ कर्जे एकाच विभागात दिली गेली; आणि इतर भागातून बँकेचे व्यवहार नंतर क्रमाक्रमाने पसरत गेले. बँकेने यासंबंधी स्वीकारलेले धोरण योग्य वाटते; कारण जी गोष्ट निःसंदिग्धपणे एका ठिकाणी यशस्वी होते तिचेच पुढे मोठ्या प्रमाणावर सर्वत्र अनुकरण होते, हा आपला नेहमीचा अनुभव आहे. सर्वत्र शक्ती विखरून अर्धवट गोष्टी साधण्यापेक्षा या मार्गाने फलनिष्पत्ती अधिक चांगली होते.

व्यवस्थापन खर्च जास्त आहे, बहुतेक पतपेढ्या अगदी प्राथमिक अवस्थेत असल्यामुळे त्यांना आपल्या शेती—कार्यक्रमाच्या योजना तयार करता येत नाहीत, तसेच कर्ज मागण्याऱ्या सभासदांत कार्यक्षमतेच्या दृष्टीने फरक करणे हेही त्या खंबीरपणे करू शकत नाहीत, यामुळे कर्जाची एकवट रक्कम सहकारी पतपेढीच्या

हवाली न करता बँकेला समासदांच्या अर्जांची व्यक्तिशः छाननी करावी लागे. तसेच ज्या कारणांसाठी कर्ज काढले त्यांसाठीच समासदांकडून त्याचा विनियोग होईल अशी खात्री नसल्यामुळे बँक शक्यतोवर समासदांना लागणाऱ्या मालाच्या व अवजारांच्या रूपातच कर्ज वाटी. पुष्कळ वेळा कर्जाची वसुली व्यक्तिगत समासदांकडून बँकेलाच करावी लागते. बँक निव्वळ कर्ज देते, एवढेच नाही तर तिने प्रायोगिक शेती-केंद्रे स्थापन केली आहेत. शेतीच्या प्रश्नाबाबत संशोधन व अभ्यास करून माहितीपूर्ण वाङ्मयही ती प्रसिद्ध करीत असते. अशा रीतीने एजिडोंचे मार्गदर्शन करून त्यांची प्रगती घडवून आणण्याचे एक प्रमुख साधन असे या बँकेचे स्वरूप झाले आहे. "[1]

मेक्सिकोच्या एजिडाल बँकेची स्थापना १९३० ते ४० च्या दरम्यान झाली. त्यानंतर १५ वर्षांनी दक्षिण इटलीमधील जमीन सुधारणेच्या प्रश्नासाठीही शासन-पुरस्कृत सक्तीच्या सहकाराचा अवलंब केल्याचे दिसून येते. सर माल्कम डार्लिंग यांच्या लेखातील पुढील उताऱ्यात ही भूमिका का घेतली गेली याचे विवेचन आढळते:—

" नवीन सहकारी संस्थांच्या उल्लेखाच्या अनुरोधाने जमीन—सुधारणेच्या प्रश्नाकडे मी आता वळतो. बव्हेरियामध्ये सहकाराच्या बाबतीत ऐच्छिक तत्त्व जसे काटकोरपणे पाळले जाते तसे येथे होत नाही. येथे जमिनीचे अनुदान मिळाल्यावर प्रत्येकाने जमीन कितीही लहान असली तरी, सर्वांच्या साहाय्याकरिता स्थापलेल्या स्थानिक सहकारी संस्थेत सामील झाले पाहिजे आणि निदान २० वर्षे तिचे समासद राहिले पाहिजे. लहान शेतकऱ्यांनी आपल्या व्यावसायिक गरजा भागविण्यासाठी आणि शेतमाल-विक्रीच्या सोई व स्वस्त दराने कर्जपुरवठा उपलब्ध करून घेण्यासाठी सरकारी अगर सहकारी कोणत्या तरी संघटनेचा आसरा घेतल्याखेरीज आधुनिक जगात त्यांचा टिकाव लागणे शक्य नाही, हे आता सर्वमान्य झाले आहे. पिढ्यान् पिढ्या स्वावलंबनाची सवय असलेल्या लहान शेत-मालकांस जर ही गरज भासते तर मग शेतीस लागणारे भांडवल व इतर साधने यांच्या बाबतीत, तसेच आपत्काली लागणाऱ्या मदतीसाठी, जे आजपर्यंत आपल्या जमीन-मालकांवरच कमी-अधिक प्रमाणात अवलंबून असत त्यांच्या बाबतीत अशा संघटनेची आवश्यकता विशेष तीव्रतेने भासणार हे उघड आहे. शेतमजुरांची परिस्थिती विशेषच असुरक्षित असते. काही देशांत जमीन सुधारणांमुळे जमीनदारांच्या जागी सरकार आले, याहून विशेष अधिक काही झाले नाही. हा बदल पूर्व पाकिस्तानात माझ्या पाहण्यात आल्याप्रमाणे शेतकऱ्यास नेहमी स्वागतार्ह वाटेलच असे नाही. शासन यंत्रणेतील अधिकाऱ्यांच्या व्यक्तिहीन नियंत्रणापेक्षा शेतकरी जमीनदाराचे

---

१. एफ्. ए. ओ. कोऑपरेटिव्हज् अँड लँड यूस, १९५७ पृ. १८-१९.

नियंत्रण अधिक पसंत करतो; कारण वेळप्रसंगी जमीनदारावर दडपण आणता येते. काही झाले तरी ताठर सरकारी नियंत्रणाच्या जोडीस जमीन धारणेची शाश्वती मिळाल्यामुळे शेतकरी वर्ग प्रगतिशील अगर गतिमान होण्याऐवजी जड व स्थितिप्रिय होण्याचाच संभव अधिक. उत्पादन वाढवावयाचे असेल तर हा हा धोका टाळलाच पाहिजे हे इटलीमध्ये लक्षात आले. हा धोका टाळण्याचा खात्रीचा एकमेव मार्ग म्हणजे जमीन मिळालेल्या सर्वांना सहकारी संस्थांच्या द्वारा संघटित करणे व याबाबत कोणताही विकल्प न ठेवणे, हा होय असे विचारांती ठरले."[१]

अशा प्रकारे सहकारी संस्थांची सक्तीने प्रस्थापना करण्यात आली आणि या संस्थांचे दहा वर्षेपर्यंत तरी जमीन-सुधारणा मंडळाने (लँड रिफॉर्म एजन्सी) मार्गदर्शन करावे असे धोरण ठरले. या मार्गदर्शनाच्या स्वरूपाचे वर्णन पुढील उताऱ्यात केलेले आहे:—

"जमीन सुधारणा मंडळ (एजन्सी) व सहकारी संस्था यांचे संबंध पाल्य-पालकासारखे आहेत. पालकाची सत्ता अबाधित राहण्यासाठी प्रत्येक सहकारी संस्थेत कायद्याने ठरविलेल्या कमाल मर्यादेपर्यंत मंडळ भाग धारण करते आणि संस्थांच्या प्रत्येक समितीमध्ये मंडळाचे प्रतिनिधी असतात. इटली व जर्मनीतील कार्यपद्धतीस अनुसरून एक समिती व्यवस्थापन करते व दुसरी सर्व कारभाराची देखरेख करते. लवाद-कामाकरिता तिसरी स्वतंत्र समिती असते. सहकारी संस्था स्थापनेनंतरच्या पहिल्या समित्या कशा बनवाव्या याबद्दलही मंडळ सूचना करते. इतकेच नव्हे तर संस्थांना चिटणीसही मंडळच पुरविते. थोडक्यात, मंडळाने संस्थांवर घातलेले आवरण हलके अगर पोकळ नसून घट्ट बसते. 'सभासदांवर हुकमत चालविली पाहिजे' असे मंडळ उघड म्हणते. एमिलियात (म्हणजे उत्तर इटलीत) परिस्थिती भिन्न आहे. येथे सभासद अज्ञानी आहेत."

मरेम्मा एजन्सीचे अध्यक्ष प्रोफेसर बान्दिनी लिहितात की, "(जमीन–) सुधारणेत यश मिळवावयाचे असेल तर सुलभ व त्वरित कर्जपुरवठा करणारी संघटना निर्माण केली पाहिजे. हे अत्यंत जरुरीचे खरे पण ती संघटना खऱ्या सहकारी पायावर उभारलेली असावी. सध्या एजन्सीच सहकारी संस्थांना व त्यांच्या सभासदांना पोसते. पोषण करणाऱ्याने काटोकोर मार्गदर्शन करावे हे स्वाभाविकच घडते."[२]

यानंतरचे उदाहरण तुर्कस्तानचे. तेथील विद्यमान सहकारी रचना प्रामुख्याने

---

१. इयर बुक ऑफ अॅग्रिकल्चरल कोऑपरेशन, १९५६. सर एम्. डार्लिंग, 'लँड रिफॉर्म इन् इटली अँड ईजिप्त', पृष्ठे ७–८.

२. कित्ता, पृष्ठ १०.

१९३५ च्या कायद्याच्या अनुरोधाने बनविली गेली. म. मॉरिस कोलोंबाँ यांनी १९५० मध्ये याविषयी जो अहवाल सादर केला त्यातील एक उतारा पुढे दिला आहे. त्यावरून तेथील परिस्थितीची वैशिष्टये कळून येतील:—

"१९३५ च्या कायद्याअन्वये नोंदलेल्या ग्रामीण कर्जपुरवठा व माल-विक्री करणाऱ्या संस्थांची विशिष्ट रचना काही ऐतिहासिक घडामोडींमुळे बनली गेली. या संस्थांचे मूळ उद्दिष्ट शेतमालाच्या निर्यातीसाठी एक संघटना उभारून सटोडियांच्या व्यवहारास आळा घालणे व उत्पादक शेतकऱ्यांची स्थिती सुधारणे असे होते. शेतमाल-विक्री संस्थांवर उत्पादित माल गोळा करून सहकारी विक्री संघाकडे पाठवून देण्याची जबाबदारी होती. पुढील सर्व व्यवहाराची जिम्मेदारी विक्री संघाची होती. शेती बँका (ॲग्रिकल्चरल बँका) व सहकारी पतपेढया यांनी उत्पादनासाठी लागणारा कर्जपुरवठा करून आणि मालाच्या तारणावर उचल देऊन योजनेस हातभार लावावयाचा होता."

"मोठी आणि सामर्थ्यवान् संघटना लवकरात लवकर उभारली तरच यश मिळेल असे मानले गेले. क्रिया जलद होण्यासाठी संघटनेतील वरच्या स्तरांवरील संस्थांची प्रगती त्वरेने व्हावी म्हणून सर्वांत वरील स्तराची म्हणजे विक्री-संघाची स्थापना झाली आणि हे संघ निर्यात-केंद्रात स्थापावेत अशी कायद्याने तरतूद केली. परिणामी, संघांना आपल्या सदस्य सहकारी संस्थांची स्वतःच उभारणी करावी लागली. तसेच शेती-बँकेलाही आपल्या शाखा, उपशाखा आणि ग्रामीण पेढयांची जलद वाढ करावी लागली. मोठ्या संख्येने संस्था स्थापावयाच्या व मालाची उलाढाल मोठ्या प्रमाणावर करावयाची, याकरिता प्राथमिक संस्था स्थापण्याच्या कार्यक्षम पद्धती—निदान तात्कालिक फलदायी पद्धती—बनवाव्या लागल्या. आणि शेवटी संघटना मजबूत करण्याकरिता आणि काम केंद्रित करण्याकरिता निरनिराळ्या मालात व्यवहार करणाऱ्या सर्व संघांचे, जेथे शक्य तेथे—उदाहरणार्थ स्मर्नामध्ये—एक मोठ्या संघात रूपांतर झाले. याच बरोबर सहकारी संस्थांचे व्यवस्थापक व इतर नोकरवर्ग नेमण्याचा अधिकार अर्थमंत्रालय व शेती-बँक यांच्याकडे देण्यात आला, आणि सर्वसाधारण सभांतील निर्णयांची अंमलबजावणी या सेवक-वर्गावर सोपविली."[१]

वरील उताऱ्यास पूरक असे आणखी काही उतारे कोलोंबाँच्या अहवालातून उद्धृत केल्यास हिंदुस्तानातील परिस्थितीशी अनेक साम्य स्थळे लक्षात येतील. एवढेच नव्हे तर अनेक अविकसित देशांतील या प्रकारच्या सहकारी घडामोडींची सर्वसामान्य लक्षणे थोडक्यात प्रकट होतील. कोलोंबाँ आग्रहाने प्रतिपादतात की

---

१. इयर बुक ऑफ ॲग्रिकल्चरल कोऑपरेशन, १९५३. एम्. कोलोंबाँ, 'मेन प्रिन्सिपल ऑफ कोऑपरेटिव्ह डेव्हलपमेंट,' पृ. ६०–६१.

१९३३ च्या कायद्याने निर्माण केलेल्या व्यवस्थेचा मूलभूत दोष हा की, " एक केवळ यंत्र आहे."

" सभासदांशी या यंत्रणेचा काही संबंध नसतो. एवढेच नव्हे तर तिचे नियंत्रण बाहेरून केले जाते." शिवाय, " ही यंत्रणा जड असल्यामुळे तिला बाहेरून गती द्यावी लागते. काही वेळा आंधळेपणाने अत्यंत दूरस्थांकडून हे केले जाते. संमिश्र जबाबदारी व सहकारी संस्थांच्या दैनंदिन व्यवहारात शासनाकडून होणारी ढवळाढवळ यामुळे कार्याची गती अपरिहार्यपणे मंद होते. उशीरा, परस्परविरोधी, अयुक्त निर्णय दिले जातात, स्थानिक राजकारणी व्यक्तींना लुडबूड करण्यास अवसर मिळतो व एका शब्दात सांगावयाचे तर 'गोंधळ' निर्माण होतो." त्यांचा अभिप्राय हा की, तुर्कस्थानातील या प्रयोगाने एक अपूर्ण व अर्धवट यंत्रणा बनविली आणि ती मूळ हेतू सिद्धीस नेण्यास आता असमर्थ ठरली. ही यंत्रणा व्यापार-व्यवसायासाठी पुरेशी लवचिक, धूर्त अगर गतिमान नाही. तिला शासन संघटने-इतकी शिस्त, स्थैर्य व साधनसंपन्नता नाही किंवा सहकारी संस्थेप्रमाणे तिच्यात सुसंबद्धता, बल अगर स्वयंप्रेरित शिस्त हीही नाहीत. आणि, " या सर्व अडचणी निर्माण होण्याचे मुख्य कारण म्हणजे खालचा पाया बांधून काढण्याआधी वरची इमारत रचली गेली; आणि लगेच बऱ्याच मोठ्या क्षेत्रावर त्वरेने हालचाल करावी लागल्याकारणाने सुरुवातीस पाया-भरणीचे कच्चे राहिलेले काम पुढे क्रमाक्रमाने पुरे करता आले नाही."[१]

शेवटी याहून निराळा प्रकार म्हणून जपानमध्ये याबाबत ज्या घडामोडी झाल्या त्यांचा विचार करू. येथील सहकारात सरकारी भागीदारी व मार्गदर्शन ही बरीच असली तरी सहकाराची पायाभरणी करताना येथे एवढ्या अडचणी आल्या नाहीत. १९४५ पूर्वी जपानमध्ये शेती-सहकाराची जी सर्वसाधारण वाढ झाली त्यासंबंधाने अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या एका पुस्तकातील उतारा अतिशय उद्बोधक वाटावा :—

" १९३० साली स्वीकारलेल्या 'शेतकऱ्यांना वाचवा' या धोरणाचे प्रमुख लक्षण म्हणजे कमी व्याजाने शेतकऱ्यांस कर्ज पुरविणे व शेत-मालाच्या किंमती स्थिरावणे असे होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकारी संस्थांचा उपयोग करून घेतला गेला. हे सरकारी धोरण 'शेती व मच्छीमारी असलेल्या गावांच्या आर्थिक पुनर्वसनाची योजना' या नावाने ओळखले जाई. गावातील सहकारी संस्थांच्या द्वारा हा कार्यक्रम पार पाडला जावा अशा अर्थाचे एक कलम या योजनेत होते. यामुळे सहकारी संस्थांच्या द्वारा गावाला अल्प व्याजाच्या दराने कर्जपुरवठा होऊ लागला; आणि तांदूळ, रेशमाचे कोसले व इतर वस्तूंच्या किंमती सहकारी संस्थांनी स्वसामर्थ्याने रोखून धरल्या.

१. कित्ता, पृष्ठे ६१–६४.

"या धोरणाशी सुसंगत अशी सहकारी संस्थांच्या वाढीची एक पंचवार्षिक योजना सहकारी संघाने तयार केली व ती तावडतोब कार्यान्वित करण्याचा प्रयत्न केला. सर्व गावांतून सहकारी संस्था स्थापाव्या, सभासद-संस्था वाढवावी आणि सहकारी संस्थांची उपयुक्तता जास्तीत जास्त शेतकऱ्यांच्या ध्यानात आणावी हे या योजनेचे उद्दिष्ट होते. त्याचबरोबर सहकारी संस्थांनीही आपला कारभार सुधारून आर्थिक स्थिती सुस्थिर करणे अवश्य होते. तथापि सरकारची मदत मिळाल्यानंतर खेड्यांतील शेती-सहकारी संस्थांचा जलदीने विकास होऊ लागला. तेव्हा कृषि-क्षेत्रातील जागतिक मंदीमुळे जपानी ग्रामीण सहकारी संस्था स्थिरावल्या असे म्हणणे अतिशयोक्त ठरणार नाही. सहकाराच्या या वाढीने व्यापाऱ्यांच्या व्यवसायावर गंडांतर आले; आणि अखेरीस त्याची परिणती म्हणून 'सहकार-विरोधी चळवळ' या नावाची चळवळ जपान चेंबर ऑफ इंडस्ट्री अँड कॉमर्स या संस्थेने सुरू केली.

"शिवाय या ग्रामीण सहकारी संस्थांच्या रचनेत एक विशेष असा होता की ज्यामुळे त्यांचे एकंदर स्वरूप पालटले. सहकारी संस्थांबाबतचा कायदा लागू झाला तेव्हापासूनच या संस्था सरकारी मार्गदर्शन व नियंत्रणाखाली आल्या; आणि मंदीतून शेतकऱ्याला वाचविण्यासाठी योजलेल्या सहकारी संस्थांच्या द्वारा कार्य करण्याच्या धोरणावर अधिक जोर देण्यात आला. चीन-जपान संघर्ष आणि दुसरे महायुद्ध यांच्या सुमारास जपानी अर्थव्यवस्था क्रमाने शासन-नियंत्रित होऊ लागली; आणि सरकारी नियंत्रणाचे क्षेत्र वाढविण्यासाठी ग्रामीण सहकारी संस्थांचा उपयोग करण्याचे सरकारने योजले. यासाठी निरनिराळ्या शेती-संघटना व सहकारी मंडळ्या यांनी एकाच शेती सहकारी संस्थेत विलीन व्हावे असा सरकारने हुकूम काढला. सर्व ग्रामस्थ या संस्थांचे सभासद बनले. त्यांना संस्थांतून निवृत्त होता येत नव्हते. विभागीय गव्हर्नर या सहकारी संस्थांचे कार्यकारी मंडळ नियुक्त करीत. अशा प्रकारे खेड्यांतील सहकारी संस्था व्यवहारात सरकारी शासन यंत्रणेची एक भाग बनली; आणि तिचे स्वतंत्र अस्तित्व नाहीसे झाले."[1]

वरील उताऱ्यात निर्देशिल्याप्रमाणे जपानमध्ये युद्धपूर्वकालात सहकारी चळवळीच्या बाबतीत सरकारी नियंत्रण व हस्तक्षेप ही परिपूर्ण होती. इतरत्र ती एवढी क्वचितच आढळत. युद्धोत्तर अमेरिकन अंमलाखालील जपानमध्ये ही परिस्थिती आमूलाग्र बदलली. १९४७ च्या शेती सहकारविषयक कायद्याने स्वायत्त सहकारी चळवळीची तात्त्विक बैठक प्रस्थापिली. सहकारी संस्थांची संघटना सभासदांच्या स्वेच्छेवर आधारलेली असली पाहिजे, त्यांचा कारभार पूर्णपणे लोकशाही असला पाहिजे, मांडवल शक्य तेवढे सभासदांनी स्वतःच उभारले

१. योशिओ शॉस्टेन : 'कोऑपरेटिव्ह मूव्हमेंट इन् जपान' ( १९५८ ), पृ. १९–२१.

पाहिजे, पण कोणत्याच सभासदाने व्यक्तिशः बहुसंख्य भाग धारण करू नयेत आणि भागागणिक वाटावयाच्या लाभांशाचा (डिव्हिडंड) दर सर्वसाधारणपणे चालू व्याजाच्या दरापेक्षा जास्त असता कामा नये, ही सहकाराबाबतची नवी तत्त्वप्रणाली त्यांनी प्रस्थापित केली. पूर्णपणे सक्तीच्या समासदत्वाचे आणि सरकारी नियंत्रण व मार्गदर्शन मान्य असलेले धोरण सोडून एकदम लोकशाही सहकारी तत्त्वांचा अंगीकार करण्याचे धोरण स्वीकारल्यामुळे सहकारी चळवळ बऱ्याच मोठ्या प्रमाणात विस्कळित होण्याचा संभव होता. युद्धकाळातील अडचणीच्या परिस्थितीत, विशेषतः युद्धाच्या अखेरच्या काळात, जपानमधील आर्थिक जीवनात अव्यवस्था निर्माण झाली असल्यामुळे ही भीती अधिकच होती. तथापि या परिस्थितीतही नव्या कायद्यान्वये नोंदलेल्या सहकारी संस्थांनी व्यवहारतः जपानचा जवळजवळ संपूर्ण ग्रामीण भाग व्यापला आणि १९५० पूर्वीच कृषि-अर्थव्यवहाराचा बराच भाग त्यांच्या हाती आला. कोणाही शेतकरी समासदाला एकाहून अधिक सहकारी संस्थांचे सभासद होता येत असल्यामुळे जपानमधील सहकारी संस्थांच्या एकूण शेतकरी सभासदांची संख्या १९४९ मध्येच त्या देशातील एकूण शेतकऱ्यांच्या कुटुंबांपेक्षा बरीच मोठी होती. काही ठराविक वस्तूंची, विशेषतः तांदळाची, सक्तीची खरेदी व त्याचे भाव-नियंत्रण या सरकारी धोरणामुळे सहकारी संस्थांचा हा विकास मुख्यतः घडून आला, हे निर्विवाद आहे. तांदळाच्या व इतर शेतमालाच्या किमती ठरवून देऊन शेतकऱ्यांकडून सक्तीने तांदूळ खरेदी करण्याची व्यवस्था केल्यामुळे व त्याचबरोबर संस्थांमार्फत शेतकऱ्यांस या कार्याकरिता कर्जाचा पुरवठा करण्याची पद्धती सुरू केल्यामुळे सहकारी चळवळीत सुसूत्रता व एकोपा निर्माण होण्यास फार मदत झाली. १९५० मध्ये तांदूळ व रताळी यांच्या उत्पादनाची ९५ टक्क्यांहून अधिक विक्री सहकारी संस्थांमार्फत झाली; आणि खते, रासायनिक द्रव्ये, शेतीची अवजारे, तसेच टायर-ट्यूब, रॉकेल, साखर, यांचाही बहुतेक पुरवठा शेतकऱ्यांना या सहकारी संस्थांमार्फत होऊ लागला.

जपानमधील ग्रामीण समाजात लोकशाही रुजविण्याचे एक परिणामकारक साधन म्हणून ज्या या शेतकरी सहकारी संस्थांच्या प्रस्थापनेस उत्तेजन देण्यात आले होते त्यांची वाढ फार झपाट्याने झाली असल्यामुळे त्याचा पाया अस्थिर आहे अशी भीती १९५० साली अनेक जाणत्या निरीक्षकांस वाटत होती.[१] परंतु, नंतरच्या घटना पाहता ही भीती निराधार असल्याचे आढळून आले. जपानमधील शेती-सहकाराची जलदीने प्रगती होत असताना त्याची गुणवत्ताही सुधारत गेली. १९५७ मध्ये शेती सहकारी संस्थांची संख्या पूर्वीपेक्षा कितीतरी

१. इयर बुक ऑफ ॲग्रिकल्चरल को-ऑपरेशन १९५०. के. आम्रोकी, जपान.

मोठी होती. आणि त्यांमध्ये मुख्यतः कर्जपुरवठा करणाऱ्या विविध सहकारी संस्थांचा भरणा अधिक होता. जपानमध्ये सुमारे १०,००० अलग स्थळे (शहरे, नगरे व खेडी सर्व मिळून) आहेत आणि गेल्या काही वर्षांत त्यामधून सुमारे १३,००० विविध कार्यकारी सहकारी पतपेढ्या स्थापन झालेल्या आहेत. सर्व शेतकरी या संस्थांमध्ये सामील झालेले आहेत, असे सांगण्यात येते. तांदळावरील सरकारी नियंत्रण कायम असून सहकारी संस्थाच सरकारच्या वतीने तांदळाचे अधिकृत व्यापारी या नात्याने शेतकऱ्यांकडून तांदूळ खरीदतात व त्याची किंमत त्यांना चुकती करतात. या संस्थांचे इतर कार्यही वाढलेले आहे. एकूण सर्व प्रकारच्या उत्पादित मालाच्या खरेदी-विक्रीमध्ये सहकारी संस्थांमार्फत होणाऱ्या व्यवहाराचे प्रमाणही पूर्वीपेक्षा कितीतरी वाढलेले आहे. शेती सहकारी व्यवस्थेला जपानमध्ये आज अनेक नव्या प्रश्नांना तोंड द्यावे लागत असले तरी तिचे स्थैर्य आता संशयातीत झाले आहे ही गोष्ट महत्त्वाची आहे. ज्या नव्या प्रश्नांना तोंड द्यावे लागत आहे ते पुढीलप्रमाणे आहेतः—"सहकारी अर्थ-व्यवहाराच्या निरनिराळ्या क्षेत्रांमध्ये व्यापक व पद्धतशीर रीतीने संबंध निर्माण करणे आणि सर्व सहकारी कार्याचे संयुक्त नियोजन करणे, ठरविलेल्या वार्षिक कार्यक्रमाप्रमाणे सर्व व्यवहाराची वाढ करून कारभार-यंत्रणेची सुधारणा, सभासदांमधील ऐच्छिक सहकार भावनेची वाढ व तद्वारा सहकारी संस्थांची व शेतकऱ्यांच्या आर्थिक पायाची मजबुती या गोष्टींवर भर देणे.". स्थानिक समाजाच्या उत्पादन-व्यवहारांची अधिक चांगल्या व पायाशुद्ध रीतीने योजना कशी आखता येईल ही कृषि-अर्थशास्त्रातील एक प्रमुख समस्या गणली जाते. या दृष्टीने प्रत्येक खेड्याच्या विकासासाठी अनुरूप असा कार्यक्रम तळापासून तयार करण्याचे कार्य जपानात जोराने चालू आहे.[1]

जपान व तुर्कस्तान या दोन देशांतील सहकारी व्यवस्थेसंबंधी जो मोठा फरक दिसून येतो त्याचा तेथील सरकारी धोरण अथवा प्रत्यक्ष कृती यांच्याशी काहीही संबंध नाही, हे उघड आहे. दोन्ही देशात जे घडले ते सरकारी धोरणामुळे घडले नाही. ज्या त्या ग्रामीण समाजांची मूळ रचनाच त्याला जबाबदार होती. जपानमध्ये गेली कित्येक शतके प्रबळ आणि एकसंध असा ग्रामसमाज अस्तित्वात असून तेथे समाईक सहकारी कार्याची परंपरा दृढमूल झालेली होती. याच्या उलट इतर बहुतेक अविकसित देशांत असे सुसंघटित ग्रामसमाज आज अस्तित्वात नाहीत आणि समाईक कार्य व भावना यांविषयींच्या पूर्वीच्या परंपरा व पद्धती मोडकळून नष्टप्राय होत आहेत.

---

१. इयर बुक ऑफ ॲग्रिकल्चरल कोऑपरेशन, १९५८. के. आमोकी, 'ॲग्रिकल्चरल कोऑपरेटिव्हज् इन जॅपनीज इकॉनॉमी.'

आता मी भारतीय सहकाराबाबतच्या घडामोडींकडे वळतो. या व्याख्यानात भारतातील सहकारी चळवळीच्या इतिहासाचे तपशीलवार समालोचन करण्याची गरज आहे असे मला वाटत नाही. या इतिहासातील काही महत्त्वाच्या अंगांचा परामर्ष घेतला तरी माझे काम भागेल. भारतातील सहकारी चळवळीच्या इतिहासाच्या सुरुवातीचा कालखंड, वर इतर देशांतील जी परिस्थिती वर्णिली त्याहून अगदी भिन्न होता हे प्रथम लक्षात घेतले पाहिजे. या सर्व देशांत तेथील सरकारांच्या आर्थिक धोरणाचे सहकार हे एक साधन होते, आणि या सरकारी धोरणाचा त्या देशांच्या सर्वांगीण आर्थिक विकासाशी किंवा एखाद्या विशिष्ट आर्थिक कार्यक्रमाशी संबंध असे. जमीन-सुधारणा, वा शेतमाल-विक्रीची संघटना, अगर एकंदर देशाची क्रमशः प्रगती घडवून आणण्याची योजना, हे सर्व घडवून आणण्याचे एक साधन म्हणून सहकाराचा तेथे उपयोग करण्यात आला. सहकार हा त्या देशांमधील सुधारणा-कार्यक्रमांचाच एक भाग समजला गेला. त्यामुळे इतर क्षेत्रांत तेथे जे कार्यक्रम प्रत्यक्ष चालू असत त्यांच्याशी पूर्णपणे सुसंगत असाच तेथील सहकाराचा कार्यक्रम राहिला. भारतातील सहकारी चळवळीचा इतिहास पाहता पहिल्या मोठ्या कालखंडामध्ये अशी परिस्थिती आढळून येत नाही. भारतामध्ये सहकारी चळवळीची पायाभरणी सरकारी प्रेरणेने व प्रोत्साहनाने झाली, ही गोष्ट खरी. सर फ्रेडरिक निकोलसन यांचा अहवाल आणि १९०४ व १९०५ चे सहकारी कायदे यांनी या चळवळीचा येथे पाया घातला. पण १९३० च्या सुमारास भारतीय सहकारासंबंधी होरेस प्लंकेट लिहितात की, "अगदी थोड्या काही खऱ्याखुऱ्या सहकारी संस्था सोडल्या तर भारतातील सहकारी चळवळ ही रजिस्ट्रारच्या खटपटीने किंवा काही दानशूर उदार व्यक्तींच्या पुरस्काराने चाललेली चळवळ होती असेच म्हणता येईल." यास ते अशी पुस्ती जोडतात की, "ती लोकांची चळवळ नव्हती. ते सरकारी धोरण होते."[१] त्यांचे हे वर्णन बऱ्याचशा प्रमाणात खरे असून गेल्या काही वर्षांपर्यंतचा या चळवळीचा इतिहास म्हणजे या संबंधीचे सरकारी धोरण व कृती यांच्या फलनिष्पत्तीचा इतिहास असेच म्हणावे लागेल. याचे मर्म लक्षात येण्याकरिता १९४७ पर्यंत हिंदुस्थान सरकारचे धोरण व कृती यांचा जो एक विशिष्ट साचा होता तो आपण लक्षात घेतला पाहिजे.

भारतातील १९४७ पर्यंतचे सरकारी धोरण या देशाचा सर्वांगीण आर्थिक विकास घडवून आणण्याचे नव्हते. तसेच सहकाराला विशेष स्थान आहे अगर सहकार ज्याचे साधन म्हणून म्हणता येईल असा कोणताही विशिष्ट आर्थिक कार्यक्रम सरकार हाती घेत नव्हते. यावेळेपर्यंतचे सरकारी धोरण प्रामुख्याने सहकारी मंडळ्या स्थापन करण्यापुरतेच मर्यादित होते. सहकारी मंडळ्या स्थापन

१. इलिनॉर एम्. हॉफ् : 'दि को ऑपरेटिव्ह मूव्हमेंट इन इंडिया' (१९३२), पृष्ठ २२१.

करून व त्यांसाठी जरूर त्या कायद्याच्या तरतुदी करून देऊन सहकारी संघटनेचा एक सांगाडा उभा करणे एवढेच सरकारी घोरणाचे उद्दिष्ट मानले गेले होते. सरकारी मार्गदर्शनाने व प्रोत्साहनाने स्थापन झालेल्या या सहकारी मंडळचा लवकरच संपन्न व प्रगत देशांमधील अधिक सुरक्षित अशा समाजातील स्वेच्छेने स्थापन केलेल्या संस्थांप्रमाणे कार्य करू लागतील व यशस्वी होतील अशी या पाठीमागे कल्पना असावी.

अज्ञान-पालकाची भूमिका स्वतःकडे घेणाऱ्या वसाहत सरकारच्या दृष्टीने हे घोरण स्वाभाविक असेच होते. विसाव्या शतकाच्या सुरुवातीस भारतातील ब्रिटिश शासनाधिकाऱ्यांनी पाल्य-संगोपनाची वृत्ती धारण केली होती. मात्र ज्यायोगे राजकीय सत्तेचे संक्रमण होईल किंवा आर्थिक शाश्वती लाभेल वा आर्थिक विकासास सुरुवात होईल अशा योजनांस मदत करणे अगर घोरणांचा पुरस्कार करणे अशा कार्यक्रमांचा समावेश या नवीन घोरणात नव्हता. त्यामुळे आपण भारताचे पालक आहो, असा भाव आणल्यामुळे सहकारी चळवळीच्या स्थापनेला ब्रिटिश अधिकाऱ्यांनी पाठिंबा दिला तरी या समवेत आर्थिक कार्यक्रम असा काही नव्हताच आणि दरिद्री व अशाश्वत अशा ग्रामीण अर्थव्यवस्थेमधील सहकारी चळवळीच्या विकासास साहाय्यभूत म्हणून आवश्यक असणाऱ्या आर्थिक घोरणाचा पूर्ण अभाव होता.

१९४० पूर्वीचा, भारतातील सहकारी चळवळीचा इतिहास पाहिला तर ही गोष्ट विशेष स्पष्टपणे कळून येते. पहिल्या महायुद्धानंतर दहा वर्षांत या चळवळीची जलद प्रगती होईल अशी चिन्हे दिसत होती; कारण या काळात शेतीमालाच्या किंमती चढत होत्या आणि काही ग्रामीण भाग व वर्ग समृद्धी उपभोगू लागले होते. या कारणांमुळे आणि चळवळ सरकार-पुरस्कृत आहे या भावनेमुळे काही नागरी आणि ग्रामीण समाज-घटकांकडून पैसा उपलब्ध झाला आणि संस्थांची संख्या व त्यांचे व्यवहार यांमध्ये बरोबरीने बरीच वाढ झाली. परंतु १९३० च्या सुमारास जागतिक मंदी सुरू झाल्यावरोबर या प्रगतीला एकदम खीळ बसली. सहकारी संस्थांची संख्या, त्यांचे सभासदत्व आणि त्यांचा व्यवहार यांमध्ये १९३७–३८ पर्यंत अजिबात वाढ झाली नाही. विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे मंदीच्या काळात प्रगतीला जो पायबंद बसला त्यामुळे या चळवळीतील मूलभूत उणीवा उघडयावर आल्या. बहुतेक देशांमध्ये मंदीच्या कालात सहकारी संस्थांच्या आर्थिक व्यवहाराची मूलगामी पुनर्रचना करण्यात आली, व मोठया प्रमाणावर व्यवहार गुंडाळण्यात आले. भारतामध्ये मात्र अनेक प्रांतांमध्ये मंदीमुळे अशी परिस्थिती निर्माण झाली की दुसऱ्या महायुद्ध–काळात सहकारास मिळालेले उत्तेजन व सुधारलेली स्थिती या गोष्टीसुद्धा त्या प्रांतात सहकाराची पुनर्रचना करण्यास अपुऱ्या पडल्या. तसेच काही प्रांतांमध्ये मंदीत संस्थांचा कारभार

गुंडाळणे व पुनर्रचना करणे यांविषयी जे धोरण अवलंबिले गेले त्याचे दुष्परिणाम सहकारी संस्थांची घटना व व्यवहार यांवर अजूनही दिसून येत आहेत.

या प्रारंभीच्या कालखंडात प्रांताप्रांतांमधील घडामोडींमध्ये बरीच तफावत आढळून येते. आर्थिक घटना व परिस्थिती यांमुळे ही तफावत आढळते हे काही अंशी खरे असले तरी सरकारी अधिकारी आणि त्यांची धोरणे यांमुळेही ही तफावत पडली. मुंबई, पंजाब व मद्रास या प्रांतांमध्ये सर्वांत सुदृढ आणि प्रगत असे चळवळीचे स्वरूप दिसते, असा अभिप्राय भारतीय सहकारावरील कोणत्याही पुस्तकात आढळून येईल. पण या प्रांतांतील घडामोडींमध्येही कालंतराने महत्त्वाचे फरक पडत गेले. अत्यंत कर्तबगार अशा सहकारी अधिकाऱ्यांची सेवा पंजाबला लाभली आणि चळवळीद्वारा प्रामुख्याने सरकारी मार्गदर्शनाखालील योग्य परिस्थितीत किती प्रगती करता येते हे पंजाबने दाखवून दिले. मुंबई व मद्रास येथील चळवळीच्या इतिहासाचे वैशिष्ट्य म्हणजे बिन सरकारी व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली घडून आलेला सहकाराचा विकास हे होय. याचा परिणाम म्हणजे मुंबई आणि मद्रास या प्रांतांत अनेकविध प्रयोग करून पाहण्यात आलेले दिसतात आणि पंजाबप्रमाणे सर्वत्र सारखीच प्रगती जरी येथे आढळून आली नाही तरी काही बाबतीत या प्रांतांतील सहकारी चळवळ विशेष प्रगतिशील आणि स्वावलंबी अशी दिसून आली.

समग्र ग्रामीण जीवनाचा विचार करता सर्वच प्रांतांमध्ये सहकारी चळवळ नगण्यच राहिली असे म्हटले पाहिजे; आणि शेती-धंद्यातील कर्ज-पुरवठा, मालाचा पुरवठा व विक्री अशा कोणत्याच महत्त्वाच्या क्षेत्रात चळवळीचा प्रभाव दिसून आला नाही.

सुरुवातीच्या काळात भारतीय चळवळीचे वैशिष्ट्य म्हणजे कर्ज-संस्थांना देण्यात आलेले महत्त्व. शेतकी कर्जबाजारीपणाची समस्या अतिगंभीर असल्यामुळे ही गोष्ट स्वाभाविकच होती असे याच्या समर्थनार्थ म्हटले जाते. शेतीसाठी कर्ज देणारी योग्य यंत्रणा उपलब्ध नसल्यामुळे सावकारशाहीचे आर्थिक आणि सामाजिक परिणाम व कर्जबाजारीपणाचे प्रमाण सर्वत्र वाढत्या प्रमाणात दिसून येऊ लागले होते. या परिस्थितीत कृषि–पतपेढ्यांची स्थापना करणे अतिशय युक्त होते यात शंका नाही. पण त्यांच्या जोडीस इतर संस्था न स्थापण्यास हे कारण पुरेसे खचितच नव्हते. पतपेढ्यांच्या स्थापनेव्यतिरिक्त सरकारने प्रगती न करण्याचे मुख्य कारण म्हणजे जर विविधांगी प्रगती झाली असती तर आर्थिक धोरणविषयक प्रश्न आपोआपच निर्माण झाले असते, हे असावे. माल-पुरवठ्याच्या व्यवहारात वाढ करण्याचे किंवा विक्री आणि प्रक्रिया या क्षेत्रांत विकास करण्याचे प्रयत्न झाले असते तर त्यामुळे अशा काही समस्या उभ्या राहिल्या असत्या की ज्या कृषि–विकासासंबंधी योग्य सरकारी धोरण आखूनच सोडविता आल्या

असल्या. तुर्कस्तानमध्ये सहकाराची उच्च स्तरावरील उभी करण्यात आलेली यंत्रणा, शेती-मालाच्या विक्रीच्या पद्धतीत सुधारणा करण्याच्या निर्णयाशी कशी निगडित होती हे वर दाखविलेले आहेच. जपानमधील ग्रामीण आर्थिक धोरणाची उद्दिष्टे याहूनही अधिक व्यापक स्वरूपाची होती. जे राष्ट्र किंवा सरकार या क्षेत्रात खंबीर सरकारी धोरण स्वीकारू शकत नाही, त्याच्याकडून विचारात किंवा कृतीत सरकारी मदतीविना कार्य करणाऱ्या सहकारी पतपेढ्या स्थापणे याहून अधिक उपयुक्त असे काही घडू शकण्याची अपेक्षाच करिता येत नाही; आणि इतर कार्यक्रम व गरजा यांच्याशी संलग्न नसलेली पतपेढी–संघटना निष्फळ ठरल्यास त्यात काहीच नवल नाही.

जागतिक मंदीच्या काळात चळवळ कोलमडून पडल्यामुळेच नव्हे तर या प्रतिकूल परिस्थितीत प्रांतिक सरकारांची जी प्रतिक्रिया दिसून आली त्यामुळेही वरील परिस्थितीवर पूर्ण प्रकाश पडला. मंदीचा फटका ज्यांना सहन करावा लागला, अशा देशांपैकी शेतीप्रधान पण स्वायत्त असे जे देश होते त्यांस मंदीचे संकट दूर करण्यासाठी अनेक तातडीचे उपाय योजावे असे ज्याप्रमाणे वाटले तसे भारतातील प्रांतिक सरकारांना वाटण्याचे काहीच कारण नव्हते. या इतर देशांतील सरकारांनी, शेतकऱ्यास उतरत्या भावांची झळ न लागू देणे, किंमती स्थिर राखणे, कर्जाबाबत सार्वत्रिक सूट-तहकुबी असे उपाय योजणे, यांसारखे आणि इतर तात्कालिक संकट-निवारणात्मक उपाय योजून शेतकऱ्यांचे हितसंबंध सुरक्षित राखण्याचा प्रयत्न केला. भारतात इतर उपायांचा कोठे विचारही करण्यात आला नाही; आणि कर्जाच्या सूट-तहकुबीचा विचार फक्त उत्तर प्रदेशच्या सरकारने केला. या संबंधी काहीसे अनिश्चित व पुष्कळसे निष्प्रभावी असे उपाय १९३० च्या आसपास फक्त उत्तर प्रदेशात योजिण्यात आले. इतर प्रांतांत १९३७ मध्ये जेव्हा नवीन घटनेनुसार जनतेची प्रातिनिधिक मंत्रिमंडळे अधिकारावर आली तेव्हाच कर्जनिवारणाच्या प्रश्नाचा विचार होऊ लागला.

भारतीय सहकारी इतिहासाच्या या विशेषाकडे लक्ष वेधणे जरूर आहे. भारतात सहकारी चळवळ अनेक वर्षे सरकार–पुरस्कृत होती यात शंका नाही; पण हा पुरस्कार सहकारी संस्था स्थापन करणे व त्या स्थापन व्हाव्या यासाठी योग्य त्या तरतुदी करणे इतपतच होता. अप्रगत शेतकरी वर्ग असलेल्या गरीब देशात सहकार यशस्वी होण्यास व त्याची जलद प्रगती होण्यास जे आर्थिक धोरण आवश्यक असते त्याकडे पूर्ण दुर्लक्ष करण्यात आले. या दृष्टिकोनातून पाहता भारतीय सहकारी चळवळीतील आधुनिक घडामोडींच्या इतिहासास १९४५ सालापासूनच सुरुवात झाली असे म्हणावे लागेल. १९४५ साली जवळजवळ एकसमयावच्छेदेकरून भारत सरकारने ज्या दोन समित्या नेमल्या, त्यांनी भविष्यकालाचे वेध घेतले व अनेक समस्यांचा विचार केला.

यांपैकी पहिल्या समितीचा, कृषि–वित्त-व्यवस्था उपसमितीचा सहकारी चळवळीशी प्रत्यक्ष संबंध येत नव्हता. शेतकी कर्जाच्या प्रश्नांचा विचार करणे हे या समितीचे काम होते व शेतीसाठी एक व्यापक वित्तव्यवस्था आखण्याचे कार्य तिच्याकडे सोपविलेले होते. या कार्याच्या अनुषंगाने समितीस सहकारी घडामोडींचा विचार करणे आवश्यक ठरले. या समितीने केलेल्या शिफारशींपैकी एक-दोहोंचा विचार करणे जरूर आहे. प्रथम म्हणजे ग्रामीण कर्जनिवारणाबद्दलचे धोरण अकरणात्मक नसावे, त्याबाबतीत काही विधायक केले जावे यावर समितीने भर दिला. सावकारांवर नियंत्रणे लादणे व सहकारास उत्तेजन देणे असे उपाय फार अपुरे आहेत असे मत समितीने व्यक्त केले. सावकाराचे महत्त्व कमी करण्याचा एकमेव उपाय सर्व पतवान शेतकऱ्यांस पर्यायी यंत्रणेद्वारे कर्ज पुरविणे हा होय, असा समितीने आग्रह धरला. सावकारांचे लोकांवरील प्रभुत्व, त्यांच्याकडे ग्रामीण पसा पुरवठ्याचा एकाधिकार आहे यावर आधारित आहे; आणि हा एकाधिकार नष्ट करावयाचा तर पर्यायी यंत्रणेकडे लोकांना वळता येईल असा विश्वास त्यांच्यात निर्माण करावयास पाहिजे. सावकारांना पर्यायी ठरेल अशी देशभर काम करणारी एखादी योग्य यंत्रणा सरकारने स्थापन करण्याकडे समितीने आपले लक्ष पुरविले. या करिता प्रांताप्रांतांत, निमसरकारी प्रांतिक कृषिपत संस्था स्थापन केल्या जाव्या अशी समितीने शिफारस केली.

या समितीच्या शिफारशींचा तपशील किंवा त्यांचे गुणावगुण यांची येथे चर्चा करण्याची जरुरी नाही. सहकारी यंत्रणेसंबंधी समितीने जो दृष्टिकोन स्वीकारला तो प्रस्तुत विवेचनात उद्बोधक वाटावा. समितीने दोन मुद्यांवर विशेष भर दिला. सहकारी यंत्रणेचा विकास प्रांताप्रांतात अत्यंत विषम प्रमाणांत घडून आलेला असल्यामुळे सहकारी चळवळीच्या पायावर उभारलेली शेतीविषयक कर्ज-पुरवठ्याची योजना सर्व प्रांतांत सारखी घडविता येणार नाही, हा पहिला मुद्दा होय. दुसरे म्हणजे, सहकारी संस्थांच्या कार्यपद्धतीमध्ये ऐच्छिकतेचे तत्त्व कायम राखले पाहिजे हा भारतीय सहकारी चळवळीच्या नेत्यांचा आग्रह होता. याचा अर्थ असा की प्रत्येक सहकारी संस्थेस, काय करावयाचे, कोणास सभासद करून घ्यावयाचे इत्यादी ठरविण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असले पाहिजे आणि कोणताही कार्यक्रम तिजवर लादला जाऊ नये असा त्यांचा आग्रह होता. तत्कालीन परिस्थितीत या दोन वैशिष्ट्यांमुळे सर्व प्रकारच्या कर्जाचा सुसूत्र पुरवठा करण्यासाठी सहकारी संस्थांचा सर्वत्र उपयोग करावा अशी शिफारस समिती करू शकली नाही. मात्र, समितीने अशी शिफारस केली की ज्या प्रांतांत सहकारी चळवळ पुरेशी विकसित झालेली आहे, आणि जेथे बिन-सरकारी कार्यकर्ते विशिष्ट जबाबदाऱ्या स्वीकारण्यास आणि सरकारी धोरणास साधनभूत म्हणून कार्य करण्यास तयार असतील तेथे सरकारी प्रांतिक कृषि-पत-संस्था स्थापन करण्याची जरुरी पडू नये. अशा ठिकाणी

सहकारी यंत्रणेचीच सुयोग्य पुनर्रचना करून सर्व पतवान शेतकऱ्यांना पुरेसे कर्ज देणारी एक वित्तविषयक संघटना प्रांतात उभारणे शक्य होईल.

भारतीय सहकारी इतिहासातील यापुढील घटना योग्य प्रकारे जाणून घेण्यास या शिफारशी अत्यंत महत्त्वाच्या असल्याने त्यांचा तपशीलवार उल्लेख करण्यात आला. कृषि-वित्तविषयक उपसमितीच्या शिफारसींकडे भारत सरकारने आणि प्रांतांनी बहुतेक दुर्लक्षच केले. प्रांतिक कृषि-पत-संस्थेच्या सूचनेचा कोणत्याही प्रांतात पुरस्कार केला गेला नाही. समितीच्या शिफारशींची चर्चा करताना मुंबई प्रांतातील बिन-सरकारी सहकारी कार्यकर्त्यांनी मात्र एक दूरगामी निर्णय घेतला. सरकारी धोरण अंमलबजावणीत आणण्याच्या दृष्टीने कार्य करण्याची जबाबदारी स्वीकारण्याची आपली तयारी आहे असे मुंबईतील सहकारी कार्यकर्त्यांनी जाहीर केले; व त्यासाठी आवश्यक असलेली सहकारी यंत्रणेची पुनर्रचना करण्याचे त्यांनी मान्य केले. हा निर्णय आणि त्याचे परिणाम यांच्या अनुरोधानेच मुंबई प्रांतातील सहकारी घडामोडींचा पुढील इतिहास समजावून घेता येतो. मुंबई प्रांतातील पुनर्रचना आणि विकास यांच्या इतिहासास महत्त्व येते, याचे कारण हेच की ग्रामीण पत-पाहणी समितीच्या नवीन सूत्रबद्ध सहकारी यंत्रणेविषयींच्या शिफारशी मुंबई प्रांतातील १९४८ नंतर करण्यात आलेल्या पुनर्रचनेच्या अनुभवावरच बहुतांशी आधारलेल्या आहेत.

ग्रामीण पत-पाहणी समितीच्या कार्याशी मुंबई प्रांतातील प्रयोगाचा निकटचा संबंध विशेष विशद करून सांगणे जरूर आहे. ग्रामीण पत-पाहणी समिती अस्तित्वात येण्यापूर्वी, रिझर्व्ह बँकेच्या महापालांच्या आमंत्रणावरून मुंबई व मद्रास येथील सहकारी कार्यकर्त्यांची एक परिषद भरली होती आणि या परिषदेच्या शिफारशीं-मधून ग्रामीण पत-पाहणीचा उगम झाला. ग्रामीण पत-पाहणी समितीने आपले काम सुरू केले त्या वेळेस देशात आर्थिक विकासासाठी नियोजनास नुकताच प्रारंभ झालेला होता, आणि भारतीय बिन-सरकारी सहकारी कार्यकर्त्यांनी आपल्या पूर्वीच्या भूमिकेत बदल करून सहकार हा नियोजनास साधनभूत असावा या गोष्टीस मान्यता दिली होती. यामुळे ग्रामीण पत-पाहणी समितीने आपल्या पुढील प्रश्नांचा विचार करताना त्यांकडे मूलतः सहकारी दृष्टिकोनातून पाहणे अपरिहार्य होते. आणि हा दृष्टिकोन स्वीकारल्यावर ग्रा. प. पा. योजनेत सरकारी उपक्रम व पुरस्कार आणि विक्री, पुरवठा व प्रक्रिया व्यवहारांची कर्ज-व्यवहारां-बरोबर सांगड घालणे या दोन गोष्टी प्रामुख्याने समाविष्ट होणे अपरिहार्यच होते. ज्या ज्या देशांत सरकार-पुरस्कृत सहकाराद्वारे आर्थिक विकासाचे कार्यक्रम यशस्वीरीत्या कार्यवाहीत आणले गेले आहेत त्या देशांत ग्रा. प. पा. समितीच्या शिफारशीतून प्रतीत होणारा मार्गच स्वीकारण्यात आलेला होता. सरकारी धोरणाची अंमलबजावणी करण्याकरिता स्वेच्छेने सहकारी यंत्रणेची पुनर्रचना

केली आणि सहकारी शेती-पत-पुरवठ्याची सर्वांगीण पद्धत बसवून ती खरेदी-विक्री व शेतमाल–प्रक्रिया यांच्याशी संलग्न करण्याची एकसंध योजना अंमलात आणली, याचे भारतातील एकमेव उदाहरण मुंबई प्रांतातील सहकारी व्यवस्थेचे होते. त्यामुळे मुंबई प्रांतातील चळवळीची इतर वैशिष्ट्ये काही ठिकाणी आधी आढळून आलेली असली तरी ग्रा. प. पा. समितीला स्वतःचा दृष्टिकोन पूर्णपणे विशद करून सांगण्याकरिता फक्त मुंबई प्रांताचेच उदाहरण दाखविता आले.

ग्रामीण पत-पाहणी समितीच्या शिफारशींच्या तपशीलात शिरत न बसता पुढील इतिहासाकडे आपण वळू. ग्रा. प. पा. समितीने सुचविलेला कार्यक्रम केंद्र व राज्यसरकारांनी बऱ्याच त्वरेने स्वीकारला आणि तो अंमलात आणण्यातही पुष्कळच प्रगती झाली. गेल्या दोन वर्षांत मात्र नियोजन मंडळ व केंद्र सरकार यांच्यांतील वैचारिक गोंधळ आणि धरसोडीचे धोरण यांमुळे या प्रगतीत व्यत्यय येत आहे. भविष्यात काय घडू शकेल याचे निदान करण्यासाठी या मतभेदांची थोडी उकल करणे जरूर आहे.

या व्याख्यानमालेतील विवेचनाच्या दृष्टीने एक मुद्दा विशेष महत्त्वाचा आहे. तो असा की, सहकारी संस्थांच्या घटना अनेक-स्वरूपी असू शकतात आणि निरनिराळ्या परिस्थितीत विभिन्न तत्त्वे आणि भिन्नभिन्न कार्यपद्धती योग्य ठरतात याची जाणीव प्रत्येक अभ्यासकास असली पाहिजे. ग्रा. प. पा. समितीने अखिल भारतीय स्वरूपाच्या ज्या शिफारशी केल्या त्यांचा एक संभाव्य परिणाम असा झाला की निरनिराळी प्रांतिक सरकारे व रिझर्व्ह बँक यांनी प्रत्यक्षात आणावयाच्या कार्यक्रमाची एक घट्ट चौकट ठरवून टाकली व तीमध्ये फेरबदल न करता ती सर्वत्र लावली पाहिजे असा समज पसरला. प्रांताप्रांतांतील परिस्थितीतील विषमता आणि परिस्थितीनुसार बदल करण्याची आवश्यकता यांवर ग्रा. प. पा. समितीने भर दिलेला होता. पण एवढ्या मोठ्या देशात एखाद्या कार्यक्रमाची निकडीने अंमलबजावणी सुरू झाली की असल्या तपशीलाकडे साहजिक दुर्लक्ष होते. फेरबदलास वाव न देता शिफारशींची अंमलबजावणी केल्यामुळेच हल्लीचे काही वाद निर्माण झाले असल्याची शक्यता आहे. इतर वाद मात्र मूलभूत गैरसमजुतींवर आधारलेले दिसतात, तेव्हा या गैरसमजुतींविषयी विवेचन करणे जरूर आहे.

विवेचनार्थ दोन बाबींची निवड करतो. पहिला मुद्दा हा की, प्राथमिक संस्थांच्या मांडवलात सरकारने भागी पत्करणे हे तत्त्वतःच चुकीचे आहे; त्यामुळे सहकारावर सरकारचे वर्चस्व प्रस्थापित होईल. आणि दुसरा मुद्दा हा की, विविध कार्यकारी आणि एका खेड्यापुरती कार्यमर्यादा असलेली अशी एकच प्रकारची संस्था सर्वत्र स्थापावी.

प्रथम, सरकारने भागीदारी स्वीकारावी की नाही इकडे लक्ष देऊ. सहकारी संस्था स्थापन करण्यासाठी लागणारे भांडवल स्वतः उभारण्याची गरीब शेतकऱ्यांची

घेपत नसते. जेथे शेती सुरक्षित आहे, विकसित आहे व सावकार-व्यापाऱ्यांची पकड बरीचशी ढिली आहे अशा काही अपवादात्मक ठिकाणी बाहेरील मदत कदाचित् घ्यावी लागणार नाही. इतरत्र योजनाबद्ध विकासास जलद सुरुवात करावयाची म्हणजे बाहेरून बरीचशी मदत घ्यावी लागणारच. अप्रगत परिस्थिती, दैन्यावस्था आणि मागासलेपणा यांचे मूर्त स्वरूप, मांडवल व काम करण्यास माणसे यांचा सध्या जाणवणारा अभाव हेच आहे. जे सुबत्ता उपभोगीत आहेत, अशांनी अप्रगत असणाऱ्यांस या दोन्ही बाबतींत मदत करावी अशी अपेक्षा आज सर्वत्र आढळून येते. भारतातील लहान-लहान खेड्यांतून सर्वप्रकारच्या साधन-संपत्तीची उणीव अत्यंत उग्र स्वरूपात भासते, म्हणून खेड्यांचा विकास करू पाहणाऱ्या सर्व कार्यक्रमांत प्राथमिक आवश्यक मदत बाहेरून आणविणे आणि खेड्यांचा देशव्यापी अर्थव्यवस्थेशी सार्थ संबंध जोडणे या गोष्टींवर भर द्यावयास पाहिजे. सद्य:स्थितीत, स्थानिक साधन-संपत्तीवरच प्रथमपासून अवलंबून राहण्याची भाषा करणे म्हणजे सर्व निर्धन व सावकारांनी पिळून काढलेल्या प्रदेशास पूर्वीप्रमाणेच चिरकालीन अप्रगतावस्थेत कुचंबत ठेवण्यासारखे आहे. प्रारंभीच्या काळात स्वत:च्या मालकीच्या साधनसंपत्तीचा पाया रुंदावणे आणि विकासास सुरुवात करणे यासाठी सरकारी भागीदारीची महत् आवश्यकता आहे. सरकारी भागीमुळे शासन-वर्चस्व निर्माण होईल किंवा नाही हे स्थानिक शासनातील परंपरा व अधिकाऱ्यांची तसेच बिन-सरकारी कार्यकर्त्यांची धमक व दर्जा यांवर अवलंबून आहे. बिन-सरकारी कार्यकर्त्यांमध्ये जर धमक नसेल तर सरकारी मदत असो वा नसो शासनाचे वर्चस्वच आढळून येईल.

तेव्हा, संस्थेच्या भांडवलात सरकारने भागी पत्करणे आणि चळवळीवर सरकारचे वर्चस्व चालणे या दोन गोष्टी एकच आहेत असा गैरसमज कोणी करून घेऊ नये. ब्रिटिश राजवटीतही चळवळीवरील सरकारी वर्चस्व सर्व प्रांतांतून सारख्याच प्रमाणात नव्हते. जेथे सहकारी पतपेढ्यांचा पुरवठा मुख्यत: रिझर्व्ह बँकेकडून होत आहे, प्राथमिक संस्थेतर्फे होणारे कर्जवाटप मुख्यत: सरकारी किंवा बँकांच्या अधिकाऱ्यांकडून होत आहे आणि जो काही विकास झाला तो समाज-विकास योजना किंवा इतर शासकीय यंत्रणा यांच्या दडपणामुळे झालेला आहे, अशी कित्येक राज्ये आज भारतात आहेत. या राज्यांतील अनेक भागांत प्राथमिक संस्थांच्या भाग-भांडवलात सरकारने मुळीच भाग घेतलेला नाही; आणि तरीही तेथील सहकारी चळवळीवर शासनाचे वर्चस्व आहे व शासनाच्या मार्गदर्शना-खालीच तिचे कार्य चालू आहे. या उलट उदाहरण म्हणजे मुंबई प्रांताचे. येथे गेल्या दहा वर्षांत सहकारी बँका व पतपेढ्यांच्या यंत्रणेला सरकारने भागीदारी पत्करल्या-मुळे फार मोठ्या प्रमाणावर भांडवलाचा पुरवठा झालेला आहे. या प्रांतातील सहकारी साखर कारखान्यांची उभारणी, सरकारने बरेचसे भाग भांडवल

पुरविल्यामुळेच शक्य झाली. पण या दोन्हीही क्षेत्रांमध्ये, मी स्वानुभवावरून सांगू शकतो की, शासनाचे वर्चस्व अजिबात नव्हते. शासनाकडून साहाय्य व तांत्रिक मदत नेहमीच उपलब्ध असे, पण सर्वसाधारण धोरण ठरविणे आणि दैनंदिन कारभार चालविणे या दोन्ही गोष्टी बिनसरकारी कार्यकर्त्यांच्याच हातांत असत.

मतभेदाची दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे प्राथमिक संस्थेची व्याप्ती, कक्षा आणि कार्ये. या बाबतीत कोणताही आग्रही दृष्टिकोन समर्थनीय ठरणे शक्य नाही; आणि भारतीय परिस्थितीत सर्वत्र एकच साचा पुरेसा पडेल हेसुद्धा अनाकलनीय आहे.

एक गोष्ट प्रथमतःच स्पष्ट केली पाहिजे की, सहकारी संस्थांबाबतचा विचार त्या मूलतः अर्थव्यवहार करणाऱ्या संस्था आहेत हे कळून केला पाहिजे; आणि विशिष्ट अर्थव्यवहार करण्याच्या दृष्टीने त्यांतील प्रत्येकाची घटना व कार्यपद्धती ठरविली पाहिजे. पंचायतींसारख्या पूर्णपणे राजकीय व शासकीय यंत्रणांशी त्यांची गफलत होता कामा नये. इतर सर्वत्र आढळते त्याप्रमाणे कोठे असेही आढळेल की पंचायत आणि सहकारी संस्था यांचा कारभार चालविणाऱ्या व्यक्ती बहुशः एकच आहेत. पण म्हणून पंचायतीचा कारभार ज्या तरतुदीप्रमाणे व पद्धतीने चालविला जातो अन् चालविला जावयास पाहिजे त्या कायद्याच्या वित्तविषयक अगर इतर तरतुदी एखाद्या सहकारी संस्थेच्या घटना व व्यवहार यांस लागू करू गेल्यास खचित अनवस्था प्रसंग ओढवेल.

सहकारी व्यवहार योग्य रीतीने चालण्याच्या दृष्टीने एक यंत्रणा सर्वच कामे कशी करू शकेल किंवा एका ठराविक साचाची स्थानिक संघटना सर्व बाबतीतील सर्व गरजा कशी भागवू शकेल हे समजत नाही. निरनिराळ्या प्रकारचे व्यवहार कार्यक्षमतेने करण्याकरिता सहकारी संस्थांची रचना त्या-त्या व्यवहारास अनुरूप अशी करावयास पाहिजे. उत्पादन-संस्थांची उभारणी, विक्री-संस्था किंवा पत-पेढ्या यांच्यापेक्षा वेगळ्या धर्तीवर व्हावयास पाहिजे हे उघड आहे. चांभार किंवा विणकर अशा उत्पादक कारागिरांच्या सहकारी संस्थेत फक्त एकाच प्रकारचे कारागीर समाविष्ट होऊ शकतील आणि ज्या मानाने कारागिरांची वस्ती केंद्रित असेल त्यानुसार संस्थेचे सभासद एका गावातले किंवा जवळजवळच्या अनेक गावांतून विखुरलेले असतील. या उलट जर एखाद्या गावातील बहुतेक सर्व जमीन सहकारी शेतीखाली येत असेल तर सर्वसाधारण आकाराच्या खेड्यात सर्व जमीन एकाच संस्थेत समाविष्ट करण्याऐवजी त्या खेड्यात तीन किंवा चार सहकारी शेती संस्था उभारणे श्रेयस्कर ठरेल. त्याचप्रमाणे कापसाच्या गाठी बांधणे, तांदूळ सडणे अशा प्रकारचे व्यवहार करणाऱ्या प्रक्रिया-संस्थेचे काम व्यवस्थित चालावयाचे असेल तर तिला लागणाऱ्या मालाचा पुरवठा, संपूर्ण वर्षभर किंवा हंगामभर मिळत राहील एवढा मोठा प्रदेश तिच्या कक्षेत हवा. म्हणजे तिचे सभासद आवश्यक विस्तृत क्षेत्रभरचे हवेत. अन्य प्रकारे विचार करावयाचा तर व्यापारी

पेठ जेथे आहे तेथेच सहकारी विक्री-संस्थेचे कामकाज चालू शकते. अर्थात् बाजार-पेठेत माल येण्यापूर्वी तो एकत्र करणे, त्याची प्रत ठरविणे, काही काळ साठविणे इत्यादी महत्त्वाची कामे विक्री-संस्थेची उप-संस्था म्हणून स्थानिक संस्था विवक्षित मालाच्या बाबत करू शकेल यात शंका नाही. पण मुख्य विक्री-संस्था म्हणून काम करणे स्थानिक संस्थांस शक्य नाही. खरेदीच्या व्यवहारातही हीच गोष्ट आढळते. खतांसारख्या मालाची खरेदी स्थानिक संस्थेने स्वतंत्ररीत्या करणे हे किफायतशीर ठरत नाही. पण विस्तृत प्रदेशावर कार्य करणाऱ्या एखाद्या कार्यक्षम खरेदी-संघाचे वितरक म्हणून बहुतेक स्थानिक संस्था काम करू शकतात. पतपेढ्यांची मांडणीही, व्यवहार कार्यक्षमरीत्या कसे चालविले जातील इकडे लक्ष देऊन करावयास पाहिजे. याबाबतच्या विचारांची दोन अंग आहेत. व्यवहाराचा एक भाग म्हणजे अर्जाची तपासणी व चिकित्सा करणे, कर्जाच्या रकमांचे किंवा रकमांऐवजी मालाचे वितरण करणे, सहकारी यंत्रणद्वारेच विक्री केली पाहिजे याबाबतीत दक्षता घेणे, वसुली करणे इत्यादी सर्व कामे करण्यास संस्था स्थानिक हवी, कारण प्रत्येक समासदाच्या व्यवहारांबाबत तिला माहिती असणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. याबरोबरच कोणत्याही प्राथमिक संस्थेचा कारभार कार्यक्षम रीतीने चालण्यासाठी काही किमान प्रमाणात तिच्या व्यवहाराची उलाढाल होणे आवश्यक आहे. प्राथमिक संस्थांचा शासनखर्च सरकारीरीत्या कायमचा भागवला जावा अशी कल्पना नसेल तर पतपेढ्यांचे कार्यक्षेत्र वार्षिक किमान व्यवहार होईल इतपत तरी व्यापक असावयास पाहिजे.

अशा सर्व प्रकारे विचार करूनही प्रत्येक ठिकाणी प्राथमिक पतपेढीचे अमुकच कार्यक्षेत्र असले पाहिजे असे म्हणता येणार नाही. जेथे शेती सघन आहे व उसा-सारख्या पिकाची लागवड प्रामुख्याने केली जात आहे तेथे शंभर शेतकरी असलेल्या एखाद्या लहान खेड्यातील पतपेढी स्वावलंबी असेल. या उलट जेथे शेती बरीचशी अशाश्वत आहे, जेथे पैशाचा व्यवहार अल्प आहे आणि स्वनिर्वाहापुरतेच उत्पादन केले जाते तेथे शेतकऱ्यांचा कर्जव्यवहार अत्यंत कमी असणार. अशा विशेष असुरक्षित व अप्रगत क्षेत्रांत पतपेढ्यांचे कार्यक्षेत्र बरेच वाढवूनही प्रश्न सुटत नाही; पुष्कळसा शेती-विकास घडून येईपर्यंत येथे कारभार-खर्चास सरकारी मदत द्यावी लागते.

काही विशिष्ट ठिकाणी प्राथमिक संस्थांना अनेक कार्ये एकत्र करता येतात, हा विचार प्रस्तुत विवेचनात महत्त्वाचा आहे. कर्जाचे व्यवहार, विक्री-संस्थांचे प्रतिनिधित्व व स्थानिक वितरण किंवा किरकोळ विक्रीचे दुकान चालविणे इत्यादी गोष्टी ग्राम-प्राथमिक-संस्थांस एकत्रित करता येतील. असे एकत्रीकरण केल्यामुळे, विविधांगी सहकारी संस्था विशेष कार्यक्षम बनू शकतील. मात्र एवढे लक्षात ठेवले पाहिजे की बहुतांशी, काही किमान लोकवस्तीच्या व साधारणपणे मध्यवर्ती ठिकाणी

वसलेल्या खेड्यांतच अनेक कार्यांचे एकत्रीकरण शक्य व किफायतशीर ठरते.

या सर्वांचा सारांश एवढाच की याबाबत काटेकोर नियम जारी करणे अशक्य आहे, एवढेच नव्हे तर धोकादायकही आहे. मोठा आकार हे जरी अंतिम ध्येय होऊ शकत नसले तरी, अति-निर्धन आणि अति-अप्रगत प्रदेश सोडले तर, स्वावलंबी व्यवहार हे ध्येय होऊ शकते व व्हावयासही पाहिजे. एकाच संस्थेत सर्व गोष्टींचे एकत्रीकरण करण्याचे उद्दिष्ट अव्यवहार्य आहे; परंतु एका संस्थेचे पगारी कामगार व कार्यकारी समितीकडून जेवढी विविध कामे, स्थानिक पातळीवर करणे शक्य आहे तेवढी एकत्रित करणे केव्हाही फायदेशीर ठरते. म्हणून देशव्यापी धोरण हे मूलभूत उद्दिष्टे व आवश्यक कामे यांची व्याख्या करण्याइतपतच मर्यादित असावे, प्रत्यक्ष तपशील ठरविण्याचे काम ज्या-त्या राज्याकडे सोपवावे व प्रत्येक प्रदेशातील शेती-व्यवहाराच्या प्रत्यक्ष परिस्थितीशी ते मिळते-जुळते असावे.

आता अगदी अलीकडील काळातील प्रगतीचा आढावा घेण्याकडे वळू. प्रथमतः योजनाबद्ध प्रयत्नांस इतकी वर्षे उलटून गेल्यानंतरही सहकारी चळवळीचा विकास सर्वत्र झालेला नाही, ही गोष्ट आजही विशेष नजरेत भरते. प्राथमिक संस्था आणि जिल्हा पातळीवरील संस्था यांची कार्यक्षमता व सामर्थ्य यांबाबत राज्याराज्यांत फार मोठा फरक आढळून येतो. पूर्वीपेक्षा सहकारी संस्थांद्वारे कर्जवाटप सर्वत्र बऱ्याच अधिक प्रमाणात होत आहे व सर्व राज्यांतून वरील स्तरावरील सहकारी यंत्रणा उभारण्याचे काम बऱ्याच अंशी झाले आहे. परंतु हा वरचा डोलारा, सरकारी हमी आणि सरकारी खात्याचे अधिकारी यांवरच पुष्कळ अंशी आधारित आहे; आणि अनेक टप्प्यांवर व अनेक बाबतीत सरकारी अधिकाऱ्यांचे अस्तित्व व कारभार बऱ्याच प्रमाणात आढळून येतात. सहकारी यंत्रणा आणि सहकारी कार्यकारी संस्था यांचे सामर्थ्य सारखे वाढत आहे अशी चिन्हे जर दिसत असती तर सरकारी खात्याचा प्रभाव ही गोष्टही मोठीशी गंभीर मानण्याचे कारण नव्हते; पण तशी परिस्थिती अनेक ठिकाणी आज निश्चितपणे दाखविता येत नाही.

सरकार-पुरस्कृत सहकारी प्रयत्नांमध्ये म. कोलोंबाँ यांनी दिलेली धोक्याची सूचना सतत मनात बाळगणे आवश्यक आहे. ती सूचना अशी की, वरची इमारत त्वरेने उभी करण्याचा कार्यक्रम असा असू नये की, ज्यायोगे स्वावलंबी प्राथमिक संस्था स्थापणे अशक्य व्हावे. सहकारी आर्थिक व्यवहारामध्ये प्राथमिक संस्था ही सर्वांत महत्त्वाची यंत्रणा होय. कर्ज-व्यवहार, उत्पादन, विक्री किंवा पुरवठा यांचे व्यवहार पाहणाऱ्या वरच्या इतर सर्व यंत्रणांचे प्रमुख उद्दिष्ट एकच आहे; ते म्हणजे प्राथमिक संस्थांचे कार्य पूर्णपणे फलदायी करणे. हा मूलभूत मुद्दा लक्षात घेतल्याशिवाय सहकारी संघटनात्मक प्रयत्नांचे उद्दिष्ट व त्यांच्या मर्यादा यांचे आकलन होणे शक्य नाही. वरची इमारत काहीशी कृत्रिमरीत्या उभी करता येईल आणि तिचे कार्य एकीकडे चालू असतानाच प्राथमिक संस्थांची वाढ होण्यास व

त्या सामर्थ्यवान होण्यास वाव देता येईल अशी कल्पना करणे शक्य आहे व युक्त आहे. पण वरच्या स्तरांवरील यंत्रणेचे कार्य आणि त्यासंबंधांतील धोरण जर असे असेल की त्यामुळे प्राथमिक संस्थांची वाढ जोमदार होण्यास व त्या सामर्थ्यवान बनण्यात अडथळा येईल, तर अंतिमतः असे धोरण आत्मनाशकारीच म्हटले पाहिजे.

या दृष्टीने भारतातील काही राज्यांमध्ये फार मोठ्या प्राथमिक संस्थांच्या कल्पनेस सध्या जो विरोध दाखविला जात आहे, त्यामध्ये काहीसे तथ्य आहे, असे म्हटले पाहिजे. ज्या प्रदेशात पूर्वीपासून प्राथमिक संस्था चांगले कार्य करीत आहेत आणि जेथे सहकारी तत्त्वांचा प्रसार होण्यास अवधी मिळालेला आहे, अशा ठिकाणी संस्थांचा आकार वाढविणे फायदेशीर होईल. पण ज्या राज्यांत प्राथमिक संस्थांची उभारणी कशी करावी व त्यांचे कार्य कसे चालवावे याचाच विशेष अनुभव अथवा सर्वसाधारण ज्ञान नाही आणि जेथे सहकाराची कल्पना अजून चांगली रुजावयाची आहे, तेथे मोठ्या आकाराच्या संस्थेपासून सुरुवात करणे आक्षेपार्ह ठरेल. अशा परिस्थितीत मोठ्या संस्थांपासून सुरुवात झाल्यास एकसंघ आटोपशीर समाज-घटक निर्माण होऊन लोकशाही पद्धतीने अर्थव्यवहार चालविण्याचा अनुभव प्राथमिक संस्थांत सिद्ध होण्याची संभाव्यता दुरावेल.

कृषि-वित्त-उप-समितीने केलेल्या शिफारशींची पार्श्वभूमी लक्षात घेऊन शेतकी कर्ज आणि विक्री यांची एक सार्वत्रिक यंत्रणा सत्वर उभी करणे, हे सहकारी संस्थांच्या उभारणीशी अपरिहार्यपणे निगडित केले पाहिजे काय, याचा विचार करणे प्राप्त परिस्थितीत अत्यंत महत्त्वाचे ठरते. भारतातील बरेच मोठे प्रदेश सहकारी दृष्ट्या अप्रगत आहेत, एवढेच नव्हे तर पुष्कळ ठिकाणी सहकारी संस्था किंवा त्यांचे सभासद अस्तित्वातच नाहीत ही गोष्ट मान्य केली तर अशा प्रदेशांत उत्पादन-कर्जाच्या पुरवठ्याची योजना काही काळ तरी सहकारी संस्थांच्या विकासाच्या सर्वसाधारण कार्यक्रमांहून निराळी अशी आखावयास पाहिजे हे लक्षात येईल. दीर्घकालीन उन्नतीच्या दृष्टीने सहकारी संस्थांच्या विकासाचा कार्यक्रम अत्यंत महत्त्वाचा आहे यात शंका नाही. परंतु कर्जपुरवठा पुरेशा प्रमाणात करणे आणि कार्यक्षम विक्री-यंत्रणा उभारणे यांसारखी निकडीची व तात्कालिक उद्दिष्टे अगदी हळूहळू विकसित होणाऱ्या सहकारी यंत्रणेवर सर्वस्वी अवलंबून ठेवणे सयुक्तिक दिसत नाही. अशा परिस्थितीत अल्प-मुदतीच्या कर्ज-पुरवठा संस्था आणि विक्री-संघटना व प्रक्रिया-यंत्रणा या समग्र शेतकऱ्यांच्या गरजा भागविण्या-करिता आणि त्यांच्या हितसंबंधांचे रक्षण करण्याकरिता तातडीने उभ्या केल्या पाहिजेत. जेथे सहकारी संस्था व संघटना अस्तित्वात आहेत तेथे त्यांच्या साहाय्याने कार्यक्रम पार पाडला पाहिजे. पण जेथे अशा संस्था नाहीत तेथे त्यांच्या-शिवायही नवीन यंत्रणेला कार्य करता आले पाहिजे. अशा अल्पमुदतीच्या कार्य-

क्रमातील एक अत्यावश्यक बाब म्हणजे त्यातील कोणत्याही तरतुदीचा सहकारी विकासाच्या दीर्घमुदतीच्या कार्यक्रमावर विपरीत परिणाम होता कामा नये. ईजिप्तच्या कृषि-पतपेढीचे कार्य आणि तिचा अनुभव या संदर्भात उद्बोधक ठरण्यासारखा आहे.

हे थोडेसे विषयांतर झाले. सहकारी चळवळीतील प्रगती आणि ग्रामीण पुनर्रचनेची यशस्विता यांचे माझ्या मते मुख्य निकष हे:—सहकारी व इतर साहाय्यक यंत्रणा यांची मांडणी किती व्यापक आहे व त्यांचे कार्य किती यशस्वीपणे चालते, विशेषत: सर्वव्यापी व अधिकाधिक होत जाणारी सहकारी व्यवस्था भक्कम प्राथमिक संस्थांच्या पायावर कायम स्थापन होण्याची शक्यता दृढावली आहे की नाही ? सहकारी यंत्रणेचे आर्थिक सामर्थ्य आणि उपयुक्तता ही वाढण्याच्या मार्गात आज जी विशेष मोठी अडचण जाणवते ती म्हणजे यास आवश्यक असलेल्या साहाय्यक खंबीर सरकारी धोरणाचा अभाव ही होय.

योजनाबद्ध आर्थिक विकास हे सरकारचे उद्घोषित धोरण असले तरी ग्रामीण साधन-संपत्ती आणि संस्था यांचा योग्य विकास ज्यामुळे होईल अशा धोरणाचा आज पूर्ण अभाव दिसून येत आहे. उदाहरणार्थ, अगदी सरैय्या समितीच्या (सहकारी नियोजन समिती १९४६) कालापासून, शेती-मालाच्या किमती स्थिर राखण्याच्या कार्यक्रमावर सर्वांनी अतिशय भर दिलेला आहे; परंतु शेती-मालाच्या किमतीसंबंधीचे गेल्या १० वर्षांतील सरकारी धोरण अगदी धरसोडीचे व अनेक दोषांनी युक्त आहे व त्यामुळे शेतकरी व सहकारी चळवळ यांच्या मार्गात अनेक अडचणी निर्माण झालेल्या आहेत. बाजारपेठांचे नियंत्रण आणि सहकारी प्रक्रिया-संस्थेस उत्तेजन या संबंधातील सरकारी धोरणातही सातत्य व धडाडी यांचा अभावच दिसून येतो. अनेक प्रकारच्या प्रक्रिया-व्यवसायांच्या बाबतीत आजच खाजगी क्षेत्रातही अतिरिक्त प्रक्रिया-शक्ती आधीच आढळून येत आहे, म्हणून यापूर्वी अनेकांनी दर्शविल्याप्रमाणे या क्षेत्रात सहकारी चळवळीचा विकास व्हावयाचा असेल तर सहकारी संस्थांना खाजगी कारखाने चालविण्यास घेता येतील अशी कायदेशीर तरतूद सरकारने करावयास हवी. विक्रीव्यवहारावर आता-पर्यंत खाजगी व्यापाऱ्यांचाच एकाधिकार चालत आलेला आहे आणि नियंत्रित बाजारपेठांच्या नियामक समित्यांवरही खाजगी व्यापाऱ्यांची पकड एवढी आहे की या समित्यांनी स्वत:च घालून दिलेले नियम त्यांस अंमलात आणता येत नाहीत. विक्री आणि शेती-मालावरील प्रक्रिया हे व्यवहार पूर्णपणे सहकाराच्या कक्षेत लवकरात लवकर आणण्याच्या दृष्टीने सरकारी धोरण खंबीर आणि क्रियाशील झाल्याशिवाय ग्रामीण सहकाराची एकसंध व्यापक यंत्रणा उभारणे दुरापास्त आहे हे खचित. ग्रामीण जनतेच्या हातात पुष्कळच अधिक राजकीय सत्ता प्रत्यक्ष आली, आणि सावकार व ग्रामीण व्यापारी यांच्याशी दृढ संबंध असलेल्या

नागरी भांडवलदारवर्गाचे वर्चस्व कमी झाले तरच वर सुचविलेल्या धोरणाचा स्वीकार होणे आणि ते अंमलात येणे संभाव्य आहे.

सहकारी विक्री आणि प्रक्रिया ही सहकारी यंत्रणेची मर्मस्थाने कशी आहेत आणि कर्ज-वाटप-संस्थांच्या कार्याशी त्यांचा किती घनिष्ठ संबंध आहे यावर पुरेसा भर देणे कठीण आहे. याविषयी लक्षात घेण्याजोगी गोष्ट ही की ज्या प्रदेशात महत्त्वाची व्यापारी पिके होतात आणि जेथे शेती सुरक्षित आहे अशाच प्रदेशांत प्रामुख्याने सहकारी कर्ज-व्यवस्था व विक्री यांचा विकास झालेला आहे. अशा प्रदेशात सहकारी एकसंघ व्यवस्था व्यापक व शाश्वत पायावर उभी राहिलेली असते आणि स्थानिक नेतृत्वही तेथे लवकर उपलब्ध होऊ शकते. किफायतशीर व्यापारी पिकांच्या बाबतीत विक्री आणि प्रक्रिया हे व्यवहार सहकारी क्षेत्रात आणणे विशेष अडचणीचे भासत नाही. इतरत्र सहकारी व्यवस्था बरीच त्रुटित आणि अस्थिर आहे. तिला स्थैर्य आणण व त्याची व्याप्ती वाढविणे यासाठी सुसूत्र आणि जोरदार अशा सरकारी धोरणाची नितांत आवश्यकता आहे. या समस्या नवीन अगर विशेष गुंतागुंतीच्या आहेत असेही नाही. काही विशिष्ट परिस्थितीत, उदाहरणार्थ फोर्ड निधी संस्थेने शेती उत्पादनाबाबत शिफारस केल्यामुळे, ज्या-प्रकारचे धोरण सरकार अंमलात आणते तीच कृती व निश्चय इतरत्र दाखविल्यास आवश्यक परिवर्तन सहज येऊ शकेल.

शेवटी सामर्थ्यवान् प्राथमिक संस्थांचा पाया असलेली स्वयंपूर्ण सहकारी चळवळ प्रस्थापण्याची चिन्हे आज कितपत दिसत आहेत याचा आपण विचार करू. या संबंधात बिन-सहकारी कार्यकर्ते आणि स्थानिक पुढारी यांवर मुख्य मदार आहे, हे उघड आहे. ज्यांस जिल्हा, प्रदेश किंवा राज्य पातळीवर सहकारी संस्था चाल-विण्याचा अनुभव आहे असेच पुढारी सध्या भारतीय सहकारी चळवळीच्या अग्रभागी प्रमुख्याने दिसतात. प्राथमिक संस्थांच्या कामाचे अनुभव असणारे यात फार थोडे. सध्याचे नेतृत्व, प्राथमिक विक्री अगर प्रक्रिया संस्थांच्या व्यवहाराशीही संबंध नसलेल्या अशा नागर वर्गातील व्यक्तींच्या हातात आहे. प्राथमिक ग्रामीण संस्थांच्या स्तरातून अधिक कर्तृत्ववान नेतृत्व पुढे आल्याशिवाय सहकारी व्यवस्थेचा पूर्ण विकास होणे कठीण आहे, हे उघड आहे.

पण त्याचबरोबर पूर्ण निराश व्हावे अशीही आज परिस्थिती नाही. शिक्ष-णाच्या सोयी वाढल्या, स्थानिक शासनात स्थानिक पुढारी अधिक तत्परतेने भाग घेऊ लागले, राज्यसत्तेचे विकेंद्रीकरण झाले म्हणजे स्थानिक नेत्यांना अधिक अनुभव प्राप्त होईल आणि त्यांची आकलनशक्ती वाढून त्यांचे सामर्थ्य उत्तरोत्तर अधिक प्रतीत होईल. असे झाले म्हणजे सहकारी व्यवस्था भक्कम पायावर उभी राहिलेली दिसून येईल.

सद्य:स्थितील उणीवांकडे मी आतापर्यंत बरेच लक्ष पुरविले, तेव्हा अलीकडील

काळातील काही सुचिन्हे व आशाप्रेरक घटना यांकडे लक्ष वेधणेही आवश्यक आहे. माझा व्यक्तिगत अनुभव मर्यादित असल्यामुळे पुढे दिलेली सर्व उदाहरणे मुंबई प्रांतातील चळवळीतील आहेत. सहकारी चळवळीने विशेष प्रगती ज्या राज्यांत झाली आहे अशा इतर राज्यांतही यासारखी उदाहरणे आढळतील असा मला विश्वास आहे. मुंबई प्रांतातील सहकारी पतपेढ्यांची यंत्रणा ही प्रथमपासूनच बरीचशी स्वावलंबी होती. मदीच्या काळात पुनर्रचनेचा विशिष्ट कार्यक्रम हाती घेऊन या व्यवस्थेने आपले स्वावलंबन सिद्ध केले. १९४८ मधील पुनर्रचनेपासून या यंत्रणेत नवीन प्रयोगांच्या प्रगतीकडे पद्धतशीर लक्ष पुरविले जात आहे आणि सर्व कार्यक्रम नेटाने कार्यवाहीत आणले जात आहेत, हे यंत्रणेच्या जिवंतपणाचे लक्षण आहे. नूतन घटनांपैकी महत्त्वाच्या गोष्टी म्हणजे राज्य सहकारी बँकेने जिल्हा मध्यवर्ती बँका स्थापन करण्यात घेतलेला पुढाकार व त्या बाबतीत मिळविलेले यश या होत. याबाबतच्या अनुभवावरून हे स्पष्ट होते की एकदा सुदृढ अशा जिल्हा बँका अस्तित्वात आल्या की त्या सामर्थ्यवान् राज्य बँकेपेक्षाही अधिक प्रयत्नांना चालना देऊ शकतात आणि अधिक कार्यक्षम व व्यापक कार्य पार पाडू शकतात. शिवाय या दिशेने हेतुपुरस्सर प्रयत्न करण्यात आले तर स्थानिक नेतृत्व पुढे आल्याशिवाय राहत नाही, हे या इतिहासावरून सिद्ध झाले.

प्राथमिक संस्थांच्या क्षेत्रातही स्थानिक नेतृत्व तयार झाल्याची काही अलीकडील ठळक उदाहरणे दाखविता येतील. माझ्या मते यांपैकी सर्वांत महत्त्वाचे उदाहरण म्हणजे कापूस–विक्री व प्रक्रिया ही कामे करणाऱ्या दक्षिण गुजरायेतील सहकारी संस्थांची स्थापना व प्रगती हे होय. गेली चाळीस वर्षे अत्यंत छोट्या प्रयत्नातून या चळवळीस हल्लीचे स्वरूप प्राप्त झालेले आहे. श्री. पुरुषोत्तम पटेल या अस्सल ग्रामीण कार्यकर्त्याने या कार्याची मुहूर्तमेढ रोविली. टप्प्याटप्प्याने ही चळवळ विकास पावली, अनुभव-संपत्तीच्या बळावर तिची उन्नती घडून आली, आणि तिचा आता जम इतका बसला आहे की या संपन्न शेतीप्रदेशात उत्पन्न होणाऱ्या कापसापैकी फार मोठे प्रमाण या सहकारी संस्थांच्या हातातून जाते. मुंबई प्रांतात ज्या प्रयत्नांतून पुढे अनेक सहकारी साखर कारखाने स्थापन झाले, त्या प्रयत्नांतही ग्रामीण जीवनात रुजलेल्या उत्स्फूर्त स्थानिक पुढारी-पणाचा महत्त्वाचा वाटा दिसून येतो. अनुकूल परिस्थिती असेल तर कणखर पायावर उभ्या राहिलेल्या व कार्यक्षम अशा प्राथमिक सहकारी संस्था भारतात निर्माण होऊ शकतील हे यावरून स्पष्ट होते. हे घडून येण्याकरिता सर्वांनीच झटले पाहिजे; आणि जे धोरण व उपक्रम यांस साहाय्यभूत ठरतील आणि हे त्वरेने घडवून आणतील त्यांस सर्वांनी पाठिंबा दिला पाहिजे.

प्राथमिक संस्थांचा विकास व स्थानिक नेतृत्व निर्माण होण्याच्या मार्गातील एक मोठी उणीव म्हणजे या उद्दिष्टासाठी हेतुपुरस्सर प्रयत्न कोठेही केला जात

नाही, ही होय. सहकारी शिक्षणव्यवस्थेमध्ये हा अभाव ठळकपणे दृष्टोत्पत्तीस येतो. सहकारी शिक्षणाच्या क्षेत्रात अलीकडे मोठ्या प्रमाणावर कार्य सुरू झाले आहे. ग्रामीण पत-पाहणी समितीने केलेल्या शिफारसी अंमलात आणण्यासाठी रिझर्व्ह बँक विशेष परिश्रम घेत आहे. पण सहकारी खात्यातील अधिकारी वर्ग व सहकारी संस्थांचे व्यवस्थापक यांस प्रशिक्षण देण्यावरच लक्ष केंद्रीभूत करण्यात येत आहे.

सर्वसामान्य समासदांवर सहकाराची तत्त्वे बिंबविण्याकरिता विविध शैक्षणिक उपक्रम हाती घेणे ही सहकारी संस्थांची फार महत्त्वाची जबाबदारी आहे, ही गोष्ट सहकाराच्या प्रारंभीच्या कालापासून मान्य करण्यात आली आहे. भारतात या दिशेने फारसे प्रयत्नच करण्यात आलेले नाहीत आणि जे काही करण्यात आले आहेत त्यांमध्ये भारतात प्रत्येक बाबतीत आढळणारा दोष सामावलेला आहे. तो दोष म्हणजे केंद्रीकरण. समासदांना शिक्षण देणे ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची व तातडीची आहे हे केवळ मान्य करून भागत नाही, या शिक्षणाची व्यवस्था व कारभार सर्वस्वी दिल्लीमधून मिळणाऱ्या मार्गदर्शनावर अवलंबून न ठेवता निरनिराळ्या एकजिनसी भौगोलिक प्रदेशांतील विकेंद्रित संघटनांच्या हाती सोपविला जाणे आवश्यक आहे. उत्तम पक्ष म्हणजे मोठ्या कार्यक्षम सहकारी संस्थांपुरती तरी स्वसमासद-शिक्षणाची त्यांच्या व्यवहाराशीच सांगड घालून देणे हा होय. अशा संस्था सध्या, राज्यसंघ अगर या कार्यासाठी उभारलेल्या संस्था यांना पैसा पुरविणें एवढीच आपली जबाबदारी आहे असे समजतात. अशा प्रकारची वर्गणीची जबाबदारी काही राज्यांत सक्तीची केलेली असते, परंतु एवढ्यावर समाधान न मानता प्राथमिक किंवा जिल्हा पातळीवरील सर्व मोठ्या संस्थांनी शैक्षणिक, व सांस्कृतिक उपक्रम आपापल्या सभासदांसाठी सुरू करावे यासाठी त्यांस प्रवृत्त करणे आवश्यक आहे. शिवाय एकमेकांशी संबंधित अशा दोन क्षेत्रांमध्ये संशोधन करण्यात विशेष उत्तेजन द्यावे अशीही सूचना, मी येथे करू इच्छितो. ही क्षेत्रे म्हणजे सहकारी संस्थांच्या कार्याचे अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातून मापन आणि समाजशास्त्रीय दृष्ट्या सहकाराचा अभ्यास ही होत.

भारत सरकारची सहकारविषयक धोरण ठरविण्याची रूढ पद्धती ही सध्या भारतातील सहकारी व्यवस्थेच्या प्रगतीच्या मार्गातील सर्वांत मोठी अडचण आहे. प्रस्तुतचे सरकारी धोरण हुकूमशाही पद्धतीचे व विपरीत आहे; पण त्याचबरोबर ते कमकुवत आणि धरसोडीचेही आहे. सहकाराबाबतचे धोरण सहकारी पद्धतीने ठरविले जात नाही, ही सर्वांत महत्त्वाची गोष्ट आहे. यासंबंधीची परिस्थिती अलीकडेच क्रमशः बिघडत चाललेली आढळून येते. ब्रिटिश राजवटीत सहकाराबाबतचे धोरण मुख्यतः प्रांतिक पातळीवर ठरविले जाई. १९२० पासून अशीही प्रथा पडलेली होती की सहकारी धोरणात करावयाचा बदल बिन-सरकारी कार्यकर्त्यांना महत्त्वाचे आणि प्रतिष्ठेचे स्थान ज्यांमध्ये आहे अशा समित्यांनी

तद्विषयक विचार केल्यानंतरच केला जावा. १९४५ सालच्या दोन महत्त्वाच्या समित्यांचा उल्लेख इतरत्र आलेलाच आहे. या दोन्ही समित्यांचे अध्यक्ष बिन-सरकारी होते. ग्रामीण पत-पाहणी प्रेरक समितीच्या अहवालानंतर धोरण ठरविण्याआधी राज्य व केंद्र पातळीवर तसेच सरकारी व बिन-सरकारी पातळीवर विविध प्रकारच्या अनेक परिषदा झाल्या होत्या. अलीकडे मात्र हे जुने प्रघात मागे पडले आहेत आणि धोरणाबाबतचे निर्णय एकदम स्वयंसिद्ध घोषित केले जात आहेत.[१] हे निर्णय कशाप्रकारे घेतले जातात, याचा थांगपत्ता कोणास लागत नाही. परिणामी, राज्याराज्यातील बिन-सरकारी कार्यकर्ते निरुत्साही बनतात, आणि अधिकारी-वर्ग बुचकळ्यात पडतात. शिवाय हे स्वयंसिद्ध घाईने घेतलेले निर्णय विविध परिषदा, मंडळे, समित्या यांच्यावर लादले जातात आणि ते देशात सर्वत्र एकाच साच्यात लागू करण्यात येतील असे मानले जाते. स्थानिक अनुभव ज्यात जमेस घेतला नाही व स्थानिक कार्यकर्त्यांशी ज्याबाबत विचार-विनिमय केला नाही असे निर्णय सहकारी व्यवस्थेवर लादणे याहून तिच्या वृद्धीस मारक अशी दुसरी गोष्ट नाही. हे जे चालले आहे त्या विरुद्ध मार्ग चोखाळणे हीच आजची खरी गरज आहे. आज कार्यशील, जोमदार, कल्पक अशा विविधरूपी प्रयोगांची सहकारात आवश्यकता आहे. सहकारी शेतीसारख्या नवीन क्षेत्रात याची विशेष गरज आहे. पण सरकारी धोरणाबाबतचे निर्णय अशा रीतीने प्रसिद्ध केले जातात की त्यांमध्ये बदलही लवकरच घाईने केला जाईल ही गोष्ट सर्वांस अपेक्षित असते. परिणामी, कोणत्याही नवीन घोषित दिशांनीसुद्धा कार्यास सुरुवात करणे अशक्य होते व काही घडतही नाही. या निष्क्रियतेमुळे काही संभाव्य चुका व खर्च वाचला तरी गोंधळ टिकून राहतो.

सारांश, भारतातील सहकारी व्यवस्थेचे क्षेत्र आज फार मोठे नसले किंवा तिचे एकंदर कार्य विशेष परिणामकारक वाटले नाही तरी एकंदर यंत्रणेची घडण चुकीची बसली आहे किंवा तिचा विकास भलत्या मार्गाने होत आहे, असे म्हणता येणार नाही. भविष्यात प्रगती वेगाने होणे आणि अंतिमतः विशुद्ध सहकाराची स्थापना होणे, हे दोन गोष्टी पूर्ण होण्यावर अवलंबून आहे. या दोन गोष्टी म्हणजे, शेती आणि लघु-उद्योग या क्षेत्रात पूरक सरकारी धोरण सुयोग्य आणि ओजस्वी होणे आणि सहकारी उपक्रमात विकेंद्रित स्थानिक नेतृत्व व नवनवीन प्रयोग यांस उत्तेजन मिळणे. या गोष्टी घडून येतील तर संपूर्ण भारतातील ग्रामीण अर्थव्यवस्था सहकारी प्रयत्नांनी लवकरच व्याप्त होण्यास काही आडकाठी दिसत नाही.

१. ही परिस्थिती १९५९ च्या अखेरपर्यंत होती. १९६० साली वैकुंठलाल मेहता समितीची नेमणूक झाल्यानंतर आणि तिचा अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर या परिस्थितीत थोडीफार सुधारणा झाली.

व्याख्यान तिसरे

# सहकार आणि आर्थिक समाजाचे परिवर्तन

या पूर्वीच्या व्याख्यानात, सहकारी उपक्रमांच्या विकासाचा निरनिराळ्या संदर्भांतील इतिहास आणि सहकाराची व्याप्ती व यंत्रणा या विषयीची सद्य:स्थिती यांचा परामर्ष घेतला. हे विवेचन लक्षात घेऊन प्रथम सहकाराचे सर्वमान्य मूळ स्वरूप आणि त्याच्या विस्ताराच्या मर्यादा, यांचा विचार करू. तदनंतर, 'सहकारी लोकराज्य' या संज्ञेतील अभिप्रेत आशयांचा सहकाराच्या आजच्या व पुढील विकासाशी संबंध काय आणि हे ध्येय गाठण्याची शक्यता कितपत आहे हे पाहू.

ज्यांस 'सहकाराची मूळ तत्त्वे' असे म्हटले जाते, त्यांस अनुलक्षून सहकाराचे मूलस्वरूप कोणते हे रेखाटण्याचा प्रयत्न पुष्कळदा केला जातो. सहकाराच्या काही 'सनातन-संहिता' ठरल्या गेल्या आहेत आणि अनेकदा या मूलतत्त्वांचा निर्देश करून वाद व चर्चा निकालात काढता येतील असे मानले जाते. रॉचडेल पायोनियर्स यांनी जी तत्त्वे पुरस्कारिली किंवा मूळ रायफीसेन संस्थांमध्ये जी ग्रथित करण्यात आली ती तत्त्वे विशेष प्रमाणभूत मानली जातात. तरीही, काही विशिष्ट सहकारी संस्थांनी आपली स्वत:ची अशीही तत्त्वे बनविली आहेत आणि ती सर्वत्र लागू होतील असा त्यांचा आग्रह असतो. १९ व्या शतकांत जर्मनीमध्ये रायफीसेन आणि शुल्झ-डेलिट्झ यांच्या अनुयायांमध्ये कडवट, आणि आजच्या दृष्टीने निष्फल वादविवाद चालू होते, त्यांवरून 'सनातन' तत्त्वांचा सार्वत्रिक आग्रह धरणे किती धोकादायक आहे हे कळून येते. तरीही विशेष प्रमुख मानलेल्या मूळ तत्त्वांचे कोणते निरनिराळे अर्थ लावले जातात आणि त्यांची व्यवहार्यता कितपत सार्वत्रिक आहे यांविषयी प्रास्ताविक विवेचन करणे उपयुक्त ठरते.

प्रथम, रॉच्डेलची प्रमुख तत्त्वे कोणती, ते आपण पाहू. ही तत्त्वे म्हणजे, खुले

सभासदत्व, लोकशाही-नियंत्रण, खरेदीच्या प्रमाणात लाभांश आणि भांडवलास मर्यादित मोबदला.

सहकारी संस्था राजकारणापासून अगर धर्मकारणापासून अलिप्त आहेत हे उत्कटपणे दर्शविणे हा खुल्या सभासदत्वाच्या तत्त्वाचा प्रमुख उद्देश होता. सहकारी क्षेत्रातील आद्य प्रवर्तक जाज्वल्य श्रद्धेनें मारले गेले असले तरी सहकारी चळवळ धर्मापासून अलिप्त असावी आणि कोणत्याही धर्माच्या व पंथाच्या लोकांना तीत प्रवेश मिळावा असा त्यांचा कटाक्ष होता. खुल्या सभासदत्वाचा आग्रह धरल्यास भागाची किंमत कमी ठेवून अगदी गरिबांनाही संस्थांचे सभासद करून घेणे हेही क्रमप्राप्त होते; परंतु खुल्या सभासदत्वासारखे सकृद्दर्शनी साधे तत्त्वही काही प्रकारच्या संस्थांस त्रासदायक ठरते असे आढळून येते; व हे तत्त्व सर्वत्र लागू करण्यासारखे नाही हे ध्यानात येते. खुल्या सभासदत्वाच्या तत्त्वानुसार किरकोळ दुकानांसारख्या संस्थांचा कारभार चालविण्यात फारशा अडचणी आल्या नाहीत. अशा दुकानांचे सभासद होऊ इच्छिणारे बहुतेक जवळपासच्या भागात राहणारे असत आणि दुकानाच्या नित्याच्या व्यवहारात, विशेषत: ते रोखीचे असल्यास, कोणाला मज्जाव करण्याचे कारण उद्‌भवत नसे. याच्या उलट मूळच्या रायफीसेन पतपेढीसारख्या संस्थेचा विचार केला तर खुले सभासदत्व महत्त्वाचे अगर सुसंगत वाटत नाही; एवढेच नव्हे तर ते या संदर्भात स्वीकारार्हही दिसत नाही. ज्या संस्थेच्या कारभारात सर्व सभासदांस एकमेकांचे व्यवहार, शील वा पत यांविषयी संपूर्ण माहिती असणे फार महत्त्वाचे असते, तेथे सभासदत्व खुले असू शकणार नाही. एकमेकांबद्दलच्या वैयक्तिक माहितीस अनुसरून जेथे कामकाज चालते, तेथे नवीन अर्जदार व सभासद यांच्या निवडीबाबत दक्षता बाळगणे हा जुन्या सभासदांचा हक्कच नव्हे तर ती त्यांची जबाबदारी आहे. साहजिकच मूळच्या रायफीसेन ऋण-संस्थांच्या बाबतीत खुले सभासदत्व गर्हणीय ठरले. तसेच त्या संस्थांच्या विशिष्ट घडणीमुळे 'अमर्याद' जबाबदारीचे तत्त्व त्यांस पत्करावे लागले. (या पुराण प्रकारच्या संस्थेत अमर्याद जबाबदारी अत्यंत महत्त्वाची व आवश्यक ठरली तरी अमर्याद जबाबदारीचे तत्त्वही इतरत्र स्वीकारणे युक्त वा इष्ट नाही, असेही लवकरच आढळून आले.) रायफीसेन संस्थांखेरीज इतर प्रकारच्या संस्थांमध्येही खुल्या सभासदत्वाची स्वीकृती जपूनच करावी लागते. काही विशिष्ट प्रकारच्या संस्थांचा कारभार व्यवस्थित चालावा यासाठी संस्थेच्या सभासदांमध्ये आर्थिक बाबतीत समानता राखावी लागते आणि विशिष्ट वर्गाच्या मंडळींस प्रवेश दिला जाऊ नये याकडेही कटाक्षाने लक्ष द्यावे लागते. उदाहरणार्थ, ग्रामीण पतपेढ्यांमध्ये सावकार व व्यापारी यांना प्रवेश मिळू दिला तर तिचे व्यवहार विपरीत होतील आणि ज्या वर्गाचे अनिष्ट उद्योग बंद पाडण्यासाठी संस्थेची स्थापना झाली त्याच वर्गाच्या हितासाठी संस्थेची संपत्ती वापरली जाईल. शिवाय

खुले समासदत्व याचा अर्थ समासद संख्येवर अजिबात मर्यादा नाही असा कधीच होत नाही. व्यवहारची व्याप्ती, इष्ट परिणाम किंवा आकार या पलीकडे वाढू नये म्हणून व्यवहाराचे प्रकार व उलाढाल आणि समासद-संख्या यांवर मर्यादा घालणे हे बहुतेक प्रकारच्या संस्थांच्या बाबतीत करावे लागते.

जेथे अर्थव्यवस्थेचा नियोजनपूर्वक विकास घडवून आणला जात आहे आणि जेथे सहकार हे नियोजनाचे एक साधन बनले आहे, तेथे खुल्या समासदत्वाच्या कल्पनेस अगदी वेगळा अर्थ प्राप्त होतो आणि तिला एक नवीन कलाटणी मिळते. उदाहरणार्थ, शेतकऱ्यांमधील विशिष्ट वर्गांना कर्ज-पुरवठा करण्याचे साधन म्हणून जर सरकार सहकारी संस्थांची योजना करीत असेल, तर या उद्दिष्टासाठी स्थापन करण्यात आलेल्या संस्थांवर आपापल्या क्षेत्रातील त्या विशिष्ट वर्गातील सर्वांस खुला प्रवेश द्यावा असे बंधन पाहिजे. अशा परिस्थितीत सहकाराची निरनिराळी तत्त्वे परस्परविरोधी आहेत असे सकृद्दर्शनी वाटेल. कारण सहकारी समूह ऐच्छिकतेवर उभारला गेला पाहिजे, या तत्त्वानुसार आपणांस पसंत नसलेल्या व्यक्तींस प्रवेश देण्याची सक्ती सहकारी संस्थांवर करता कामा नये; परंतु उलट सरकारी धोरण अंमलात आणण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या संस्थांस ज्यांस विशेष लाभ उपलब्ध करून द्यावयाचा त्यांपैकी काहीना तो नाकारण्याची मुभा दिली तर सरकारी धोरणच मर्यादित किंवा निष्फळ ठरेल. विशिष्ट सहकारी संस्थांचे समासद होण्याची सक्ती अप्रत्यक्षरीत्या करणे यातही अशीच निराळ्या अर्थाने विसंगती भासते. उदाहरणार्थ, भू-सुधारणा किंवा पुनर्वसनाच्या अनेक योजनांमध्ये, ज्यांस त्यापासून फायदा घ्यावयाचा आहे अशा सर्वांनी विशिष्ट सहकारी संस्थेचे समासद झाले पाहिजे असे बंधन घातले जाते. यामुळे त्या वर्गातील प्रत्येकाला सभासद म्हणून स्वीकारलेच पाहिजे असे प्रस्थापित संस्थेवर बंधन असते, एवढेच नव्हे तर त्या विशिष्ट वर्गात सामावून घेण्याची जो आकांक्षा धरील त्यासही विशिष्ट सहकारी संस्थेचे सभासदत्व स्वीकारावेच लागते.

याप्रमाणे, बदलत्या परिस्थितीप्रमाणे खुल्या सभासदत्वाच्या तत्त्वाचे निरनिराळे अर्थ लावावे लागतात; किंवा त्यांत अनेक अपवाद स्वीकारावे लागतात. कितीही अर्थ व अपवाद झाले तरी एक सारभूत तत्त्व सार्वत्रिक मान्यतेचे म्हणून उरतेच. ते म्हणजे, संस्थेच्या व्यवहारांशी ज्या बाबींचा संबंध येत नाही अशा बाबी जमेस धरून सहकारी संस्थेचे समासदत्व कोणासही नाकारले जाऊ नये. उदाहरणार्थ राजकीय मते, धार्मिक श्रद्धा, अशा कारणांवरून कोणालाही समासदत्व नाकारले जाऊ नये; कारण अशा गोष्टींचा सहकारी संस्थांच्या व्यवहारांशी सहसा संबंध येत नाही, हा नियमही सर्वत्र मानला जातो असे नाही. संस्थांचे कार्य सुरळीत चालण्यास त्यांचे समासद सर्व एकाच जातीचे किंवा जमातीचे असणे हे महत्त्वाचे आहे असे अनेकदा प्रतिपादिले जाते. उघडपणे फक्त एकाच जातीचे किंवा जमातीचे

समासद असणाऱ्या अनेक संस्था पूर्वी भारतात होत्या आणि त्यांपैकी काहींचा कारभार व्यवस्थित चालत होता. सध्या मात्र अशा संकुचित समासदत्वामुळे खुल्या लोकशाही समाजरचनेची उभारणी करण्यात अडथळा येतो असे मानले जाते. शेवटी हेही खरे की सभोवतालच्या सामाजिक परिस्थितीतील वैशिष्ट्ये सहकारी संस्थांत प्रतिबिंबित होणे अपरिहार्य आहे. सहकारी संस्थांचे समासदत्व खरोखर प्रत्यक्षात खुले आहे की नाही किंवा जातीयता, राजकीय मते वा धार्मिक मते यांचा संस्थेच्या व्यवहारावर प्रभाव पडतो की नाही या बाबी, संस्था ज्या समाजात कार्य करीत आहेत किंवा ज्याची त्या अभिव्यक्ती आहेत, त्या समाजाची रचना व स्वभाव-विशेष, यांवर अवलंबून असतात. किबुत्झ या संस्थेचे सामर्थ्य त्यातील एकजीवितेमुळे आणि ज्यू-राष्ट्र-स्थापनेच्या आत्यंतिक प्रेरणेने सर्व सभासद भारले गेले होते म्हणून, प्राप्त झाले हे निर्विवाद सत्य आहे.

'एक व्यक्ती, एक मत' या नियमात रॉचडेल प्रवर्तकांनी लोकशाही नियंत्रणाचे तत्त्व सामावले. सामान्यत: हे तत्त्व सर्व जगातील सहकारी संघटनांनी औपचारिकरीत्या मान्य केलेले आहे. सहकारी संघटनेतील मतदानाचा संबंध व्यापक समाज-व्यवहाराशी नसून केवळ विशिष्ट अर्थव्यवहार करणाऱ्या एका संस्थेच्या कारभाराशीच असतो. यामुळे 'एक व्यक्ती, एक मत' या नियमाचा परिणाम मुख्यत: सहकारी संस्थांत श्रीमंतांचे महत्त्व काही अंशी कमी करणे आणि त्यांतील नियामक सत्ता केंद्रीभूत होऊ न देणे या दिशांनी होतो. जोपर्यंत संस्थेचे सभासदत्व पुष्कळसे एकजिनसी असते, तोपर्यंत त्याचे काही अनिष्ट परिणाम होत नाहीत. पण सभासद विविध थरांतील असले किंवा त्यांचे हितसंबंध परस्परविरोधी असले तर मात्र हा नियम वेळेस अयुक्त ठरतो. उदाहरणार्थ, एखाद्या वस्तूचे विक्रेते व ग्राहक दोन्हीही एकाच संस्थेचे सभासद असतील तर अशा गटांमधील मतभेद 'एक व्यक्ती, एक मत' या नियमानुसार सोडविता येणार नाहीत. तसेच वरील स्तराच्या सांघिक संघटनांमधील समासदांच्या विविध हितसंबंधांबाबत समतोल राखण्यात निर्माण होणाऱ्या अडचणी मताधिकाराविषयी इतर योजना स्वीकारूनच सोडवाव्या लागतील. जेथे सहकार सरकार-पुरस्कृत असेल तेथे नियमन सर्वस्वी लोकशाही पद्धतीस अनुसरून साहजिकच होत नाही. सरकारी पुरस्कार आणि मदत यांबरोबर काही अंशी सरकारी देखरेख आणि नियंत्रण येणे सहज होते.

समासदास घ्याव्या लागणाऱ्या भांडवलाच्या भागाची किंमत कमी ठेवणे ही गोष्टसुद्धा, खुले सभासदत्व व लोकशाही नियंत्रण यांस परिपोषक म्हणून स्वीकारण्यात आली. कोणतीही सहकारी संस्था स्थापण्यास मालकीच्या भांडवलाची जी रक्कम लागते तिच्या अनुरोधाने भांडवल-भागाची किंमत ठरविली जाते. मालकीचे भांडवल ज्या उपक्रमास बरेच लागत नाही आणि ज्या उपक्रमात अनेकांना भाग घेता येणे शक्य आहे, अशा उपक्रमात अल्प रकमेचा भांडवल-भाग ठेवणे

शक्य असते. परंतु अशी परिस्थिती नेहमीच उपलब्ध होत नाही. काही प्रकारांत, विशेषत: उत्पादक संस्थांमध्ये, मालकीच्या अधिक भांडवलाची आवश्यकता आणि संभाव्य समासदांची संख्या मर्यादित, या दोन्ही गोष्टी प्रसंगी एकत्र आढळतात. अशा प्रकारच्या संस्थेमध्ये प्रत्येक सभासदाकडून अपेक्षित भाग-भांडवलाचे मूल्य अधिक असावे लागते. शिवाय अशा संस्थांमध्ये स्थैर्य यावे व संस्थेचे सामर्थ्य व कार्यक्षमता टिकावी म्हणून गंगाजळी आणि इतर भांडवल-निधी वाढविणे यांवर विशेष भर दिला जातो. याचा परिणाम असा होतो की कालांतराने वाढलेल्या जुन्या संस्थांसमोर नवीन सभासदांस प्रवेश देण्याच्या बाबतीत एक विशिष्ट समस्या उभी राहते. मूळच्या सभासदांची ज्या प्रमाणात संस्थेच्या वृद्धीस मदत झाली असेल, त्याच्या तोलात नवीन सभासदांनी प्रवेश मिळण्याचे वेळी भाग-भांडवल देणे अशक्यप्राय असते, पण त्यामुळे जुने सभासद नवीनांस प्रवेश देण्याबाबत अनेकदा उत्सुक नसतात.

रॉचडेल प्रवर्तकांनी सहकारी संस्थांच्या कारभाराच्या दृष्टीने प्रस्थापित केलेले अत्यंत महत्त्वाचे तत्त्व म्हणजे खरेदीवर लाभांश देणे. या तत्त्वाचा व्यापक आशय असा की नफ्याची वाटणी, सभासदाच्या भांडवलाच्या गुंतवणुकीवर किंवा इतर गोष्टींवर अवलंबित न ठेवता सभासदाने संस्थेबरोबर केलेल्या व्यवहाराच्या परिमाणास अनुसरून करण्यात येईल.

खुले सभासदत्व व लोकशाही नियंत्रण या तत्त्वांप्रमाणेच हे तत्त्वही सर्वत्र मान्य करण्यात आलेले आहे. प्रत्यक्षात मात्र त्याला सर्वत्र सारखेच महत्त्व देण्यात आलेले नाही. सहकारी दुकानाच्या व्यवहारामध्ये हे तत्त्व विशेष योग्य ठरले तरी प्राथमिक पतपेढीच्या व्यवहारांमध्ये त्याला महत्त्वाचे स्थान असणार नाही. तसेच केवळ परस्पर-साहाय्यक व्यवहार करणारी संस्था ही सीमा ओलांडून सहकारी संस्थेस स्वतंत्र आर्थिक अस्तित्व व कार्यक्षेत्र प्राप्त झाले की सभासदांच्या व्यवहाराच्या परिमाणानुसार सर्व वाढावा वाटून टाकणे या तत्त्वाचे महत्त्व कमी-कमी होत जाते. दोन प्रकारच्या व्यवहारांकडे लक्ष वेधून हा मुद्दा जास्त स्पष्ट करता येईल. सभासद नसलेल्याशी कोणत्याही संस्थेचे व्यवहार बरेच असले व त्यातून मोठा लाभांश असला तर हा सभासदांत वाटून टाकावयाचा काय हा एक मुद्दा. आणि दुसरा, याच्याशीच संलग्न गंगाजळी व नवीन भांडवल संचय याची तरतूद संस्थेने कशी करावी हा. दरवर्षीचा बहुतेक सर्व वाढावा सभासदांच्या व्यवहाराच्या परिमाणात वाटून टाकावा, या तत्त्वाचे पालन एखाद्या विशिष्ट क्षेत्रात नियमित व्यवहार करणारी संस्था करू शकेल; परंतु स्वत:चे कार्यक्षेत्र विविध करणे, नवनव्या व्यवहारांचे परिमाण वाढविणे व या दिशेने दीर्घकालीन योजना करून त्याकरिता व्यवहाराच्या फायद्यातून प्रतिवर्षी तरतूद करणे याकडे संस्थेचे लक्ष

लागले म्हणजे तिचे केवळ परस्पर साहाय्यक स्वरूप कमी महत्त्वाचे होऊन नफा वाटणीची गमकेही बदलू लागतात.

सहकाराच्या काही मूलभूत तत्त्वांचे जे थोडसे विवेचन येथवर केले त्यावरून सहकारी कार्याचा विकास होता होता वेगवेगळ्या परिस्थितींत आणि भिन्न-भिन्न क्षेत्रांत तत्त्वांची मूळची मांडणी व धाटणी कशी बदलत गेली हे कळूत येईल. मांडणी व आशय या दोन्ही दृष्टींनी सहकाराची महत्त्वाची लक्षणे कोणतीं व बिनमहत्त्वाची कोणती यांची निवडानिवड करण्यास मार्गदर्शक म्हणूनही या तत्त्वविवेचनाचा उपयोग होईल. असल्या चर्चेने सहकारी मूल्यांवर, तसेच सहकारी उद्दिष्टांवर बराच प्रकाश टाकला तरी आर्थिक व्यवहाराच्या विविध क्षेत्रांमध्ये सहकाराचा प्रसार व व्याप्ती किती प्रमाणांत होऊ शकेल याबाबत कोणतेही मार्गदर्शन किंवा उलगडा तिजमुळे होत नाही. सहकाराच्या संभाव्य व्याप्तीच्या प्रश्नाचा विचार सहकारी संघटनेचे खरे लक्षण व रूप कोणते हे लक्षात घेऊनच करावा लागतो.

सर्व सहकारी संघटना या मूलतः परस्पर-साहाय्यक संघटना म्हणून बनलेल्या असतात. स्वतंत्र आर्थिक अस्तित्व असलेल्या अशा आपल्या सभासदांच्या आर्थिक व्यवहारांपैकी काही व्यवहार सामुदायिकरीत्या परस्पर साहाय्याने करण्याकरिता त्या अस्तित्वात येतात. मूलस्वरूपाच्या दृष्टीने सहकारी संस्था केवळ परस्पर-साहाय्यक असल्याने त्यांना स्वतःची निराळी कमाई करण्याचे प्रयोजन नसते; आणि म्हणून सहकारी परस्पर-साहाय्यक संस्था या आर्थिक व्यवहाराच्या दृष्टीने 'स्वतंत्र' नाहीत, इतकेच नव्हे तर त्यांचे आर्थिक क्षेत्रातील स्वतःचे निराळे असे अस्तित्वच मानता येत नाही असे प्रतिपादणारा एक पक्ष आहे.

सहकारी संस्था बनविण्यासाठीं एकत्र येणारे आर्थिक व्यवहाराचे स्वतंत्र घटक अनेक प्रकारचे असू शकतात. उदाहरणार्थ, ग्राहक संस्था काढणारी ग्राहक कुटुंबे किंवा उत्पादक संस्था बनविणारे व्यक्तिगत शेतकरी, कारागीर यांच्यासारखे हे स्वतंत्र व्यावसायिक घटक असतील अगर आपला संघ बनवून काही समान उद्दिष्ट साधू पाहणारे मजूरही असे घटक असतील. उदाहरणार्थ, जंगलतोडीसाठी एकत्र येणारे जंगल कामगार, दगडांच्या खाणीतील खाणकामगार किंवा रस्ते व इमारती यांची कामे ठेक्याने घेण्यासाठी एकत्रित झालेले मजूर.

सहकाराच्या या व्याख्येमुळे अनेक भिन्न-भिन्न प्रकारच्या आर्थिक घटकांनी एकत्र येऊन सामुदायिकपणे एखादा व्यवहार हाती घेण्यास कोणताही प्रत्यवाय येत नाहीं. उदाहरणार्थं ठेवी ठेवू इच्छणारे किंवा कर्ज घेऊ इच्छिणारे एकत्र येऊन एखादी पेढी स्थापू शकतील, किंवा कापूस पिकविणारे शेतकरी व हातमागवाले विणकर एकत्र येऊन सहकारी सूतगिरणी काढू शकतील. याच रीतीने सहकारी संस्थेच्या सभासदांतही लहानमोठ्या आकारांचे आर्थिक घटक म्हणजे नुसती

एखादी व्यक्ती किंवा त्यांचा एखादा संघ दोन्हीही सभासद असू शकतील. अर्थात् अधिक संमिश्र किंवा गुंतागुंतीच्या संघटनांच्या कार्यवाहीमध्ये काही खास प्रश्न निर्माण होतात. संस्थांचे धोरण ठरविताना निर्माण होणारे सभासद-वर्गांचे हितसंघर्ष टाळणे किंवा सरकारी शासन यंत्रणेचे वजन निश्चित करणे यांसारखे हे प्रश्न असतात. परंतु यामुळे संस्थांच्या सहकारी रूपाला कोणतीही बाधा पोहोचत नाही.

सहकाराबाबतच्या या दृष्टिकोनामुळे किंवा सहकार-क्रियेच्या या व्याख्येमुळे सहकाराच्या वाढीस मिळणारा अवसर व सहकाराची व्याप्ती ही मर्यादितही होतात. निरनिराळ्या प्रकारच्या अनेक स्वतंत्र आर्थिक घटकांनी काही समान उद्दिष्टाने एकत्र येण्यासाठीं काही मूलभूत गोष्टींची आवश्यकता असते व त्यातून सहकार-क्षेत्राच्या मर्यादा उद्‌भवतात. ज्या वेळी कोणताही एखादा आर्थिक व्यवहार अनेक स्वतंत्र घटकांचा सामुदायिक व्यवहार म्हणून चालविणे शक्य नसते त्या वेळी साहजिकच तो सहकारी कक्षेत आणता येत नाही. तसेच प्राय: यामुळेच प्राथमिक सहकारी संघटना ही स्थानिक गटांची अशीच बनवावी लागते. बँकिंगच्या क्षेत्रात सहकाराचा प्रसार होतो तो प्राथमिक पतपेढयांच्या संयुक्त संघटनेच्या द्वारे किंवा लहान घटक-बँकांच्या द्वारे होत असतो. जेथे या प्रमाणे क्रिया-व्यवहारांचे मूलभूत विकेंद्रीकरण झालेले नसते किंवा होणे शक्य नसते त्या ठिकाणी खऱ्या अर्थाने सहकार-क्रिया सुरूच होऊ शकत नाही. वाहनांच्या लहान लहान मालकांना एकत्र आणून रस्ता वाहतूक व्यवसाय सहकारी पद्धतीने संघटित करता येईल. परंतु रेल्वे वाहतुकीच्या बाबतीत हे शक्य होणार नाही. म्हणून सर्वसामान्य जनतेच्या सार्वत्रिक उपयोगाकरिता उभारलेले संमिश्र स्वरूपाचे पण एकत्रितरीत्या चालविलेले सार्वजनिक व्यवहार हे सहसा सहकारी रचनेत बसत नाहीत; त्याचप्रमाणे तेल, लोखंड, कोळसा वगैरेंच्या खाणी किंवा इतर मोठे कारखाने व यंत्रोद्योग यांच्या बाबतीत, म्हणजे उत्पादनाचा घटक जेथे मोठा असतो आणि जेथे वेगवेगळ्या आणि स्वतंत्र अशा उत्पादकांच्या किंवा उपभोक्त्यांच्या संघांकडून त्या कार्याचे संचलन योग्य रीतीने व सोयीस्करपणे होऊ शकत नाही, त्या ठिकाणी ही सहकारी रचना निर्माण करता येणार नाही. आधुनिक मोठ्या कारखानदारीच्या बाबतीत बऱ्याच प्रमाणात अशीच परिस्थिती आढळून येते. यावरून असा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही की, वेगवेगळ्या स्वतंत्र आणि लहान प्रमाणावरील उद्योगांची सहकारी पद्धतीने संघटना केली असता त्यातून एक कार्यक्षम आणि सोयीस्कर यंत्रणा निर्माण होऊ शकते आणि मोठ्या प्रमाणावरील व्यवहाराचे अनेक फायदे अशाप्रकारे लहानांस मिळू शकतात; परंतु सार्वजनिक उपयोगांच्या व्यवसायांत, तसेच आधुनिक मोठ्या यंत्रोद्योगांच्या उत्पादन-क्षेत्रात सहकाराला कमी वाव आहे.

शुद्ध सहकाराची अशी व्याख्या वरप्रमाणें होत असली तरी प्रत्यक्षात मूलत:

परस्पर-साहाय्यक स्वरूप नसलेल्या अनेक संस्थांस आज सहकारी म्हणून संबोधले जाते. मुळात परस्पर-साहाय्यक सहकारी संस्था म्हणून उभारलेल्या संस्थांच्या मालकीच्या व त्यांनी चालविलेल्या संस्था ह्या या प्रकारात सर्वांत अधिक व महत्त्वाच्या आहेत. मूळच्या परस्पर-साहाय्यक संस्था, धनसंचय करून किंवा अन्य प्रकारे साधने प्राप्त करून आपल्या प्राथमिक कार्यक्षेत्राशी संलग्न अशा क्षेत्रात मूळचा व्यवहार विस्तारणे व कार्यक्षम करणे अशाकरिता नवीन प्रकारचे अर्थव्यवहार हाती घेतात. परंतु या नवीन अर्थव्यवहार-संस्थांची संघटना परस्पर-साहाय्यक सहकारी स्वरूपाची न बनविता त्या पूर्णपणे मूळ सहकारी संस्थेच्या मालकीच्या राहतात. म्हणजे मालकी सहकारी संस्थेची, याखेरीज खाजगी व्यक्ती अगर मंडळी यांच्या मालकीच्या संस्थांत आणि यांत संघटनादृष्टया काही फरक उरत नाही.

सहकाराच्या काही तत्त्वप्रणेत्यांनी सहकारी संस्थांनी चालविलेले असे व्यवहारही सहकाराच्या वर्णनात अगर व्याख्येत बसतात, असे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी त्यांनी उपभोक्त्याच्या (ग्राहकाच्या) सार्वभौमत्वाचा सिद्धान्त पुढे मांडलेला आहे. त्यांच्या या मांडणीमध्ये उत्पादकांचे स्वतंत्र अस्तित्व ते मानीत नाहीत, आणि सर्व उत्पादक संघटना या अखेर ग्राहकांच्या (उपभोक्त्यांच्या) धाऊक सहकारी संघटनांमध्ये विलीन झाल्या पाहिजेत, असा त्यांचा सिद्धान्त आहे.

इंग्लंडमधील ग्राहक सहकारी चळवळीच्या पुरस्कर्त्यांनीही ग्राहकांच्या श्रेष्ठत्वाचा पक्ष उचलून धरून ग्राहकी व्यवस्थेद्वारा झालेल्या सहकाराच्या विकासाचे श्रेष्ठत्व प्रतिपादले आहे. पुढील उताऱ्यामध्ये त्यांच्या या दृष्टिकोनाचे सयुक्तिक विवेचन आपणांस पाहावयास मिळेल :--

"कोणताही अंतर्गत हितविरोध जेथे नाही अशा संघटनेमध्येच सर्वव्यापी सहकाराचे हे ध्येय उत्तम रीतीने प्रतीत होऊ शकते. उत्पादकांच्या सहकारी संघटना बनविण्याच्या प्रयत्नात निरनिराळ्या गटांच्या हितविरोधाची समस्या प्रकट झाल्यामुळे हा प्रयत्न मागे पडून, आपल्या गरजा भागविण्यासाठी, ग्राहकांमधील सहकारची कल्पना पुढे आली. प्रत्येकाच्या खरेदीच्या प्रमाणात लाभांश (नफा) वाटून देण्याच्या सोप्या पद्धतीमुळे आपल्या संचित निधीचे पुढे काय करावयाचे याबाबतच्या आधीच्या अडचणी व वादविवाद टाळण्याचा एक व्यवहार्य मार्ग तावडतोब उपलब्ध झाला, तसेच त्यामुळे नफा नष्ट करणे, सहकारी उद्योगाच्या वाढीसाठी बचतनिधी जमविणे आणि ज्यावर पुढील वाढ आधारली जाईल अशी खात्रीची बाजारपेठ निर्माण करणे या सर्वांबाबत एक रामबाण उपाय सापडला. त्यातूनच एकनिष्ठा व हितैक्याची भावना उदयास आली आणि त्यामुळेच लोकशाही नियंत्रणाची सार्वत्रिक पद्धत आणि निःस्वार्थी पुढाऱ्यांकडून स्वयंस्फूर्त रीतीने होणारे तिचे मार्गदर्शन या गोष्टी शक्य झाल्या. आधुनिक जगातील अर्थोत्पादक

व्यवसायाच्या इतर कोणत्याही प्रकाराहून सहकारी चळवळ वेगळी ठरते, ती यामुळेच". [1]

उपरोक्त विधानात करण्यात आलेला दावा काहीसा अतिशयोक्त आहे. ग्राहक सहकारी संस्थांच्या व्यवहारांचे खरे क्षेत्र म्हणजे व्यापाराचे क्षेत्र. तेवढ्यापुरता फार तर तो खरा ठरेल. परंतु आर्थिक हितसंघर्ष टाळले जातात किंवा नफ्याचा प्रश्न नाहीसा होऊन त्या बरोबरच बचत वाढविण्याचा एक मार्ग उपलब्ध होतो असे ज्यावेळी दावे करण्यात येतात, त्या वेळी ते अतिशयोक्तिपूर्ण आहेत असे म्हणावे लागते. सहकारी संस्था ही जोवर पूर्णांशाने परस्पर साहाय्यक स्वरूपाची असते, तोवर खरेदीचे प्रमाणात लाभांश वाटण्याची ही सोपी पद्धत अत्यंत मौल्यवान् ठरते यात शंका नाहीं. परंतु ती धनसंचय करू लागली आणि त्याच्या जोरावर इतर व्यवसायांची मालकी तिने धारण केली म्हणजे विभाजनाचे व विरोधी हितसंबंधांत तडजोड करण्याचे प्रश्न निर्माण होणे अपरिहार्य होते.

लहान प्रमाणावरील व विखुरलेल्या आर्थिक व्यवसायांच्या बाबतीत विभाजनाचा हा प्रश्न एवढा महत्त्वाचा नसतो. कारण या संस्थांच्या सदस्यांपुढे व्यापारी-दलालांकडून होणारी आपली पिळवणूक कशी थांबेल हाच विचार प्रामुख्याने असतो; आणि त्यांचे सर्व व्यवहार चालू बाजारपेठेस अनुसरूनच असतात. परंतु आधुनिक काळामध्ये उद्योगधंद्यांचे आकारमान वाढत गेले आणि सहकारी उद्योगांना काही ठिकाणी एकाधिकारसम स्थिती प्राप्त झाली म्हणजे या प्रश्नाचा विचार उत्कटपणे करणे आवश्यक ठरते. आजपावेतो निरनिराळ्या क्षेत्रांमध्ये आलेला अनुभव लक्षात घेता विशिष्ट सहकारी संस्था स्वार्थी दृष्टिकोन स्वीकारीत नाहीत असे म्हणता येत नाही. उदाहरणार्थ, ग्राहक सहकारी चळवळीच्या वर्चस्वामुळें इंग्लंडमध्ये उत्पादक सहकारी व शेती सहकारी संस्थांची वाढ खुंटली, हे मान्य झाले आहे. तसेच आयर्लंडमध्ये सर होरेस प्लंकेट यांच्या नेतृत्वाखाली चाललेल्या आयरिश शेती सहकारी संघटनेला आपल्या मलई उत्पादन (क्रीमरी) व्यवसायाचा व आपल्या विक्री-व्यवस्थेचा ताबा मिळविण्यासाठी ग्राहकांच्या धाऊक सहकारी संस्थांशी सतत झगडावे लागते हेही नमूद आहे.[2]

---

१. 'कंझ्यूमर्स को-ऑपरेशन इन ग्रेट ब्रिटन', कार-सॉंडर्स, फ्लोरेन्स, पिअर्स,(१९३८), पृष्ठ ५१४-१५.

२. जी. डी. एच्. कोल : 'दि ब्रिटिश को-ऑपरेटिव्ह मूव्हमेंट इन अ सोशालिस्ट सोसायटी' (१९५१) चॅप्टर ७.

या संदर्भात रसेलने आपल्या प्रसिद्ध प्रबंधात उत्पादक-ग्राहकांचे तसेच नागर आणि ग्रामीण भागांचे हितसंबंध वेगवेगळे असण्याची शक्यता आहे, ही गोष्ट उघडपणे मान्य केली आहे, हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे. 'दि नॅशनल बिईंग: सम् थॉट्स ऑन् आयरिश पॉलिसी' (१९१६).

[ पुढील पानावर ]

ग्राहकांच्या घाऊक सहकारी संस्थेप्रमाणे एखादी मोठी बहुउद्देशी सहकारी संस्था किंवा एखादी मजूर संघटनाही उत्पादनाच्या व तत्संबंधित आर्थिक व्यवहाराच्या क्षेत्रामध्ये पदार्पण करू शकते. या बाबतचे अत्यंत महत्त्वाचे उदाहरण आपणांस इस्रायलमध्ये पाहावयास मिळते. मांडवलदारी अर्थरचना असलेल्या देशांपैकी इस्रायल व जपान या दोन देशांत आज सहकाराचा सर्वांत अधिक फैलाव दिसून येतो. म्हणून या दोन देशांतील सहकाराबाबतच्या घडामोडींची थोडीशी चर्चा सहकारी व्यवहारांचे क्षेत्र वाढविण्याबाबतच्या काही महत्त्वाच्या प्रश्नांवर प्रकाश पाडण्याच्या दृष्टीने उपयुक्त होईल, असे वाटते.

ज्या थोड्या देशांमध्ये शेतीचा कर्जपुरवठा, शेतमालाची विक्री व प्रक्रिया ही जवळजवळ पूर्णपणे सहकारी कक्षेत आली आहेत, एवढेच नव्हे तर प्रत्यक्ष जेथील शेती-उपादनही बऱ्याच मोठ्या प्रमाणात सहकारी कक्षेत आले आहे अशा देशांपैकी इस्रायल हा एक आहे. सध्या साम्यवादी देश सोडले तर जेथे बऱ्याच मोठ्या प्रमाणात सहकारी शेती केली जाते असा इस्रायल हाच एक देश दिसतो. इस्रायल मधील सहकारी चळवळीचे आणखी दुसरे महत्त्वाचे लक्षण म्हणजे शेतीखेरीज अन्य व्यवहारांतही सहकाराला, संकुचित व व्यापक दोन्ही अर्थांनी, तेथे अत्यंत महत्त्व प्राप्त झालेले आहे. इस्रायलचा १९५६ सालामधील राष्ट्रीय उत्पन्नाचा हिशेब पाहता एकूण राष्ट्रीय उत्पन्नामध्ये सहकारी उद्योग-व्यवसायापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाण, इस्रायली अर्थ-व्यवस्थेच्या बहुतेक कक्षांमध्ये मोठे आहे असे दिसून येते. वाहतूक, व्यापार व अर्थपुरवठा या तिन्ही विभागांत ठोकळमानाने प्रत्येकी सुमारे ३५ टक्के उत्पन्न सहकारी व्यवहारापासून मिळत होते. इमारती व सार्वजनिक बांधकामामध्ये ४५ टक्के, शेतीमध्ये ६४ टक्के, लहान व मोठ्या उद्योगधंद्यांमध्ये १९ टक्के आणि एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या २८ टक्के उत्पन्न सहकारी उद्योग-व्यवसायांपासून मिळत असे[1]

हे आकडे डोळ्यांत भरण्यासारखे आहेत. यावरून इस्रायलमधील अर्थरचना 'सहकारी लोकराज्य' या संज्ञेस पात्र होण्याच्या अगदी जवळ येते असे वाटू लागते. परंतु या संदर्भात सहकारी व्यवहार ही संज्ञा वापरताना या संस्थांच्या संघटनांतील

---

[ मागील पानावरून ]

सस्कत्शेवन मधील को-ऑपरेटिव्ह कॉमनवेल्थ फेडरेशनचे सरकार व त्यांचा पक्ष यांच्यामधील ताणावलेल्या संबंधाबाबतची, तसेच भांडवलदारी आर्थिक चौकटीचा यावर जो प्रभाव पडला त्याबाबतची संपूर्ण हकीकत कळण्यासाठी एस्. एम्. लिप्सेट यांचे 'ॲग्रेरियन सोशालिझम' (१९५०) हे पुस्तक पहा.

१. एल्. गूएल्फा : लेकॉनमी उव्हरीए आं इस्रायल (इन्स्टिट्यूट द सायन्स इकॉनॉमिक ॲप्लीके)

काही महत्त्वाचे विशेष लक्षात ठेवणे जरुरीचे आहे. त्यातल्या त्यात इस्रायलमधील सहकारी उद्योगांच्या बाबतीत हे फार महत्त्वाचे आहे. खुद्द इस्रायलमध्ये व्यापक स्वरूपाच्या उद्योग-संस्थांच्या क्षेत्रात 'सहकार' ऐवजी 'सामुदायिक कक्षा' किंवा 'कामगार कक्षा' असा शब्दप्रयोग करण्याचा सर्वसाधारण प्रघात आहे. या सर्वंकष संज्ञेत खऱ्या अर्थाने सहकारी म्हणजे परस्परसाहाय्यक संस्थांचा समावेश होतो आणि शिवाय सहकारी संघांच्या व मोठ्या मध्यवर्ती सहकारी संघटनांच्या मालकीचे असणारे कारखाने, बांधकाम मंडळ्या, वाहतूक मंडळ्या, पथिक-निवास इत्यादी सर्व आर्थिक व्यवसायांचाही तीत समावेश करण्यात येतो. इस्रायलमधील कामगारांच्या सर्वोच्च संघटनेच्या (हिस्ताद्रुत) प्रयत्नांनी व पुढाकाराने सहकाराचा तेथे मोठ्या प्रमाणावर प्रसार झाला. यामुळे 'कामगार अर्थव्यवस्था' ही संज्ञा प्रचारात आली. एकंदर सहकारी संस्थांच्या उद्योगांचे एकसूत्रीकरण घडविणे व आपल्या आर्थिक व्यवहारांची नाममात्र मालकी धारण करणे, याकरिता एक सर्व ज्यू कामगारांची सर्वमान्य सहकारी मंडळी स्थापन केली (हेवरात ओवदीम). हिस्ताद्रुतचा प्रत्येक समासद या संस्थेचा आपोआपच समासद होतो व इतरांस तीत प्रवेश नाही. या संस्थेचे स्वरूप राष्ट्रीय पातळीवर स्थापन करण्यात आलेली एक प्राथमिक सहकारी संस्था असे असून कायदेशीर-रीत्या तिची स्थापना होण्यासाठी जी नाममात्र रक्कम दाखवावी लागते त्याहून अधिक तिचे स्वतःचे असे काही भाग-भांडवल नसते.[१] शेतीच्या क्षेत्रात ही संस्था निरनिराळ्या प्रकारच्या सहकारी संस्थांच्या मार्फतीने काम करते; परंतु बांधकाम, यांत्रिक उद्योग, पतीचे व्यवहार इत्यादी क्षेत्रांत ही संस्था आपल्या स्वतःच्या अंशतः अगर पूर्णपणे मालकीच्या व्यापार-उद्योगी संस्था स्थापन करते. इस्रायल-मधील इमारती व बांधकामाच्या क्षेत्रातील प्रमुख संस्था म्हणजे 'सोलेल बोने' या नामाभिधानाची बांधकामाची कंत्राटे घेणारी हिस्ताद्रुतची संघटना आहे. येथील औद्योगिक क्षेत्रातील व्यवहार किती गुंतागुंतीचे असतात हे पुढील उताऱ्या-वरून कळून येईल :–

"औद्योगिक विस्ताराच्या कार्यात हेवरात ओवदीमने चार प्रमुख मार्ग मुक्रर केलेले आहेत आणि प्रत्येक मार्गाचे वैशिष्ट्य निराळे आहे. कामगार-अर्थव्यवस्थे-मधील औद्योगिक विकासाचे सर्वांत महत्त्वाचे साधन म्हणजे सोलेल बोने. या संस्थेची रचना आता अशी करण्यात येत आहे की तिच्यामध्ये भारी कारखान-दारीला अधिकाधिक स्थान मिळावे. 'कूर' नावाचा एक सूत्रधारी समवाय (कंपनी) निर्माण करून त्याच्याद्वारे वरील संस्थेच्या उपसंस्थांना नियंत्रित करण्यात येते. हामाश्बीर, हामेरकाझी आणि तुव्हा या मध्यवर्ती घाऊक ग्राहक

१. इंटर नॅशनल लेबर रिव्ह्यू, मे १९६०. ए बेकर : 'दि वर्क ऑफ दि जनरल फेडरेशन ऑफ लेबर इन् इस्रायल.'

संस्था आणि याचिन हाकालसारख्या इतर मध्यवर्ती संस्था यांच्याही मालकीचे महत्त्वाचे आनुषंगिक कारखाने आहेत. तसेच देशातील हलक्या उद्योगांमध्ये कामगार-सह-भागीदारी संस्था आणि प्राथमिक उत्पादकांच्या पायाभूत सहकारी संस्थाही महत्त्वाचा भाग घेतात. कारखानदारीमध्ये सहकारी संस्थांनी प्रवेश करण्याचा तिसरा मार्ग म्हणजे किबुत्झद्वारे. यांपैकी अनेकांनी शेतीच्या जोडीस औद्योगिक क्षेत्रातही पदार्पण केले आहे. आणि शेवटी हेवरात ओवदीमने स्वतःच किंवा सोलेल बोने अथवा स्वतःच्या इतर संघटनांद्वारे खाजगी भांडवलावरोबर भागीदारी करून अनेक महत्त्वाच्या संयुक्त उद्योगांचे जाळे जिकडे-तिकडे पसरविले आहे."[१]

जपानमधील सहकाराची व्यवस्था यापेक्षा निराळ्या प्रकारे उभारलेली आहे. जपानमध्ये युद्धोत्तर काळात, शेतकरी आणि मच्छीमार यांचे व्यवहार बहुतांशी सहकारी पद्धतीने चालविले जात आहेत. लघु-उद्योग आणि व्यापार या क्षेत्रांतही जपानमध्ये सहकाराचा प्रसार फार मोठ्या प्रमाणावर झालेला आहे. जपानमधील एकूण औद्योगिक उत्पादनातील फार मोठा, म्हणजे जवळजवळ ६० टक्के भाग लघु-उद्योग व्यापतात असे सांगितले जाते. लघुउद्योग आणि व्यापार या क्षेत्रांत कृषि-क्षेत्राइतका सहकाराचा प्रसार झालेला नसला तरी या दोन्ही क्षेत्रांत सहकाराचे स्थान फार महत्त्वाचे आहे. औद्योगिक आणि व्यापारी सहकारी संस्थांचा इतिहास बराचसा कृषि-संस्थांच्या इतिहासासारखाच आहे. मेजी कालातील सक्तीच्या व्यापारी मंडळ्यांतूनच त्यांची निर्मिती झालेली आहे. त्यांचे रूपांतर सहकारी संस्थांत झाले आणि १९३० ते १९४० या कालात त्यांच्या कार्यात सावकाश बदल घडून येऊन सरकारी नियंत्रण-धोरण कार्यवाहीत आणण्याची ती साधने बनली. सध्याच्या सहकारी संस्थांकडे पूर्वीच्या व्यापारी मंडळ्यांची परंपरा आली असून व्यापारी मंडळ्यांची काही वैशिष्ट्ये अजूनही त्यांच्यांत दिसून येतात. सहकारी संस्थेची वैशिष्ट्येही त्यांच्यांत आहेत हे निर्विवाद. याशिवाय, लघु-उद्योग आणि व्यापारी संस्था यांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे इतर अनेक देशांतील संस्थांप्रमाणे या कारागिरांच्या सहकारी संस्था नाहीत; म्हणजे औद्योगिक कामगारांनी एकत्र येऊन सहकारी कर्मशाळा किंवा इतर उत्पादक उद्योग येथे सुरू केलेले नाहीत. या सहकारी संस्था लहान, स्वतंत्र औद्योगिक कारखान्यांच्या मालकांच्या सहकारी संस्था आहेत. म्हणजेच या संस्था लहान व्यापारी आणि उद्योगपती यांच्या खरोखर मंडळ्या असून सहकारी संस्था असे त्यांस रूढार्थाने म्हणता येत नाही. जपानमधील विकासाच्या या अंगाची चर्चा करताना संज्ञा व वर्गीकरण यांसंबंधी एक महत्त्वाचा प्रश्न अपरिहार्यपणे उपस्थित होतो. सहकारी

१. 'को-ऑपरेशन इन इस्रायल', नोआ माल्कोश (१९५४), पृ. ४७-४८.

संस्थांचे समासद असलेले अनेक शेतकरी बऱ्याच प्रमाणावर भांडवल गुंतविणारे आणि मजुरांस कामावर लावणारे असतात. सधन गोपालकांनी सहकारी पद्धतीने चालविलेल्या दुग्ध-व्यवसायास आणि उसाची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांनी, की ज्यांच्यापैकी काही फार मोठ्या प्रमाणावर ऊस उत्पादन करतात, चालविलेल्या सहकारी साखर कारखान्यांस सहकारी संस्था म्हणण्यास जर काहीच प्रत्यवाय नसेल तर जपानमधील लघु-उद्योग आणि व्यापार-उदीमांच्या सहकारी मंडळ्या किंवा व्यापार-मंडळ्या यांना तसे न संबोधणे योग्य होणार नाही. स्वाभाविकपणेच यातूनच नंतर आणखी एक प्रश्न उद्‌भूत होणार हे उघड आहे. अशा प्रकारची सहकारी मंडळी, सहकारी संस्था हे रूप टाकून भांडवलदारी गट केव्हा बनते ? हा प्रश्न उपस्थित केल्याने एक गोष्ट स्पष्ट होते की, सर्वसामान्य सहकारी संस्था ही संज्ञा त्यातल्या त्यात सामर्थ्यहीनांच्या मंडळ्यांना लावण्यात येते. असे सामर्थ्यहीन एखादा उपक्रम चालविण्यास जेव्हा एकत्र येतात तेव्हा त्यांच्या एकत्र येण्यास सहकारी संस्थेच्या छत्राखालील संघटन असे म्हटले जाते. पण सामर्थ्यवान जर एकत्र आले तर त्यांच्या एकत्र येण्यास गट किंवा कटही म्हटले जाते.

आज सर्वत्र ज्या उपक्रमांस आणि संघटनांस सहकारी संस्था म्हणून मान्यता मिळालेली दिसते त्या खरोखरच या वर्गात बसतात की नाही याबाबत वरील विवेचनामुळे शंका निर्माण होते. दोन विशिष्ट उदाहरणांद्वारे या शंकेचे वर दिग्दर्शन केलेले आहे. प्रथम सहकारी पद्धतीवर संघटित न झालेल्या कारखान्यास किंवा व्यवसायास तो केवळ एका सहकारी संस्थेच्या मालकीचा व तिने चालविला आहे म्हणून सहकारी असे संबोधावे का ? ही व्यवसाय-संस्था अनेक स्वतंत्र आर्थिक घटकांनी विशिष्ट उद्देशासाठी चालविलेली परस्पर-साहाय्यक संस्था नसून केवळ अशा एका सहकारी संस्थेने निर्माण केलेली असते. तसेच तिच्या कार्यवाहीत कोणतीही विशिष्ट सहकारी तत्त्वे प्रतिबिंबित झालेली नसतात. ब्रिटिश सी. डब्ल्यू. एस्. च्या मालकीचे कारखाने, खाजगी संयुक्त मंडळींच्या मालकीच्या व त्यांनी चालविलेल्या कारखान्यांहून कोणत्याच, उदाहरणार्थ वित्तविषयक किंवा कामगारविषयक, धोरणाच्या बाबतीत वेगळे नाहीत, ही गोष्ट सहकारावरील अनेक लेखकांनी दाखवून दिलेली आहे. हाच प्रकार सर्वत्र आढळतो. मग स्वीडनमधील उदाहरण घ्या किंवा इस्रायलमधील उदाहरण घ्या. सर्व संबंधितांना हा फरक माहीत आहे; आणि यामुळे खऱ्या अर्थी सहकारी असलेल्या औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था आपली सहकारी वैशिष्ट्ये कायम राहावी म्हणून विशेष दक्षता घेत असतात. इस्रायलमधील उत्पादकांच्या सहकारी संस्थांच्या अडचणींबाबतच्या पुढील उताऱ्यावरून ही गोष्ट स्पष्ट होते:—

"एकपक्षी आर्थिक व्यवस्थेतील निरनिराळ्या वादळांना तोंड देऊ शकतील असे मोठ्या परिमाणाचे बहुभांडवली उद्योग चालविण्यास उत्पादकांच्या सहकारी

संस्था योग्य नव्हेत; दुसऱ्यापक्षी ज्या संस्था लहान प्रमाणावर उद्योग चालवितात त्यांना स्वतःचे कार्य करण्यास आवश्यक मांडवलाच्या मूलभूत गरजा भागविणेही कठीण होऊन बसते. उत्पादकांच्या सहकारी संस्थांच्या विकासाच्या आड येणाऱ्या या वित्तविषयक अडचणींच्या जोडीस एक मोठी समस्या या संस्थांपुढे उभी असते. ती म्हणजे अयुक्त प्रवेश-शुल्क न आकारता समासदत्वात वाढ करणे आणि त्याचबरोबर जुन्या सभासदांच्या वाट्यास धक्का न लावणे, ही दोन्ही साधण्याचा सततचा प्रश्न.

कृषि-संस्थांच्या नवीन समासदांकडून अपेक्षिलेला आवश्यक मांडवलाचा भाग, विकास पावणाऱ्या संस्थेस सार्वजनिक (बँकांकडून अगर इतर मार्गाने) दीर्घ मुदतीच्या कर्जाच्या रूपाने मिळतो. पण औद्योगिक संस्थांना मात्र अशा प्रकारे सार्वजनिक साहाय्य मिळत नाही. त्यांचा विकास कामगार सहकारी चळवळीच्या कक्षेतील एक प्रश्न आहे, असे मानले जाते. उत्पादकांच्या संस्थांना या प्रश्नास अजून उत्तर सापडलेले नाही; आणि ज्या संस्थेमध्ये ते काम करतात त्या संस्थेचे पूर्ण सभासद होण्याइतपत ऐपत नसणाऱ्या मजूर कामगारांची संख्या हल्ली संस्थेच्या समासदांइतकीच असते."[१]

सोलेल बोनेसारख्या संस्थेने चालविलेल्या व तिच्या मालकीच्या उद्योगाच्या संदर्भात वर निर्देशिलेले प्रश्न उभे राहत नाहीत व चर्चिले जात नाहीत. याचे कारण असे असावे की या संस्था 'सहकारी संस्था' या सदरात बसत नाहीत.

या समस्येची युगोस्लाव्हियामध्ये करण्यात आलेली सोडवणूक तर्कशुद्ध वाटते. युगोस्लाव्हियामध्ये उत्पादकांच्या सर्व संघटना कामगारांच्या मालकीच्या आहेत आणि सर्व सहकारी संस्थांचे समासदत्व कामगार किंवा तत्सम संबंधितास खुले आहे. एका अर्थी हे धोरण स्वीकारल्यामुळे परस्परविरोधी हितसंबंधांची सांगड घालण्याचा प्रश्न अधिकच गंभीर बनावा. ही अडचण विशेष महत्त्वाची न मानली तरी युगोस्लाव्ह मार्ग फक्त साम्यवादी समाजरनेचतच स्वीकारला जाणे शक्य आहे, यामुळे विशेष महत्त्वाचा वाटत नाही. त्या देशातील परिवर्तन दोन टप्प्यांनी घडून आले. पहिला टप्पा म्हणजे उत्पादनाची सर्व साधने राष्ट्राच्या किंवा समाजाच्या मालकीची करणे. ही पहिली पायरी ओलांडल्यामुळेच संबंधित कामगारांकडे उद्योगधंद्यांचे मालकी हक्क सोपविणे शक्य झाले. जे समाज साम्यवादी नाहीत त्यांमध्ये कामगारांना उत्पादन-संस्थांची मालकी आपणाकडे घेता येईल असे मार्गच उपलब्ध नाहीत. उत्पादन-साधनांची मालकी संपूर्णपणे विखुरलेली आहे, असे गृहीत धरले तर सहकारी संस्थांशी संबंधित असलेल्या सर्वांना समासदत्व देण्याचे 'उदार' युगोस्लाव्ह धोरण तेथे उपयुक्त ठरू शकेल. पण प्रामुख्याने

---

१. 'कोऑपरेशन इन इस्रायल', नोआ माल्कोश (१९५४), पृ. ४७–४८.

मांडवलशाही असलेल्या अर्थव्यवस्थेत सहकारी संस्थेचे केवळ परस्पर साहाय्यक स्वरूप एकदा बदललेले आणि तिला निधि-धारक व विस्तारक दृष्टी आली की मांडवलशाही अर्थव्यवस्थेतील उद्योगांच्या कार्यपद्धतीचा आणि इतर संकेतांचा स्वीकार करण्याशिवाय सहकारी संस्थेस फारसे गत्यंतर उरत नाही. शिवाय इस्रायलसारखी विशेष अनुकूल परिस्थिती नसेल तर आधुनिक औद्योगिक क्षेत्रात अशाही प्रकारच्या सहकाराचा विस्तार शक्य नाही.

वर उल्लेख केलेली दुसरी समस्या म्हणजे सहकारी संस्था आणि मांडवलदारी गट यांमधील फरक ही होय. संघटनेच्या रचनेशी या प्रश्नाचा फारसा संबंध नसून स्थापकांची मनोभूमिका आणि अंतिम-उद्दिष्टे यांच्याशी त्याचा संबंध पोहोचतो; आणि सहकारी लोकराज्याच्या कल्पनेची चर्चा करताना याच गोष्टीकडे काळजी-पूर्वक लक्ष पुरविणे आवश्यक आहे.

सहकारी लोकराज्याच्या कल्पनेविषयी मला जे सांगावयाचे आहे ते मी भारतातील सध्यांची आणि नजीकच्या भविष्यकाळातील प्रत्यक्ष व संभाव्य परिस्थिती यांच्यापुरते मुद्दामच मर्यादित ठेवणार आहे. आतापर्यंत केलेल्या विवेचनावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, सहकारी उपक्रम आर्थिक जीवनाच्या सर्वच अंगांना जरी गवसणी घालू शकले नाहीत आणि विशेष उद्योगप्रधान समाजामध्ये त्यांचे महत्त्व मर्यादित दिसले तरी अविकसित अर्थव्यवस्थांमध्ये त्यांना अनन्यसाधारण स्थान आहे. या अर्थव्यवस्थांमध्ये, शेती-धंद्यात व इतर प्राथमिक उत्पादनांत तसेच लघु उद्योग व वाहतूक इत्यादींत सहकाराचा मार्ग उपलब्ध आहे, एवढेच नव्हे तर अत्यंत योग्यही आहे. ग्राहकांच्या सहकाराचीही हीच स्थिती आहे; कारण ग्राहक हे सामान्यत: लहान व कमकुवत घटक असतात. ज्या वेळी स्वत:च्या खरेदी-व्यवहारात थोडीही काटकसर करण्यास ग्राहक उत्सुक असेल आणि त्यासाठी सामान्यत: प्रमाणित वस्तू खरेदी करण्याची त्याची तयारी असेल त्या वेळीच अशा प्रकारचे सहकारी उपक्रम यशस्वी होतील, हे उघड आहे. खास प्रकारच्या वस्तूंच्या व्यापारात आणि जेथ पेठ मर्यादित आहे तेथे सहकाराचा शिरकाव सहजासहजी होणे कठीण आहे आणि बहुतेक अप्रमाणित वस्तू व संकीर्ण उपक्रम सहकाराच्या क्षेत्रात येणार नाहीत. पण यामुळे फार मोठे वैगुण्य उत्पन्न होते असे वाटत नाही.

जेव्हा समाज संपन्न बनतो व भरभराटीस चढतो तेव्हा त्यातील कमकुवत घटकांची संख्या कमी होते व सहकारी उपक्रमांचे महत्व कमी होत आहे असे दिसते. उदाहरणार्थ, अलीकडील काळात ब्रिटिश ग्राहक सहकारी चळवळीची प्रगती काहीशी थंडावल्यासारखी दिसते, याचे प्रमुख कारण त्या समाजाची सतत होणारी भरभराट हेच असावे. परंतु जेथे स्वतंत्र उत्पादक घटक तौलनिक दृष्ट्या लहान राहतो तेथे समाजसंपन्नतेमुळे उत्पादकांच्या सहकाराची ही स्थिती होईल अशी भीती नाही.

ज्या समाजात निर्धन व कमकुवत आर्थिक घटकांचे प्राबल्य आहे तेथे सहकाराचे स्थान किती महत्त्वाचे आहे हे आवर्जून पुन्हा सांगण्याची आवश्यकता नाही. मात्र यांपैकी बहुतेक समाजांत सहकार यशस्वी व्हावयाचा असेल तर त्याचा पुरस्कार व जोपासना बाह्य प्रयत्नाने होणे आवश्यक आहे आणि आर्थिक शाश्वती व आर्थिक विकास या संबंधीच्या योग्य सरकारी धोरणाचे पाठबळ त्यास सतत मिळाले पाहिजे. अविकसित देशांमध्ये लहान आर्थिक घटकांची संख्या फार मोठी असते, एवढेच नव्हे तर त्यात कमकुवत आणि सामर्थ्यवान, नागर आणि ग्रामीण, आधुनिक तंत्राचा उपयोग करणारे आणि जुन्या तंत्रावर अवलंबून राहणारे, लहान प्रमाणावर उद्योग करणारे व मोठ्या प्रमाणावरील आधुनिक उद्योगपती अशांच्या तौलनिक सामर्थ्यामध्ये अत्यंत तफावत आढळून येते.

शिवाय नियोजनाचा स्वीकार ज्यांनी केला आहे अशा देशांमध्ये सहकारी संघटनांच्या प्रसारास उत्तेजन देण्यास दोन विशेष कारणे आहेत. अर्थव्यवस्थेमधील प्रत्येक उपक्रम-घटकाच्या कार्य-द्वाराच नियोजन अंतिमत: परिणामकारक होऊ शकते, म्हणून देशभर विखुरलेल्या बहुसंख्य घटकांस नियोजनाची लक्ष्ये कोणती आणि निरनिराळ्या योजनांत कोणत्या प्रकारचे प्रतिसाद एकेकाकडून अपेक्षित आहेत हे योग्य तऱ्हेने कळविण्यात आल्याशिवाय योजनेच्या यशस्वितेची शाश्वती देता येत नाही. यासाठी नियोजकांचे निर्णय घटकांपर्यंत पोचविणे आणि त्यांच्या प्रतिक्रिया नियोजकांपर्यंत पोचविणे हे मध्यस्थाचे काम करणाऱ्या संघटनांची स्थापना करणे आवश्यक ठरते. जागतिक मंदीच्या काळातील आणि महायुद्धकालीन अनुभवांवरून सरकारी योजना व कायदेकानू कार्यवाहीत आणण्यासाठी सर्व क्षेत्रांतील घटकांना विशिष्ट व्यवस्थांत गोवण्याची आवश्यकता प्रकर्षाने नजरेस आली. सरकारी योजनांची अंमलबजावणी एकसारखी व्हावी यासाठी मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणाऱ्या उद्योग-संस्थांनाही एकत्र येण्यास उत्तेजन दिले. तेव्हा नियोजनाच्या प्रयत्नात भारतासारख्या देशामध्ये कृषि आणि लघुउद्योगातील असंख्य उत्पादकांना संघटित करणे किती यथार्थ आहे, हे सांगावयास नको. सहकारी रचनेमध्ये हे उत्पादक जेव्हा संघटित होतील तेव्हाच त्यांच्या इच्छा, त्यांचे सामर्थ्य आणि सुप्त शक्ती यांची प्रचीती येईल; आणि सार्वत्रिक निर्णय त्यांच्यापर्यंत पोचविणे व त्यांस पटविणे आणि त्यांजकडून योजनांची योग्य कार्यवाही करवून घेणे शक्य होईल.

शिवाय सहकारी संघटनांकडून योजनांची अंमलबजावणी विशेष परिणामकारकपणे होईल, एवढेच नव्हे तर त्यांजकडून योजना काटेकोरपणे, काळजीपूर्वक व प्रामाणिकपणे पार पाडल्या जातील. सहकारी संघटना, विशेषत: त्यांमध्ये सरकारी पुरस्कार किंवा चालनेचा भाग असल्यास, शासकीय मार्गदर्शन स्थूलमानाने स्वीकारतात आणि नेहमीच सरकारी हिशेब-तपासनिसाच्या कक्षेत असतात.

त्याचप्रमाणे त्यांच्या अंतर्गत कारभारासंबंधीही निर्णय बहुतेक खुलेपणाने घेण्यात येतात. खाजगी संघटनांपेक्षा सार्वजनिक मतप्रदर्शनाची त्या जास्त क्षिती बाळगतात. यामुळे विशेषत: ज्या अविकसित देशात सरकारी नियंत्रण व नियोजन यांबाबत खाजगी व्यावसायिकांची कार्यपद्धती व नीती विश्वासार्ह नसते, तेथे सहकारी अर्थव्यवहाराचे क्षेत्र मोठे असणे फार इष्ट ठरते.

या सर्व गोष्टींचा विचार करता आपल्याकडे सहकारी योजनांचा सक्रिय पुरस्कार आणि प्रसार जोराने करण्याची फार मोठी गरज आहे हेच सिद्ध होते. तसेच सहकाराचा प्रसार केवळ बहुसंख्य शेतकरी व कारागिरांमध्येच होऊन भागणार नाही तर विकेंद्रित स्वरूपाच्या सर्व आर्थिक क्रियांचे क्षेत्रात, म्हणजे मासेमारी व जंगलतोड, खाणी व वाहतूक, इमारती व सार्वजनिक बांधकाम इत्यादी सर्व क्षेत्रात त्याचा प्रसार होणे अवश्य आहे. आजच्या आपल्या परिस्थितीत हेच धोरण अत्यंत परिणामकारक ठरेल. कारण त्यामुळे कार्यक्रमांची अंमलबजावणी चांगल्या रीतीने होण्याची खात्री लाभेल, एवढेच नव्हे तर सामाजिक सुरक्षितता व स्वास्थ्य हीही त्यामुळे उपलब्ध होतील.

हे सर्व झाले तरी देखील सहकारी लोकराज्य या संज्ञेने जे चित्र आपल्यापुढे उभे राहते त्यामानाने हे फारच अपुरे वाटते. म्हणून या संज्ञेचा व्यापक अर्थ व व्याख्या काय होतात याकडे मी शेवटी वळतो. आपण वर पाहिलेच आहे की, 'सहकारी' याची व्याख्या एक परस्पर साहाय्यक संस्था एवढीच केली तर त्यामुळे सहकारी व्यवहारांची संभाव्य व्याप्ती बरीच मर्यादित होते; व उत्पादक व्यवसायांची मालकी सहकारी संघटनांकडे किंवा कामगार संघटनांकडे गेल्यामुळे काही फायदे उद्‌भवले तरी भांडवलदारी समाजात त्यांच्या कार्यपद्धतीवर अशा मालकीमुळे फारसा परिणाम घडत नाही. तसेच साधारणपणे सर्वमान्य अशी जी सहकाराची तत्त्वप्रणाली मानली जाते तिचे परीक्षण केले असता त्यातील कोणतेही एखादे तत्त्व सर्वत्र लागू होण्यासारखे आहे असे आढळून येत नाही, आणि प्रत्येक ठिकाणची विशिष्ट परिस्थिती लक्षात घेऊनच या तत्त्वाचा अर्थ लावावा लागतो. सहकारी जीवनमूल्यांची सर्वसाधारण रूपरेखा व्यक्त करण्याच्या दृष्टीने त्यांचा बराच उपयोग होत असला तरी त्यांच्या अनुरोधाने सहकारी लोकराज्याची रचना व कार्यपद्धती यांविषयी निश्चित कल्पना बांधता येत नाही. परस्पर साहाय्यक धर्तीची सहकारी संघटना आधुनिक औद्योगिक समाजात जेवढ्या-प्रमाणात व्यवहार्य असेल त्या मानाने हा प्रकार किंवा ही पद्धती सहकारी लोक-राज्यामध्ये पसंत केली जाईल. तथापि हे सर्वत्र आणि विशेषत: आधुनिक समाजातील सर्व मोक्याच्या क्षेत्रांमध्ये घडून येणे शक्य नसल्यामुळे सहकारी लोकराज्याची प्रमुख लक्षणे परस्पर सहाय्यक सहकार कल्पनेचा आश्रय न घेता स्वतंत्र रीतीने ठरविणे जरुरीचे आहे.

वर उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नास समर्पक उत्तर द्यावयाचे झाल्यास सहकाराची रूढ अगर प्रस्थापित तत्त्वेच तेवढी विचारात घेवून चालणार नाही, तर सहकारी इतिहास व सहकारी तत्त्वज्ञान म्हणून जे म्हटले जाते त्याचाही विचार करावा लागेल. मांडवलशाहीचे प्रथमावस्थेचे जे स्वरूप होते त्याविरुद्ध समकालीनांनी केलेल्या झगड्यातून सहकारी तत्त्वप्रणाली व प्रयोग यांची निर्मिती झाली, हे या संदर्भात लक्षात घेणे आवश्यक आहे. यामुळे सहकाराचे म्हणून प्रथम जे प्रयत्न झाले त्यांचे उद्दिष्ट मांडवलशाही चौकटीतच नवीन प्रकारच्या संस्था निर्माण करणे हे नव्हते तर एका नवसमाजाची पायाभरणी करणे असे होते. परिणामी, सहकाराचे सुरुवातीचे सर्व प्रयोग, ज्यांची संपूर्ण रचना व कार्य सहकारी तत्त्वावर उभारले आहे अशा लहान स्वयंपूर्ण समाजांची निर्मिती करण्याच्या दिशेने झाले. कालांतराने केवळ एक अव्यवहार्य ध्येयवाद म्हणून जरी या प्रयत्नांची हेटाळणी होऊ लागली तरी आधुनिक काळातील सुरुवातीचे सहेतुक सामाजिक प्रयोग हेच होते असे मानावे लागते.

समकालीन समाजातून बाहेर पडून नवीन तत्त्वांवर अलग स्वतंत्र समाजगटांची प्रस्थापना करण्याचे हे सुरुवातीचे सर्व प्रयत्न अयशस्वी झाले. त्यांपैकी काही थोड्या तुरळक सहकारी समाजांचे अवशेष आजही दिसले व अंशत: जुन्या आदर्शांना ते अजून अनुसरत असले तरी त्यांचा कोणाचाच प्रचलित विचारसरणी अगर आचार यांवर विशेष परिणाम झाला आहे, असे म्हणता येत नाही.[1] स्वतंत्र सहकारी समाज प्रस्थापनेचे सुरुवातीचे हे प्रयत्न फसल्यामुळे समाजातील दलित व वंचित वर्गांना मांडवलदारीमुळे सहन करावे लागणारे कष्ट व हाल ज्यायोगे कमी होतील अशा विशिष्ट प्रकारच्या संस्थांच्या प्रस्थापनेकडे कार्यकर्त्यांचे लक्ष वळले. तथापि हे मर्यादित स्वरूपाचे उद्दिष्ट केवळ तात्कालिक म्हणूनच स्वीकारण्यात आले आणि सहकाराच्या आद्य प्रवर्तकांनी यच्चयावत् समाजाची सहकारी तत्त्वावर पुनर्रचना करण्याचे आपले अंतिम उद्दिष्ट केव्हाही सोडून दिलेले नव्हते. ही गोष्ट रॉचडेल पायोनियरांच्या मूळ निवेदनावरून स्पष्ट होते. कालांतराने हे ध्येय संकुचित होत गेले आणि सहकारी संघटना हा मांडवलशाही समाजातीलच एक नवीन संस्था-प्रकार अशी तडजोडीची भूमिका सहकार-कार्यकर्त्यांना पत्करावी लागली. पुढे तर काहीजण मांडवलशाही समाजाच्या चौकटीतच सहकारी संघटनांची उभारणी करता येईल, किंबहुना सहकारासाठी अशा चौकटीची आवश्यकताच आहे, असेही प्रतिपादन करू लागले.

उलट असेही घडले की १९१८ नंतर प्रस्थापित झालेल्या सर्व साम्यवादी अर्थ-व्यवस्थांत प्राथमिक विकासाच्या कालात सहकारी संघटनांची मोठ्या प्रमाणात

---

१. एच्. एफ्. इन्फील्ड : 'को-ऑपरेटिव्ह कम्युनिटीज् अॅट् वर्क', १९४७.

प्रस्थापना करण्याचा उपक्रम सुरू झाला. हल्ली अनेक प्रगत साम्यवादी देशांत सहकारी संघटनांना फार महत्त्व राहिले नसले तरी विशेषत: युगोस्लाव्हियासारख्या देशांमध्ये सहकारी व्यवस्थेस कायमचे महत्त्वाचे स्थान प्राप्त झाल्याचे दिसून येते. सद्य:परिस्थिती अशी संमिश्र असल्यामुळे सहकाराच्या आविष्कारातील अनेकविध आचारांचे व विचारांचे धागे जुळवून घेऊन सहकारी लोकराज्याच्या रचनेतील महत्त्वाच्या गुणविशेषांची कल्पना बांधावी लागते; आणि सहकारी लोकराज्य या कल्पनेचा व्यापक अर्थ मांडताना, ओवेनच्या काळापासून ते किबुत्झ-पर्यंतच्या सर्व ध्येयवादी सहकारवाद्यांच्या आकांक्षा आणि हेतू, सहकाराच्या प्रत्यक्ष व्यवहारात ग्रथित झालेली-तत्त्वे आणि वेगवेगळी उद्दिष्टे साधण्याकरिता सहकाराने धारण केलेले विविध संघटना-प्रकार, या सर्वांचा विचार करणे जरुरीचे आहे. याप्रमाणे सहकाराचे सम्यक् रूपदर्शन घडवून आणताना आणखी एक गोष्ट लक्षात ठेवणे अवश्य आहे. ती अशी की, आपण विचार करीत आहो तो एका नवीन व परिवर्तित समाजाच्या रचना व पायाबद्दलचा, भांडवलशाही वा साम्यवादी व्यवस्थांतील एका राखीव क्षेत्राबद्दलचा नव्हे. म्हणून भारतातील परिस्थितीच्या संदर्भात या प्रश्नाचा विचार करतेवेळी भारतातील अलीकडील घडामोडींतून प्राप्त होणारा अनुभव आणि भारतीय समाजाची परंपरागत मूल्ये या दोहोंना योग्य ते महत्त्व द्यावे लागते.

उत्पादन-संघटनेच्या किंवा आर्थिक संघटनेच्या व्यवस्थेच्या दृष्टीने विचार केला तर सहकाराचा मुख्य भर शक्यतोवर लहान स्वतंत्र घटकांमार्फत होणाऱ्या व्यवहारावर असतो. हे लहान घटक मोठ्या प्रमाणावरील आर्थिक व्यवहारांपासून मिळणारे फायदे व परस्पर साहाय्यक व्यवहारांतून मिळणारे इतर लाभ प्राप्त होण्यासाठी एकत्र सहकार्य करतात. हे सहकार्य अनेक तऱ्हेची रूपे धारण करू शकते व भिन्नभिन्न समूहांत त्याची व्याप्ती व विस्तार ही भिन्न असतात. उदाहरणार्थ, ज्यांची शेती किफायतीची नाही अशा लहान शेतकऱ्यांचे गट सहकार्याच्या दिशने सामुदायिक शेतीपर्यंत प्रगती करतील तर त्या मानाने थोडी पुरेशी शेती असणारे शेतकरी फक्त सहकारी कर्जपुरवठा, माल-खरेदी-विक्री व प्रक्रिया एवढ्यांवरच समाधान मानतील. हे सहकार्य कोणत्याही प्रकारचे असो, त्यामध्ये विकेंद्रित व विखुरलेले व्यवहार प्रमुखपणे सामावले जातात आणि सहकारी आर्थिक व्यवहारात लहान स्वतंत्र व्यवसाय व प्राथमिक सहकारी संस्था हे केंद्रस्थानी आहेत असे मानले जाते. सहकारी चळवळीच्या मूळ उद्देशांशी, तसेच तिच्यातील शाश्वत प्ररणेशी हे पूर्णपणे सुसंगत आहे; कारण दुर्बलांचे व लहानांचे रक्षण होऊन त्यांचे सामर्थ्य वाढावे हेच मूळ उद्दिष्ट व हीच शाश्वत प्रेरणा सहकाराची आहे.

प्रत्यक्ष कार्यवाहीच्या दृष्टीने पाहू जाता क्रियेच्या प्रेरणेबाबत सहकाराचा

वेगळा दृष्टिकोन असल्यामुळें सहकारी क्रियचे वेगळेपण प्रतीत होते. सहकारावर श्रद्धा असणे याचा अर्थ माणूस केवळ आर्थिक फायद्याच्या हेतूनेच कार्यप्रवण होत नाही हे एक प्रस्थापित सत्य आहे, किंवा तसे होण्याची शक्यता आहे, यावर विश्वास असला पाहिजे; तसेच समूहाबाबत किंवा समाजाबाबत आपली काही कर्तव्ये आहेत याची जाणीव असली पाहिजे व त्यासाठी स्वतःच्या फायद्यावर अगर आकांक्षांवर स्वेच्छेने बंधने स्वीकारून स्वार्थ-साधनाबाबत संयम बाळगण्याची तयारी असली पाहिजे; तसेच आर्थिक प्रलोभनाखेरीज अन्य कारणानेही कार्याला प्रेरणा मिळू शकते, सामाजिक मानमान्यता व समाजसेवेची संधी या गोष्टीही कार्यप्रवणतेच्या दृष्टीने मोलाच्या आहेत आणि आर्थिक प्रलोभने नियमित केली असताही अर्थव्यवहार कार्यक्षमतेने चालविता येतो, यावर विश्वास असला पाहिजे. सहकाराचे आणखी एक महत्त्वाचे व्यावहारिक लक्षण म्हणजे मालकी व संचलन यांची केलेली बुद्धिपुरस्सर फारकत. व्यक्तीला कार्यप्रवृत्त करणाऱ्या प्रेरणेबाबत सहकाराचा जो दृष्टिकोन आहे त्याच्याशी ही गोष्ट काही अंशी संबद्ध आहे. तसेच आर्थिक सत्तेच्या केंद्रीकरणामुळे आणि अनियमित खाजगी धनलोभ-प्रवृत्तीमुळे आर्थिक व्यवहारास अनिष्ट वळण लागून त्याचे गंभीर दुष्परिणाम होतात, या विचाराशीही त्याचा संबंध आहे. म्हणून संचालकांस व्यक्तिगत फायद्याचे प्रलोभन जरी अल्प असले तरी त्यांजकडून अर्थव्यवहाराचे नियमन व संचलन समाजहित-कारकच नव्हे तर उत्पादनक्षमही होऊ शकते अशी सहकाराची धारणा आहे.

सहकारी मूल्यांची इतर रूपे, समता व लोकशाही या संबंधीच्या सर्वमान्य कल्पनांशी संबद्ध आहेत. समतेबाबत जरी एखाद्या विशिष्ट, काटेकोर मांडणीवर सहकाराचा भर असला तरी, लहान घटकांबाबत त्याचा आग्रह असल्यामुळे एकाधिकारविरोधी अशी त्याची मूळ भूमिका असल्यामुळे व सामाजिक नियमना-वर विश्वास असल्यामुळे उत्पादन साधनांची मालकी मोठ्या प्रमाणात विखुरली जावी अशी साहजिकच सहकाराची अपेक्षा असते; आणि जेथे या रीतीने मालकी-हक्काचे वितरण होणे शक्य नसते तेथे सत्तेचे वितरण करण्यावर सहकाराचा भर असतो. आर्थिक प्रलोभनाबाबतच्या सहकाराच्या विशिष्ट दृष्टिकोनामुळे, तसेच न्याय्य वाटणीच्या तत्त्वावरही सहकाराचा भर असल्यामुळे लाभांशाची वाटणी समानतेच्या दृष्टीने करण्याची सहकाराची प्रवृत्ती असते. विशेषतः मांडवलाच्या मालकीतून मोठ्या प्रमाणावर लाभ उद्‌भवावा हे सहकारास पूर्णपणे अमान्य आहे. समाजामध्ये बचत करण्याची सामुदायिक प्रवृत्ती वाढविण्याचा सहकाराचा प्रयत्न असतो; व्यक्तिगत बचत करणारांना मोठ्या लाभाचे प्रलोभन दाखवून बचत वाढविण्याचे धोरण त्यास संमत नाही. खाजगी मालमत्ता नामशेष करण्याचे सहकाराचे धोरण नसले तरी राष्ट्रीय उत्पन्नाचा शक्य तेवढा कमी भाग मालकी हक्कदारास मिळावा असा मात्र आग्रह असतो. शिवाय आर्थिक

प्रलोभनाव्यतिरिक्त इतर प्रेरणा आणि सामाजिक कर्तव्याची व्यक्तिगत जाणीव यांच्या सामर्थ्यावर सहकाराचा विश्वास असल्यामुळे वैयक्तिक वेतनाच्या दरात मोठी तफावत राखणे सहकारात आवश्यक नसते. या सर्वांपेक्षाही शैक्षणिक व सांस्कृतिक मूल्यावर सहकाराचा जो भर असतो त्यामुळे समाज-गटांची जबाबदारी प्रत्येक व्यक्तीचे केवळ संरक्षणच नव्हे तर गुणोत्कर्ष साधण्याचीही आहे असे सहकार मानतो. यामुळे तो समानतेची वाटचाल करू लागतो. पण याबरोबरच असेही सिद्ध होते की ही समता सहकार-पूर्वप्रस्थापित नसून सहकारी व्यवहारातून व प्रयोगातून निर्माण होणारी असते.

तसेच सहकार लोकशाहीप्रधान आहे. सहकारातील विनियंत्रण व्यवस्था आणि त्यातील खुल्या सभासदत्वाचे तत्त्व यावरून सहकारी व्यवस्था ही आर्थिक लोकशाहीची आहे आणि तिच्यामध्ये कोणत्याही प्रकारची हक्कदारी अगर वतनदारी राहू शकत नाही हे सिद्ध होते. सहकारी व्यवहारात लोकशाहीचा विशिष्ट कल स्पष्टपणे दिसून येतो. याचे मुख्य लक्षण म्हणजे प्राथमिक व स्थानिक गटांच्या मध्यवर्ती आणि महत्त्वाच्या स्थानावर सहकारी रचनेमध्ये दिलेला विशेष जोर. यामुळे सहकारी व्यवस्था केवळ एखाद्या लहान गटाच्या अगर काही मोठ्या व्यक्तींच्या हातात आर्थिक सत्ता केंद्रित होऊ नये एवढ्याबद्दलच नव्हे तर कोणत्याही स्थानी अगर स्तरात ती केंद्रित होऊ नये याविषयीही तत्पर राहते. समाजरचनेच्या सर्व थरांतून सत्ता खेळली जावी, पसरली जावी अशी सहकाराची भूमिका असते; णिक्षा यासाठी संघ-व्यवस्था ही सहकारात सार्वत्रिक आढळते. प्राथमिक व माध्यमिक गटांच्या स्वायत्ततेचे काळजीपूर्वक रक्षण करून जरूर तेवढी किमान सत्ताच केंद्रस्थ संघटना व वरचे स्तर यांजकडे ठेवण्याचे सहकाराचे धोरण असते.

सहकाराधिष्ठित जीवनपद्धती मान्य करावयाची म्हणजे परस्पर समजुतीने व देवाणघेवाणीने फायद्याची व मिळकतीची योग्य वाटणी करून घेण्याची कल्पना त्यामध्ये आलीच. हरएक प्रकारच्या आर्थिक हित-संबंधाची वेगळी संघटना उभारून ती कार्यान्वित करण्याची सहकारात शक्यता असल्यामुळे वेगवेगळ्या व्यवहार-व्यवसायांचे दृष्टिकोन सहकारी व्यवस्थेत स्पष्टपणे व्यक्त होऊ शकतात. म्हणजे एखादा विशिष्ट दृष्टिकोन म्हणजेच राष्ट्रहित आणि दुसऱ्या गटांच्या दृष्टिकोनाची फारशी दखल घेण्याची गरज नाही अशी सामान्यपणे फसवी समजूत करून घेतली जाण्याचे सहकारात टाळता येते. गटागटांच्या व प्रदेशाप्रदेशांच्या हितसंबंधांमध्ये विरोध असण्याची शक्यता आहे ही गोष्ट उघडपणे मान्य करण्याची भूमिका सहकार घेत असल्यामुळे साहजिकच विभिन्न दृष्टिकोनांचा समन्वय करून शांततेच्या व तडजोडीच्या मार्गाने ते मिटविण्याची सहकारात खटपट करावीच लागते.

शासन व सरकार यांसंबंधी सहकारी विवेचकांनी अगदी भिन्न–भिन्नमते

व्यक्त केली आहेत. उदाहरणार्थ सरकार-पुरस्कृत सहकार हा मुळी सहकारच नव्हे असे कित्येकजण प्रतिपादितात. असल्या विधानात १९ व्या शतकामधील पश्चिम युरोपातील सहकारी संघटनांचे विशिष्ट स्वरूप म्हणजेच सहकार असे गृहीत धरलेले दिसते. तसे पाहिले तर युरोपमधील सहकारवाद्यांनी अगदी सुरुवातीच्या काळातदेखील याबाबतीत कोणताही सर्वत्र एकच असा दृष्टिकोन स्वीकारलेला नव्हता. सुरुवातीच्या इंग्रज सहकारी चळवळींशी ज्यांचा अगदी निकटचा संबंध होता त्या चार्टिस्टांनी त्या वेळचा आपला अनुभव लक्षात घेऊन राज्यसंस्था म्हणजे भांडवलशाहीची व पिळवणूक करणाऱ्या वर्गाची सत्ता असे समीकरण मांडले होते आणि त्यामुळे शासनविरोधी असा त्यांचा दृष्टिकोन राहणे स्वाभाविक होते. तथापि सुरुवातीच्या फ्रेंच सहकारवाद्यांचा असा दृष्टिकोन नव्हता ही गोष्ट सर्वमान्य आहे. तसेच रायफीसेन पत-पुरवठा पद्धतीमधील राज्यसंस्थेबाबतचा दृष्टिकोन व शुल्झडेलीट्झचा त्याबाबतचा दृष्टिकोन यांमध्येही महदंतर होते. प्रत्येकास आलेल्या विशिष्ट अनुभवानुसार त्यांचे दृष्टिकोन बनले होते; म्हणून भारतातही आपल्या गरजा व आपली परिस्थिती यांच्याशी जुळणारा असा दृष्टिकोन आपण स्वीकारणे योग्य ठरेल. नियोजनपूर्वक आर्थिक विकास घडवून आणण्याचे कार्यक्रम ज्या राज्यांमध्ये हाती घेतलेले आहेत आणि जेथ शासनाने सहकारी मूल्यांवर आपली निष्ठा असल्याचे घोषित केले आहे तेथे शासन व सहकार यांत मूलत: विरोध आहे अशी भावना बाळगण्याचे कारण नाही. वास्तविक, सरकारचे धोरण योग्य असल्यास ज्या क्षेत्रात सहकारी संघटना सहज प्रस्थापित होत नाहीत तेथे सहकारी मूल्यांचे बीजारोपण करण्याची जबाबदारी शासनाची आहे असे मानण्यात यावे. संपूर्ण सहकारी लोकराज्य त्वरेने प्रस्थापित करून प्रत्यक्षात उतरविण्याचा हाच मार्ग आहे. या परिस्थितीत स्वावलंबन व स्वातंत्र्य यांचा अर्थ शासन-संस्थांपासून दूर राहणे अगर त्यांची मदत नाकारणे असा नसून व्यक्तिगत आणि सहकारी प्रयत्नांवर अधिकात अधिक विसंबणे असा आहे. गरज असेल त्या सर्व ठिकाणी, विशेषत: तांत्रिक प्रगती व संघटना यांच्या दृष्टीने जेथे मागासलेपणा असेल अगर साधन संपत्तीचा तुटवडा असेल तेथे, सरकारी मदत संपूर्ण घेतली जावी. एवढेच की, आवश्यक व उपयुक्त असेल तेवढीच व किमान प्रमाणात आणि किमान वेळेपुरतीच ती घेण्यात यावी.

सहकारी चळवळीने अगदी सुरुवातीपासून आपल्या सभासदांचा शैक्षणिक व सांस्कृतिक विकास आणि सामाजिक सुरक्षा, या विषयीची जबाबदारी पत्करली आहे. यावरून कल्याणकारी राज्याची कल्पना व कार्यक्रम सहकारी तत्त्वप्रणालीशी जुळते आहेत असे दिसून येते. जेथे केवळ परस्परांच्या सहकार्याने सुरक्षिततेची व कल्याणाची संपादणी होणे शक्य नसते अशा सर्वव्यापक व सर्वसामान्य क्षेत्रांमध्ये सरकारी उपक्रम केव्हाही स्वागतार्हच असतो. या संदर्भात

हे लक्षात घेतले पाहिजे की आधुनिक सहकारी लोकराज्याची कल्पना ही जुन्या लहान, तुटक, स्वयंपूर्ण प्रायोगिक वसाहतींपेक्षा अगदी निराळी आहे. या जुन्या सहकारी समाजांमध्येंही सामाजिक नियंत्रण व संचलन हे सर्वव्यापी आणि पूर्णपणे मान्य झालेले होते. केवळ बाहेरचा इतर समाज आणि वरिष्ठ राजकीय सत्ता यांचेबाबत या वसाहती अगर समाज तुटकपणा दर्शवीत. पण जेव्हा आपण सर्वत्र सहकारी लोकराज्य प्रस्थापित करण्याचा आणि सहकारी तत्वज्ञानाच्या द्वारा एकंदर समाजाचे परिवर्तन घडवून आणण्याचा विचार करतो त्या वेळी समाज-संस्थांच्या निरनिराळ्या स्तरांबाबतीत वेगवेगळा दृष्टिकोन ठेवणे अयोग्य ठरते. या बदलत्या संदर्भात प्राथमिक सहकारी गटांच्या बाबतीत जो संघटनात्मक दृष्टिकोन आपण मान्य करतो तोच व्यापक स्वरूपाच्या राजकीय किंवा सामाजिक संघटनांच्या बाबतीत स्वीकारणे अवश्य आहे.प्राथमिक संघटनांवर जेवढा सहकारी भावनेचा प्रभाव पडतो तेवढाच तो व्यापक सामाजिक व शासकीय संघटनांवर पडू शकतो हे मान्य केल्यास दोन्हींबाबत सारखा दृष्टिकोन ओघानेच पत्करावा लागतो. या विचारसरणीस अनुसरून सरकारपुरस्कृत सहकार हा एक 'वदतो व्याघात' किंवा परस्परविरोधी घटना असे म्हणता येत नाही. अशा रीतीने सरकारची सहकाराबाबतची विशिष्ट भूमिका मान्य केली तरी या भूमिकेच्या मर्यादाही स्पष्टपणे ध्यानात घेणे अवश्य आहे. सरकारी कक्षेची व्याख्या अभावात्मकरीतीने करावयाची झाल्यास असे म्हणता येईल की, ज्या ठिकाणी कोणताही सहकार-प्रकार किंवा त्याचा विस्तार दृढमूल होणे शक्य नाही ते सर्व कार्यक्षेत्र सरकारी कक्षेत येते. म्हणजे सहकारी संघटनांच्या द्वारा किंवा त्यांच्या नियंत्रणात्मक कार्याच्या द्वारा जे जे घडवून आणणे शक्य असते ते ते सरकारी नियंत्रणाच्या व कार्यभागाच्या कक्षेत आणण्याची काही गरज नाही.

उत्पादन-साधनांच्या सामाजिक मालकीवर समाजवादाचा जेवढा भर आहे तेवढा सहकाराचा नसल्यामुळे या दृष्टीनेंही त्याचे समाजवादापासून वेगळेपण दाखविता येईल. जेथे उत्पादन-साधनांची मालकी मोठ्या प्रमाणावर विखुरणे शक्य आहे किंवा लहान प्रमाणावर काम करणाऱ्यांच्या सहकारी गटांच्या हाती ती सुपुर्त करणे शक्य आहे असे सर्व उद्योग-व्यवसाय सहकारी व्यवस्थेत ठेवता येतील. तथापि सहकाराची भूमिका एकाधिकाराच्या विरुद्ध असल्यामुळे आणि संचलन व मालकी यांची फारकत करण्यावर त्याचा भर असल्यामुळे मोठ्या प्रमाणावरील प्रचंड व्यापाचे सर्व उद्योगधंदे, निदान त्यांचे नियंत्रण सरकारी कक्षेत राज्यसत्तेच्या हाती ठेवणे सहकार पसंत करील. सहकाराची समाज-वादाहून आणखीही एका बाबतीत भिन्नता आहे. सामाजिक अर्थ-व्यवहार-प्रक्रिया आणि त्यासाठी आवश्यक असणारी प्रलोभने यांविषयीचा सहकाराचा दृष्टिकोन विशिष्ट आहे. उलट, या आर्थिक प्रलोभनाच्या बाबतीत अनेक समाजवादी

विचारकांचा व समाजवादी अर्थरचनांचा दृष्टिकोन भांडवलदारांच्या व भांडवलशाही अर्थरचनेच्या दृष्टिकोनाहून मूलतः फारसा भिन्न नाही असे आढळून येते. अनेक समाजवादी मंडळी व समाजवादी अर्थ-व्यवस्था हे राज्यसत्तेला आणि तिच्या कार्याला अतिशय महत्त्व देतात; सहकार तेवढे देत नाही. विकेंद्रीकरण, लहान घटक, संयुक्त संघात्मक रचना व स्वयंप्रेरित यत्न यांवर सहकाराचा विशेष भर असल्यामुळे साहजिकच राज्यसत्तेला फार महत्त्व न देता ते कमी राखण्याकडे त्याचा कल असतो. भांडवलशाही व भांडवलदारी समाजरचना यांमध्ये आणि सहकारामध्ये जो मूलभूत फरक दिसून येतो तो आर्थिक व्यवहाराकरिता नैतिक पाया स्वीकारण्याचा सहकाराचा जो आग्रह असतो त्यातून उद्भवतो. न्यायाच्या आणि सामाजिक कर्तव्याबाबतच्या कल्पनांना समाजाच्या आर्थिक रचनेत समाविष्ट करून घेण्यावर सहकाराचा भर असतो आणि आर्थिक जीवन आणि व्यवहार यांपासून नैतिक मूल्ये अलग करता येत नाहीत, अशी त्याची धारणा असते. यामुळे प्रलोभन, प्रेरणा नियंत्रण, मालकी इत्यादींबाबतचा सहकाराचा एकंदर दृष्टिकोन भांडवलशाहीच्या याबाबतच्या दृष्टिकोनाहून अगदी वेगळा बनतो.

सहकारी लोकराज्याच्या स्वरूप-लक्षणांसंबंधीच्या या तात्त्विक विवेचनाचा भारतीय सद्यःस्थितीशी काय संबंध दिसून येतो ? भारतातील सद्यःस्थितीचे स्पष्ट व बिनचूक असे वर्णन करणे कठीण आहे. भारताच्या घटनेतील राज्यशासनाची मार्गदर्शक तत्त्वे पाहता कल्याणकारी किंवा समाजवादाकडे कल असणारे राज्यशासन त्यामध्ये अभिप्रेत आहे असे दिसते. सत्ताधारी पक्षाच्या राजकीय कार्यक्रमात, तसेच पंचवार्षिक विकास योजनांच्या आराखड्यातही समाजवादी रचना क्रमशः निर्माण करण्याच्या उद्दिष्टांचा उल्लेख करण्यात आलेला आहे. तथापि प्रत्यक्षात मात्र काही तुरळक बाबतींत सरकारी कक्षेची वाढ करण्यापलीकडे किंवा कामगारांच्या हितसंबंधांचे रक्षण करणारे काही कायदे संमत करण्यापलीकडे दुसरी कोणतीही विशेष प्रगती या दिशेने झालेली नाही. यच्या उलट आधुनिक व्यापार-उद्योगाच्या क्षेत्रात मालकी हक्कांचे व सत्तेचे झालेले केंद्रीकरण, राष्ट्रीय उत्पन्नाची–विशेषतः नागरी विभागातील–विषम वाटणी, सरकारच्या घोषित नियंत्रणधोरणाची अंमलबजावणी, व्यापारी व नागर वर्गांच्या प्राप्तीचे व नफ्याचे प्रमाण, तसेच त्यांची मिळकत आणि राहणीचे मान ही सर्व लक्षणे अनिर्बंध भांडवलशाही समाजरचनेची अशीच दिसून येतात. 'संमिश्र अर्थरचना' असे जेव्हा म्हणतात तेव्हा ती संमिश्र एवढ्याच अर्थाने असते की, तिचा एक लहानसा भाग सरकारी कक्षेमध्ये अगर सरकारी मालकीचा असतो. परंतु तिचे प्रत्यक्ष कार्य आणि जीवनमूल्यांचा व वागणूकवर्तणुकीचा त्यांतून व्यक्त होणारा दर्जा लक्षात घेता प्राथमिक अवस्थेतील असंस्कृत भांडवलदारी अर्थरचनेचाच हा एक प्रकार आहे असे म्हणावे लागते. विशिष्ट प्रकारच्या सहकारी संघटनांबाबतही, उदाहरणार्थ, शेतमालाच्या

प्रक्रियेसारखे उद्योग शेतकऱ्यांच्या सहकारी संस्थांकडे त्वरेने सुपुर्त करण्याबाबत, या समाजात विलक्षण उपेक्षा दिसून येते. यावरून ग्रामीण भागातील सहकारी पतपुरवठयास प्रोत्साहन देण्यासारख्या काही मर्यादित क्षेत्रांपुरताच सहकाराचा येथे स्वीकार झालेला असून साकल्याने स्पर्धाशील भांडवलशाहीलाच मान्यता मिळालेली दिसून येते. सरकारी कक्षेतील उद्योगांच्या कार्यवाहीतही ब्रिटिश राजवटीतील परंपरा तशाच चालू राहिलेल्या असून खाजगी किंवा सार्वजनिक (सरकारी) आर्थिक व्यवहाराबाबतची धोरणे, योजना व मूल्यकल्पना या सर्वांवर स्पर्धाशील भांडवलशाहीचा संपूर्ण पगडा असल्याचे दिसून येते. यामुळे स्पर्धाशील भांडवलशाहीची उपयुक्तता व गुणावगुण यांचे अल्प परीक्षण करणे जरुरीचे ठरते.

पहिला महत्त्वाचा मुद्दा हा की, अर्थव्यवस्था स्पर्धेमुळेच कार्यक्षम राहते या सिद्धांतावर आता कोणी विशेष भर देत नाही. अमेरिकेसारख्या देशांच्या अर्थ-व्यवस्थांमध्येही स्पर्धात्मक कार्यपद्धती म्हणावी तशी चालत नाही, हे उत्तरोत्तर मान्य होऊ लागले आहे. अमेरिकन अर्थव्यवस्था आज नक्की कशी कार्य करते याचे विवेचन करण्यात सध्या अनेक अर्थशास्त्रज्ञ गढलेले आहेत. काही विशिष्ट घडामोडींच्या चिकित्सेबाबत त्यांचे मतभेद असले तरी आधुनिक औद्योगिक उत्पादनात, तसेच मोठ्या प्रमाणावरील आधुनिक संघटित व्यापार-व्यवसायांत, आता स्पर्धा फारशी प्रभावी राहिलेली नाही, याबाबत सर्वांचे एकमत दिसून येते. एकीकडे कारखानदारांचे मोठमोठाले संघ आणि दुसरीकडे तितक्याच मोठ्या कामगार संघटना. या दोहोंच्या प्रभावामुळे अर्थ-व्यवहारात स्पर्धा हतबल झाली आहे. निरनिराळी सरकारी करविषयक, चलनविषयक नियंत्रणे, तसेच प्रत्यक्ष उत्पादनादी व्यवहार-नियमन, शेतमालाच्या ठरवून दिलेल्या किंमती, सामाजिक सुरक्षिततेचे अनेकविध कार्यक्रम, सरकारी कक्षेची दिवसेंदिवस होणारी वाढ, इत्यादी सर्व गोष्टींमुळे आता स्पर्धेवर भर देणे अवास्तव ठरते. लहान मर्यादित बाजारपेठांच्या क्षेत्रात अल्प कालावधीपुरते स्पर्धाजन्य किंमतींना महत्त्व असले तरी अर्थव्यवस्थेच्या दीर्घकालीन नियमनाच्या दृष्टीने त्या महत्त्वाच्या वाटत नाहीत.

विशेषत: राष्ट्रीय उत्पादनाच्या विभिन्न वर्गांमधील विभागणीत स्पर्धात्मक शक्ती नियामक ठरत नाहीत. ही काही अलीकडील घटना नव्हे. आधुनिक आर्थिक इतिहासात औद्योगीकरण झाल्यानंतर राष्ट्रीय उत्पादनाच्या वाटणीमध्ये जे महत्त्वाचे बदल घडून आले व कामगारांस किंवा शेतकऱ्यांस त्यातील जास्त योग्य प्रमाण मिळाले अगर त्यांचे अर्थरचनेतील स्थान अधिक सुरक्षित झाले, हे सर्व बदल स्पर्धाशील अर्थपद्धतीच्या कार्यामुळे घडून आलेले नसून राजकीय सत्ता अधिक प्राप्त झाल्यामुळे, क्रमाक्रमाने किंवा क्रांती होऊन, त्वरेने घडून आले. कारखाने चालविण्यासंबंधीचे कायदे, मजुरी-वेतनाबाबतचे नियमन, कामगार संघांना

मिळणारे संरक्षण, सरकारी मदतीने किमतीची पातळी रोखणे, सामाजिक सुरक्षा आणि कल्याणकारी योजना हे या प्रक्रियेतील निरनिराळे टप्पे म्हणता येतील. या सर्व घडामोडींचा इतिहास लक्षात घेतला म्हणजे विभाजनाच्या दृष्टीने स्पर्धाशील अर्थपद्धतीचे वैय्यर्थ्य स्पष्ट होते. एवढेच नव्हे तर, अर्थशास्त्रीय तात्त्विक विवेचनातही आता कोणत्याही स्पर्धात्मक बाजारपेठेत ठरणाऱ्या व्यक्तिगत किमतीप्रमाणे सर्वसामान्य मजुरीचे, व्याजाचे किंवा नफ्याचे दर ठरविले जातात, असे मानले जात नाही.

इतर क्षेत्रांमध्येही आता स्पर्धेचे स्थान कमी मानले जात असल्याचे दिसून येते. सामाजिक मानसशास्त्राच्या दृष्टीने पाहू गेल्यासही स्पर्धाशील परिस्थितीपेक्षा सर्वसाधारण सहकारितेची भावना प्रस्थापित केल्यास समाज-गटांचे कार्य बरेच सुकर होते असे अधिकाधिक सिद्ध होऊ लागले आहे. प्रो. एफ्. एच्. नाईट यांनी अनेक वर्षांपूर्वी याबाबत विवेचन केले ते असे:– "अर्थव्यवहारातील चढाओढ ही एक स्पर्धक लढत मानली जाते, हे उत्पादनाच्या दृष्टीने तिचे सर्वांत महत्त्वाचे लक्षण व मूल्य होय. केवळ लढत अगर खेळ म्हणून पाहताही या चढाओढीत अनेक वैगुण्ये दिसून येतात. शिवाय सामान्य बहुसंख्य अर्थोत्पादकांच्या जीवनाची प्यादी करून असा खेळ मांडणे हे नैतिकदृष्टया तिरस्करणीय वाटणारच; मग त्या खेळातील पुढाऱ्यास तो कितीही आकर्षक वाटो." प्रो. नाईट यांच्या मते आदर्श नीतिनियमांच्या दृष्टीने चढाओढीचे खेळ अगर स्पर्धामूलक भावना यांचा पगडा समाज-प्रक्रियांवर असणे हेही अनिष्ट आहे.

आधुनिक काळात अर्थव्यवहार चालविण्यात स्पर्धेचे महत्त्व मान्य होऊ लागण्याच्या सुरुवातीच्या काळातही ही मांडणी सर्वसाधारणपणे शंकास्पद मानली जात असे, हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे. स्पर्धेचे महत्त्व प्रतिपादणारा सुरुवातीचा एक लेखक मँडवील यास खाजगी दुर्गुण वाटले तरी ते सार्वजनिक सद्गुण ठरू शकतात, अशा प्रकारे स्पर्धेचे समर्थन करावे लागले. पण नीति-विचार बाजूस ठेवला तरी अनेक असंबद्ध स्वायत्त घटकांच्या स्वाभाविक हालचालींची परिणती नेहमीच समाजहितसाधक होईल हे बुद्धीला पटणे कठीण असल्यामुळे कोणत्या तरी अदृश्य शक्तीचा हात या प्रक्रियेत आहे अशी मांडणी तिच्या समर्थनार्थ अनेकांना करावी लागली आहे.

तात्त्विक सिद्धांत आणि व्यवहारसिद्ध कार्यक्षमता दोन्ही दृष्टींनी जरी स्पर्धेचे महत्त्व कमी झाले असले तरी पाश्चात्य समाजांच्या विचारसरणीवर तिचा अजून बराच पगडा असल्याचे दिसून येते. विशेषत:, अमेरिकन समाजावर तिचा प्रभाव मोठा आहे असे म्हणतात. अमेरिकन समाजाच्या सर्व व्यवहारांत व प्रकटनांत, व्यापारात अगर शिक्षणक्षेत्रात उत्पादन-उपभोग क्षेत्रातील व्यवहार-वागणुकीत, सर्वत्र स्पर्धेच्या मानसशास्त्राचा प्रभाव फार मोठा आहे असे मानले जाते. युद्धोत्तर

कालात काही बाह्य घडामोडींमुळे तो आणखी दृढमूल झाल्याचे दिसून येते. भांडवलशाही समाज हा कार्यक्षम असतो हे शाबीत करण्याची, तसेच साम्यवादास (कम्युनिझमला) आत्यंतिक विरोधी अशा सामाजिक तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करण्याची आवश्यकता वाटल्यामुळे मंदीच्या काळात जी विचारसरणी मागे पडली होती तिचाच पुनरुच्चार करून कृत्रिमपणे तिचे महत्त्व वाढविले गेले.

आपला संबंध मुख्यत्वे हिंदी समाजातील प्रभावी विचार-प्रवाहांशी आहे. हिंदी समाजजीवन अगर विचार यांविषयी सामान्यपणे लिहिणे अगर बोलणे बरेच कठीण आहे. या समाजाची घडण व विचारपद्धती एकजिनसी नाहीत, यामुळे ही अडचण विशेष भासते. सबंध हिंदी समाजाला सामान्यपणे लागू करता येईल असे जीवनमूल्य-विषयक सिद्धांत प्रतिपादणे कठीण आहे. अनेक जातींमध्ये हा समाज विभागला असून जीवनविषयक विभिन्न दृष्टिकोन व मूल्ये विशिष्ट जातींशी निगडित आहेत; म्हणून काही सर्वसामान्य मूल्य-कल्पना बाळगणारा समाज असे त्याचे वर्णन करता येत नाही. भारतातील जातिव्यवस्थेवर ब्राह्मण-क्षत्रियांचे काही अंशी वर्चस्व होते, तेव्हा या वर्चस्वाच्या प्रमाणात या दोन जातींच्या मूल्य-कल्पना एकंदर भारतीय समाजाच्या सर्वसाधारणपणे प्रातिनिधिक म्हणून मानता येतील. परंतु हेही वाणिज्य व्यवहार करणाऱ्या जमातींच्या बाबतीत खरे ठरणार नाही; कारण या जमाती ब्राह्मण-क्षत्रियांशी केव्हाही एकरूप झाल्या नव्हत्या. शिवाय परकीय राजसत्तेचा अंमल दीर्घकाल राहिल्यानेही या बाबतीत आणखी बराच गोंधळ निर्माण झालेला आहे. गेल्या १५० वर्षांतील घडामोडींमुळे, विशेषतः पाश्चात्य मूल्य-कल्पनांच्या प्रभावामुळे, परिस्थिती अधिकच गुंतागुंतीची झाली. असे असले तरी सामान्यपणे भारतात भांडवलदारी किंवा स्पर्धाप्रधान विचार-सरणीचा स्वीकार केला गेला आहे किंवा तिला फार महत्त्व प्राप्त झाले आहे असे म्हणता येत नाही. त्याचबरोबर आधुनिक सामाजिक व आर्थिक जीवनाच्या संदर्भात मूल्य-कल्पनांचा फेरविचार करून एखादी नवीन मूल्य-पद्धती निर्माण करण्याच्या एतद्देशीय प्रयत्नासही फारसे यश आले नाही. महात्मा गांधी व विनोबाजी यांच्या मांडणीत संपूर्ण स्वावलंबन आणि मर्यादित आर्थिक जीवन व उत्पादन-तंत्र यांवर इतका भर देण्यात आला की, त्यामुळे आधुनिक जीवनातील नित्याच्या प्रश्नांची उकल करण्यास ते असमर्थ ठरले. विशेषतः, औद्योगीकरण व आधुनिक मोठ्या प्रमाणावरील व्यापारउदीम या संबंधात सध्या सर्वत्र जे कूट प्रश्न उभे राहतात त्यांबाबतीत हे तत्त्वचिंतक सर्वसाधारणपणे मूलतः प्रतिगामी मार्गा-शिवाय दुसरे काही सुचवू शकत नाहीत. भारतातील प्रचलित बहुतेक विचार-प्रवाहांत एक मात्र प्रभावी वैचारिक छटा सर्वत्र दिसून येते. ती म्हणजे सरकारी उद्योगांबद्दल साशंकता. सर्वोदयाचा राज्यसंस्थेसंबंधाने जो दृष्टिकोन आहे त्यामुळे अप्रत्यक्षपणे अनिर्बंध व्यापाराला किंवा निर्नियंत्रणाच्या मागणीला एक प्रकारे

पाठिंबाच मिळतो; आणि हा पाठिंबा भारतातील भांडवलशाही वर्गांनी साहजिकच स्वागतार्ह मानला आहे. भारतीय समाजवाद्यांना नोकरशाही अधिराज्याची जी, काही अंशी साधार, भीती वाटते तिचाही प्रत्यक्ष परिणाम वरीलप्रमाणेच झाला आहे. थोडक्यात, समाजधुरीण, बुद्धिवान आणि सामान्य जनता या सर्वांची परिस्थिती, सद्य:स्थितीचा विचार करताना गोंधळाची वाटते. विशेषत: सरकारी प्रयत्न व उद्योग यांविषयी सर्वांची वृत्ती दुटप्पी आहे असे दिसून येते. या परिस्थितीमुळेच आधुनिक भांडवलशाहीच्या पुरस्कर्त्यांना, विशेषत: गेल्या दशकात, खुल्या अनिर्बंध व्यापार व्यवसायावर, तसेच स्पर्धेच्या गुणवत्तेवर भर देऊन त्यांचा पाठपुरावा करता आला आहे. अन्यथा त्यांना हे शक्य नव्हते.

वस्तुत: भारतीय अर्थव्यवस्था अमेरिकी किंवा पश्चिम युरोपीय स्पर्धाधिष्ठित अर्थजीवन-पद्धतीहून बरीच वेगळी आहे. पुस्तकी स्पर्धाधिष्ठित अर्थव्यवस्था आणि वास्तविक भारतीय अर्थव्यवस्था यांत अमेरिकी अगर पश्चिम युरोपीय अर्थव्यवस्थेपेक्षाही महदंतर आहे. भारतीय अर्थरचनेत विषमता, हक्कदारी व मक्तेदारी इतरांपेक्षा अधिक प्रमाणात घर करून आहेत. मागासलेल्या व विस्कळित समाजात, विकासाचे फायदे सगळीकडे पसरून उत्कर्षाचा वाटा सर्वांना मिळण्याच्या मार्गात, सामान्यपणे नेहमीच अनेक अडचणी असतात. भारतातील जाति-श्रेणी-बद्ध समाज-रचनेमुळे त्या अधिकच वाढतात. परिणामी काही थोड्या जमातींच्या हाती सर्व आधुनिक व्यापार-व्यवहार केंद्रित होऊन त्यांचे वाढते फायदे त्यांनाच मिळत राहतात. त्यांची सत्ता वाढत जाते; आणि समाजातील समतोल पार नाहीसा होतो. शिवाय भारतातील स्पर्धात्मक व्यवहारांमध्ये अनियंत्रित, अनिर्बंध वर्तणूक जेवढी उघडी-नागडी दिसून येते तेवढी ती इतरत्र जगात कोठेही आढळणार नाही. स्पर्धात्मक व्यवहारात, मग तो खेळ म्हणा वा युद्ध म्हणा, आपल्यावर जे डाव उलटणार नाहीत अगर ज्यांतून माघार घ्यावी लागणार नाही अशा सर्व सूक्तासूक्त मार्गांचा यश मिळण्यासाठी अवलंब करणे हे मानवी स्वभावास धरून तर्कशुद्ध आहे. अमेरिकेतील भांडवलदारांच्या अलीकडील पिढ्यांनी समाजहिताच्या दृष्टीने स्वनियमन थोडेबहुत मान्य केल्याने तेथील साहसी उद्योगपतींच्या स्वैर अनिर्बंध कार्यपद्धतीस काहीसे इष्ट वळण लागल्याचे सांगण्यात येते. याच्या उलट भारताच्या आधुनिक आर्थिक इतिहासात समाज-दृष्ट्या ज्यांची वागणूक अधिकाधिक निकृष्ट आहे अशा जमातींचा उत्तरोत्तर अधिक उत्कर्ष होताना आढळतो. थोडक्यात, भारतातील आजची स्पर्धात्मक अर्थव्यवहाराची वाटचाल नैतिक अगर सामाजिक दृष्ट्या बिलकुल स्पृहणीय नाही. आर्थिक दृष्ट्या तिची क्षमता संशयास्पद आहे.

विद्यमान परिस्थितीतील खराखुरा धोका म्हणजे एकंदर समाज-जीवनात भ्रष्टाचार व लाचलुचपत यांची जी सर्वत्र वाढ होत आहे तो होय. राजकारणी पुढाऱ्यांच्या, सरकारी अधिकाऱ्यांच्या, तसेच बुद्धिवंतांच्या व बौद्धिक व्यावसायि-

कांच्या शीलभ्रष्टतेस आधुनिक व्यापारउदीम वर्गात केंद्रित झालेली सत्ता हीच बऱ्याच अंशी कारणीभूत आहे यात शंका नाही. विशेषेकरून भारतीय नागर समाज या भांडवलदारांच्या प्रभावामुळे अतिशय भ्रष्ट झालेला आहे. त्यामुळे जी प्रक्षोभक परिस्थिती निर्माण होते त्यातच खरा धोका आहे. विकास खर्चावर मोठा भर देण्यात आला आहे; पण त्यापासून फायदा करून घेण्याची संधी मात्र काही ठराविक वर्गांना अगर जमातींनाच मिळत आहे. त्यामुळेही पुन्हा या वर्गांचे आर्थिक व राजकीय सामर्थ्य वाढत जाते. याचा परिणाम भ्रष्टाचार वाढण्यात होऊन तो जसजसा लोकांच्या अधिकाधिक नजरेस येत जातो तसतसे समाजधुरीणांचे सर्वसामान्य जनतेवरील किंवा कनिष्ट मध्यम वर्गावरील नैतिक वजन कमी होत जाते. या परिस्थितीत काही सुधारणा होण्याचा प्रत्यय लोकांना येईनासा झाला तर मग या अर्थपद्धतीचा व समाजरचनेचा मूळ पायाच चुकीचा आहे असे त्यांना वाटू लागेल. आणि पुरेसे खंबीर पुढारीपण उपलब्ध झाल्यास या परिस्थितीतून क्रांतीचा उद्‌भव संभवेल; नाहीपेक्षा यातून केवळ अराजक निर्माण होईल.

स्पर्धाशील पुंजीवादाची किंवा तथाकथित उदारमतवादी अर्थव्यवस्थेची तत्त्वप्रणाली आपण स्वीकारण्यास तसे कोणतेच सयुक्तिक कारण दिसत नाही. आपल्या समाजाच्या परंपरागत जीवनमूल्यांमध्ये असल्या स्पर्धात्मक मूल्यांचा समावेश कधीही झालेला नाही; आणि पाश्चात्य समाजामध्ये त्याची उपयुक्तता व महत्त्व काहीही वाटले तरी आपल्या देशाच्या विद्यमान परिस्थितीत ही तत्त्वप्रणाली अत्यंत अनुपयुक्त आहे. स्पर्धाशील समाज-व्यवस्था असली तरच तांत्रिक प्रगती करता येते अगर आर्थिक कार्यक्षमता वाढते असेही आज मानण्याचे कारण नाही. अगदी भिन्न अर्थरचना असलेल्या साम्यवादी समाजांनी जी प्रगती करून दाखविली त्यामुळे असला दावा खोटा ठरतो. साधनसंपत्तीची विपुलता व नववसाहतीस भरपूर वाव असणाऱ्या समाजात स्पर्धाशील विचारसरणीचे किंवा मनोवृत्तीचे दुष्परिणाम उत्कटपणे दिसत नाहीत. परंतु जेथे लोकसंख्येच्या मानाने साधन-संपत्ती आणि विस्तार-संधी अत्यंत मर्यादित आहेत आणि जो समाज विषमता व विभिन्नता यांमुळे परस्परांबद्दल अविश्वास आणि संशय यांनी सतत ग्रस्त आहे अशा समाजामध्ये स्पर्धाशील मनोवृत्तीला व चढाओढीच्या भावनेला उत्तेजन देणे अतोनात धोक्याचे असते. दाट लोकसंख्या व संकुचित विस्तारसंधी असलेल्या समाजाचा सर्वसमावेशक विकास घडवून आणावयाचा तर परस्परांच्या हितासंबंधी जपणूक, परस्परसहकार्यावर सतत भर आणि इतरांचे हित डावलून स्वार्थ साधू पाहणाऱ्यांचे कडक शासन, हे सर्व केल्यासच तो साधू शकेल. निदान एवढ्याकरिता तरी भारताच्या सद्यःस्थितीत सहकाराचे तत्त्वज्ञान हेच सर्वांत अधिक युक्त मानले पाहिजे.

सहकाराचा स्वीकार केल्यास प्रत्यक्ष व्यवहारात काय करणे क्रमप्राप्त आहे

यासंबंधीचे माझे विचार मी आता थोडक्यात मांडतो. समाजवादी उद्दिष्टांचा आज जो सर्वत्र उद्घोष केला जातो त्याला मी फारसे महत्त्व देत नाही; याचे कारण उघडच आहे की उत्पादनाच्या किंवा विभाजनाच्या कोणत्याही क्षेत्रातील प्रत्यक्ष व्यवहारांवर त्याचा कोणताही परिणाम झालेला दिसून येत नाही. आज आपल्या देशामध्ये सर्वोदयी तत्त्वज्ञानाच्या जोडीने समाजवादी विचारास मोठ्या प्रमाणावर मान्यता मिळालेली दिसते. सर्वोदयी तत्त्वज्ञानात आढळून येणारी अनेक जीवन-मूल्ये सहकारामध्ये आहेत. तथापि दोन महत्त्वाच्या बाबतीत या दोहोंमध्ये फरक आढळून येतो. पहिली गोष्ट म्हणजे प्रत्यक्ष अर्थव्यवहार आणि शीघ्र आर्थिक विकास यांवर सहकाराचे लक्ष विशेष केंद्रित झालेले असते ही होय. दुसरी गोष्ट म्हणजे संघटनात्मक प्रयत्नावर सहकाराचा असलेला भर; वास्तविक असेही म्हणता येईल की सहकार म्हणजे प्रामुख्याने संघटनात्मक तत्त्वज्ञान अगर विचारपद्धती. आर्थिक व्यवहार कार्यक्षम व उपकारक करण्याचा एक खास मार्ग सहकार दाखवितो. याच्या उलट सर्वोदयाचा संघटना-प्रयत्नांवर विश्वास दिसत नाही; त्यामुळे साहजिकच व्यावहारिक प्रश्न त्याला हाताळता येत नाहीत. परिणामी, सर्वोदयी तत्त्वज्ञानाचा सर्वत्र बोलबाला दिसला तरी त्याची फलश्रुती अगदी तोकडी किंवा जवळजवळ नाहीच असे दिसते.

आजची आपली संमिश्र अर्थरचना प्रत्यक्षात समाजवादी नाही किंवा सर्वोदयी ध्येयवादाने प्रेरित नाही. ती उत्कटपणे मांडवलदारी आहे. सहकारी तत्त्वज्ञानाचा स्वीकार केल्यास योग्य त्या सर्व क्षेत्रांमध्ये सहकारी संघटनांस प्रोत्साहन देऊन त्या रुजविण्याचे कार्यक्रम प्रथम हाती घेणे अवश्य आहे. सहकारी कार्यक्रम आज तत्त्वतः स्वीकारलेला आहे. खरे पाहिले तर सरकारी धोरण त्याची पूर्णपणे अंमलबजावणी करण्याचे दिसून येत नाही. उदाहरणार्थ, शेतमालाची विक्री व प्रक्रियांच्या क्षेत्रात खाजगी व्यापाऱ्यांच्या हालचाली अनेक ठिकाणी सहकारी संस्थांनी मूळ धरू नये या दृष्टीने बुद्धिपुरस्सर चालतात हे सर्वश्रुत आहे. परंतु खाजगी व्यापाऱ्यांकडून होणारे हे अडथळे बाजारपेठ-नियमन-संस्थांसारख्या, कायद्यांनी प्रस्थापित झालेल्या संस्थांच्या मार्फत आणले गेले तरी सरकार त्यांचा प्रतिबंध करीत नाही. प्रक्रियात्मक उद्योग खाजगी व्यापाऱ्यांकडून काढून सहकारी संस्थाकडे देणे हे केवळ सहकाराच्या प्रगतीच्या दृष्टीनेच नव्हे तर बाजारभाव स्थिरावणे इत्यादी धोरणे सफल होण्याच्या दृष्टीनेही आवश्यक आहे. हे आज अनेक वर्षे सरकारच्या निदर्शनास आणून दिले जात आहे. प्रक्रियात्मक उद्योगांचे सहकारी संस्थांकडे हस्तांतर हे सरकारकडून अनेक दिशांनी एकदम प्रयत्न झाले तरच त्वरित होईल. असल्या प्रयत्नांचा आज पूर्णपणे अभाव आहे; खरे म्हणजे हे प्रयत्न करण्याचे बुद्धिपुरस्सर टाळले जात आहे, असे म्हणण्यास भरपूर जागा आहे. अर्थात् सहकाराचा पूर्णपणे स्वीकार झाल्यास यात बदल होईल हे

उघड आहे. तसेच सर्व तऱ्हेच्या सार्वजनिक व्यवहाराच्या बाबतीतही नवीन धोरणामुळे सहकारी संस्थांचा मध्यस्थ म्हणून अधिकाधिक प्रमाणात वापर करण्याचे मान्य केले जावे असे धोरण योग्य व सुसंबद्ध रीतीने कार्यान्वित केले गेले तर अर्थव्यवहार करणाऱ्या सरकारी व निमसरकारी मंडळांस स्थानिक स्वरूपाचे बारीक सारीक व्यवहार पार पाडण्याबाबत ज्या अनेक अडचणी येतात त्या बहुतांशी दूर होतील.

सहकाराचा स्वीकार केल्याने, निनिराळ्या प्रकारची कामे पार पाडण्यासाठी सहकारी संस्थांचा मध्यस्थ म्हणून सार्वजनिक सरकारी संस्थांनी वापर करण्या-व्यतिरिक्त सरकारी क्षेत्रातील वेतन-पद्धती व प्रलोभनांचे स्वरूप यांवर मूलभूत परिणाम होईल. सरकार आज सार्वजनिक क्षेत्रात याबाबत अनुरूप अशी पद्धती निर्माण करण्यास असमर्थ ठरले आहे. आर्थिक विकासाचे नियोजन करणाऱ्या गरीब देशांनी आपणांस योग्य अशी या संबंधीची पद्धती निर्माण करणे अगत्याचे आहे. या प्रश्नाचे स्वरूप थोडक्यात असे आहे:- भारतामध्ये सर्वांत निकृष्ट स्तरा-वरील श्रमिकांचा पुरवठा फाजील असल्यामुळे मजुरीचे दर अत्यंत कमी आहेत; पण सर्वोच्च दर्जाच्या व्यावसायिकांचे वेतनमान तत्सम आंतरराष्ट्रीय वेतनमानाशी संबद्ध असून या क्षेत्रातील व्यवहारावर अतिशय संपन्न देशांतील जीवनमानाची छाप पडली आहे. या विरोधी परिस्थितींचा समन्वय साधावयाचा असल्यास आपल्या उच्चतम वर्गाने राष्ट्रीय अर्थरचनेच्या एकंदर आवाक्याचा विचार करून स्वतःच्या आकांक्षा-अपेक्षांवर स्वखुषीने बंधने लादून घेतली पाहिजेत; पण जोवर मांडवलदारी समाजव्यवस्थेतील प्रलोभनाबाबतची विचारसरणी आणि स्पर्धात्मक व्यवहाराने सेवाकर्मांची मोल ठरविण्याची पद्धती आपण त्याज्य मानीत नाही, तोवर याबाबत आवश्यक व इष्ट असलेल्या मनोवृत्तीचा सार्वत्रिक स्वीकार होणे शक्य नाही.

खाजगी कक्षेतील बहुसंख्य घटक लहान प्रमाणावर उद्योग चालविणारे असतात. या सर्वांना सहकारी कक्षेत समाविष्ट करणे शक्य आहे. तथापि वर दर्शविल्या-प्रमाणे आधुनिक संघटित उद्योग-व्यवसायांचा, विशेषत: त्यांतील जे मोठे घटक बहुतांशी मोठ्या सार्वजनिक कंपन्यांच्या रूपात संघटित असतात त्यांचा, समावेश सहकारी क्षेत्रात करणे कठीण आहे. खाजगी उद्योग-व्यवसायांतील या मोठ्या कंपन्या आणि त्यांचा संचालक वर्ग हेच आज भारतामध्ये स्पर्धाशील मांडवलदारी पद्धतीचे पुरस्कर्ते असून मांडवलदारी व्यवहारांचा व कल्पनांचा स्वीकार करण्या-बाबत याच वर्गाकडून आज प्रामुख्याने दडपण आणले जाते. सरकारने दिलेले संरक्षण, समाजाचा पाठिंबा आणि एकाधिकारसदृश परिस्थितीचा त्यांनी घेतलेला गैरफायदा यामुळेच जरी या वर्गाच्या संपत्तीची व उत्कर्षाची वाढ झाली असा इतिहास असला तरी समतेच्या दिशेने होणाऱ्या सर्व सौम्य हालचालींना देखील

त्यांचा विरोध असतो. एवढेच नव्हे तर अशामुळे आपली नागवणूक होते असा लगेच ते ओरडा करू लागतात; आणि त्यांचे उत्पादनाचे कार्य पुढे चालावयाचे असेल किंवा त्यास विशिष्ट दिशा द्यावयाची असेल तर त्यासाठी आवश्यक ते प्रलोभन व त्यांच्या अपेक्षेप्रमाणे योग्य असे जीवनमान व मोबदला ही मिळालीच पाहिजेत असे त्यांचे म्हणणे असते. सहकाराच्या तत्त्वज्ञानाचा स्वीकार केल्यास या सर्व मागण्या निःसंदिग्धपणे धुडकावून लावणे जरूर आहे. सहकारी लोकराज्यामध्ये मालमत्तेबाबतचे हक्क जेवढ्या प्रमाणात ते सर्व समाजास उपकारक ठरतील तेवढ्याच प्रमाणात मान्य केले जातील; आणि सत्तेच्या केंद्रीकरणाचा धोका निर्माण होण्यासारखी किंवा काही थोड्यांना समाजविघातक वर्तन करण्यास अवसर मिळण्यासारखी परिस्थिती न होईल याकरिता योग्य तरतूद केली जाईल. म्हणून मालकी हक्काचे थोडेफार केंद्रीकरण क्षम्य मानले तरी मालकी हक्क आणि आर्थिक संचलन व सत्ता यांची फारकत केली गेलीच पाहिजे. या दृष्टीने विचार करता विशिष्ट आकारमानापेक्षा मोठ्या असणाऱ्या, विशिष्ट मर्यादेपलीकडे उत्पादक साधनसंपत्ती ताब्यात असणाऱ्या किंवा अर्थ-व्यवस्थेतील मर्म- स्थानी असणाऱ्या अशा सर्व कंपन्या एका अर्थी सार्वजनिक आहेत असे मानले पाहिजे. अशा कंपन्यांची कार्यपद्धती व व्यवहार खुले असले पाहिजेत; व त्यांची हिशेब-पद्धतीही सार्वजनिक तपासनिसांच्या अधिकारात राहिली पाहिजे.

इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशन किंवा त्यासारख्या इतर मंडळ्या, स्टेट बँक, आयुर्विमा महामंडळ (एल्. आय्. सी.) इत्यादी पैसा व पतपुरवठा करणाऱ्या सरकारी संस्थांचे भारतामध्ये अलीकडे महत्त्व वाढत आहे; त्यांचा या संदर्भात विचार करणे अवश्य आहे. या सर्व संघटनांच्या एकत्रित कार्यामुळे बहुतेक मोठ्या हिंदी कंपन्यांशी सरकारचा धनको अगर भागीदार म्हणून संबंध प्रस्थापित झाला आहे. त्यामुळे सरकारवर एक महत्त्वाची जबाबदारी आली आहे. त्याची एक बाजू मुंदडा प्रकरणाने स्पष्ट झाली. सहकाराच्या दृष्टीने विचार करता सरकारने कर्ज अगर मांडवल देऊन निर्माण केलेली सत्ता या आधुनिक खाजगी क्षेत्रातील संपन्न व प्रभावी कंपन्यांचे परिणामकारक नियंत्रण करण्याकरिता वापरली पाहिजे. याबाबतीत सरकारला किमान करता येण्यासारखी गोष्ट म्हणजे या कंपन्यांची हिशेब–पद्धती खुली ठेवून सार्वजनिक तपासणी–पद्धत त्यांना लागू करण्याकरता आग्रह धरणे ही होय. त्यामुळे त्यांतील मालक, संचालक व व्यवस्थापक यांच्या कोणत्याही समाज-विघातक हालचाली ताबडतोब उघडकीस आणून त्यांना आळा घालण्याचे सामर्थ्य सरकारला प्राप्त होईल.

शेवटी, शासकीय व राजकीय क्षेत्रांमध्ये सहकाराची भूमिका संयुक्त किंवा संघराज्य पद्धतीशी अतिशय सदृश असल्याचे दिसून येईल. संघराज्य कल्पनेचे

महत्त्व दिवसेंदिवस कमी होत चालले आहे, ही अलीकडच्या काही दशकांमध्य दृष्टोत्पत्तीस येऊ लागलेली एक दुर्दैवी प्रवृत्ती आहे. कदाचित् साम्यवादाच्या (कम्युनिझम) उदयामुळे ही गोष्ट घडत असावी. साम्यवादाशी सामना करण्यासाठी लोकशाहीमध्ये केंद्रीकरणाची प्रवृत्ती वाढीस लागली व त्यामुळे लोकशाहीतील जुन्या संघराज्यीय प्रवृत्ती अगर कल्पना मागे पडत गेल्या. केंद्रीकरणाची परिणती अखेर सर्वाधिकारशाहीमध्ये व नोकरशाहीची सत्ता दृढावण्यामध्ये होऊन त्यामुळे समाजामध्ये लोकशाहीविरोधी आचार व प्रवृत्ती बळावतात. विखुरलेल्या लहान-लहान स्थानिक प्राथमिक घटकांमार्फतच आर्थिक क्षेत्रातील सर्व कामे करून घेण्यावर सहकाराचा शक्य तेवढा अधिक भर असल्यामुळे संघराज्याच्या राजकीय ध्येयवादास सहकार पोषक होतो. अशा रीतीने सहकार हा निव्वळ आर्थिक लोकशाही प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतो असे नव्हे तर राजकीय लोकशाहीच्या कार्यवाहीमध्येही त्याला आवश्यक स्थान आहे.

या व्याख्यानांची कक्षा मी फार व्यापक ठेवली अशी मला भीती वाटते. त्यामुळे या विषयासंबंधीचे माझे विचार मी किती सुस्पष्टपणे मांडू शकलो हे मला सांगणे कठीण आहे. तथापि याबाबतच्या माझ्या मूळ श्रद्धेचा मी शेवटी पुनरुच्चार करतो. भारताच्या आजच्या राजकीय व आर्थिक परिस्थितीत स्पर्धेच्या तत्त्वज्ञानाचा व प्रवृत्तीचा पूर्णतया त्याग करून सहकारावरील विश्वास आपण घोषित केला पाहिजे. एकदा ही श्रद्धा ठामपणे व्यक्त केली म्हणजे मग त्यातून आपाततः जो प्रत्यक्ष कार्यक्रम निर्माण होतो त्याच्या अंमलबजावणीचा आपण प्रामाणिक प्रयत्न केला तरच आजच्या या बिकट परिस्थितीतून काही वाट सापडण्यासारखी आहे.

एका थोर शिक्षकाच्या आणि सामाजिक विचारकाच्या स्मृत्याभिवादन प्रसंगाने माझ्या सहकाराबाबतच्या श्रद्धेचा पाया विशद करून सांगण्याची संधी पंजाब विद्यापीठाने मला दिली याबद्दल मी विद्यापीठाचा फार आभारी आहे. माझ्या विवेचनाचा शेवट मी या वैदिक भूमीत आपल्या प्राचीन ऋषींनी जी प्रार्थना केली तिनेच करणे युक्त होईल :—

ॐसह नाववतु । सह नौ भुनक्तु । सह वीर्यं करवावहै । तेजस्विनाऽवधीतमस्तु । माविद्विषावहै ।। ॐ शांतिः शांतिः शांतिः ।

## मराठी प्रकाशन १० वे

न्या. मा. गो. रानडे यांनी दिलेली

# व्यापारासंबंधी व्याख्याने

न्यायमूर्ती रानडे यांचे मराठीतील अत्यंत दुर्मिळ असे हे अर्थशास्त्रविषयक लिखाण आहे. न्यायमूर्तींचे अर्थशास्त्रविषयक लिखाण विपुल असले तरी ते सर्व इंग्रजीत आहे. १८७२–७३ मध्ये त्यांनी या विषयावर मराठीतून दोन व्याख्याने दिली. ती पुढे पुस्तकरूपाने श्री. वि. बा. दामले यांनी १८७३ साली प्रकाशित केली. ते पुस्तक सध्या दुर्मिळ असल्यामुळे त्याचे हे पुनर्मुद्रण करण्यात आले आहे. न्यायमूर्तींनी जवळजवळ ९० वर्षांपूर्वी या विषयावर प्रकट केलेले विचार आजही महत्त्वाचे व अभ्यसनीय आहेत. न्यायमूर्तींचे ऐन तारुण्यात व्यक्त झालेले विचार या व्याख्यानांत आपणांस आढळतील व पुढे त्यांच्या प्रौढ व तील इंग्रजीत प्रसिद्ध झालेल्या अर्थशास्त्रीय लिखाणाशी ते थोडेफार निसंगत असल्याचेही वाटेल. पुनर्मुद्रणाच्या वेळी या पुस्तकाला प्रा. नी. वि. सोवनी यांनी विस्तृत प्रस्तावना लिहिली असून त्यामध्ये त्यांनी न्यायमूर्तींच्या अर्थशास्त्र-विषयक मतांची मोकळेपणाने, शास्त्रीय दृष्टिकोनातून जी थोडीफार चर्चा केली आहे, तीही वाचकांस उद्‌बोधक वाटेल. किंमत ·५०

## मराठी प्रकाशन ११ वे

# सहा ग्रामीण विभागांची जनसांख्यिकीय पाहणी

कुमुदिनी दांडेकर

हे प्रकाशन म्हणजे १९५१ व १९५६ या सालांच्या दरम्यान गोखले अर्थशास्त्र संस्थेतर्फे ग्रामीण विभागात ज्या जनसांख्यिकीय पाहण्यांची मालिका सुरू केली गेली, त्या मालिकेतील हे तिसरे व शेवटचे प्रतिवृत्त होय. या पाहणीचे भौगोलिक क्षेत्र जसे विस्तीर्ण निवडले होते, तसेच पाहणीत समाविष्ट होणाऱ्या विषयांचे क्षेत्रही पूर्वीच्या पाहणीपेक्षा अधिक विस्तृत केले होते. केवळ जनसंख्येशी संबंधित असणाऱ्या विषयांपुरतीच ही पाहणी मर्यादित न करिता, तिच्यात आनुषंगिक अशा अनेक सामाजिक व आर्थिक विषयांचाही समावेश करण्य आला होता. या पाहणीत बऱ्याच नव्या प्रश्नांसंबंधीची माहिती मिळविण्य. आली. वैवाहिक स्थिती, विवाहासंबंधीच्या चालीरीती व विवाहावर होणार खर्च यांसंबंधी, तसेच सामान्यत: गोळा न केली जाणारी शरीरशास्त्रीय आणि विवाहासंबंधी सामाजिक व आर्थिक स्वरूपाची अशी मनोरंजक माहितीही मिळविण्यात आली. सार्वजनिक आरोग्य व आहारासंबंधीच्या सवयी यांच्या बाबतीत केलेल्या पाहणीतून निघालेले निष्कर्षही या पुस्तकात शेवटी समाविष्ट केले आहेत. किंमत रु. ६·००